७० वर्ष
निर्भीड पत्रकारितेची

दैनिक
# संध्या
नि:पक्ष समीक्षणाचे....निर्भीड दैनिक
मंगळवार, दि. ३० जून २०२६

www.dainikesandhya.com | www.youtube.com/@sandhyalivenews

संस्थापक : कै. वसंत काणे | नोंदणी क्रमांक : १६६३/१९५७ | पुणे आवृत्ती | पाने : ८ | अंक : १८५ | Gmail : news.sandhya@gmail.com | किंमत : ३ रूपये

# ५० लाख शेतकऱ्यांना गटशेतीत आणण्याचा संकल्प : मुख्यमंत्री

## ‘सत्यमेव जयते फार्मर कप २०२६’ ही शेती परिवर्तनाची व्यापक जनचळवळ

**मुंबई (दै. संध्या)**

‘सत्यमेव जयते फार्मर कप २०२६’ ही केवळ स्पर्धा नसून महाराष्ट्रातील शेती परिवर्तनाची व्यापक जनचळवळ आहे. या उपक्रमामुळे शेतकऱ्यांमध्ये निर्माण झालेला आत्मविश्वास हेच त्याचे सर्वात मोठे यश आहे. आजचे १८ हजार शेतकरी गट पुढील काळात ५० लाख शेतकऱ्यांना एकत्र आणतील, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला.



वर्षा निवासस्थानी ‘पानी फाऊंडेशन’च्या सहकार्याने आयोजित ‘फार्मर कप २०२६’च्या शुभारंभ कार्यक्रमात मुख्यमंत्री फडणवीस बोलत होते. यावेळी कृषी मंत्री दत्तात्रय भरणे, राज्यमंत्री अ‍ॅड. आशिष जयस्वाल, पाणी फाऊंडेशनचे संस्थापक अभिनेते आमिर खान, अपर मुख्य सचिव विकास चंद्र रस्तोगी, मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव डॉ. श्रीकर परदेशी, कृषी विभागाचे सचिव परिमल सिंग, ग्रामविकास विभागाचे सचिव चंद्रकांत पुलकुंडवार, कृषी आयुक्त सूरज मांढरे, कृषी संचालक (विस्तार व प्रशिक्षण) रफिक नाईकवाडी यावेळी उपस्थित होते. झूम लिंकद्वारे राज्यातील शेतकरी या कार्यक्रमात सहभागी झाले होते. यावेळी स्मार्ट शेती अ‍ॅपचे लोकार्पण करण्यात आले. कृषी विभागाचे सचिव परिमल सिंह यांनी २६ ऑगस्ट २०२५ पासून राज्यभरात ४६ तालुक्यात सुरू असलेल्या फार्मर कपच्या माध्यमातून राबविण्यात आलेल्या उपक्रमांची माहिती दिली. मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, या ‘सत्यमेव जयते फार्मर कप २०२६’ या उपक्रमामुळे शेतकऱ्यांमध्ये निर्माण झालेला आत्मविश्वासच भविष्यातील कृषी परिवर्तनाचा पाया ठरेल.फार्मर कपमधील १८ हजार शेतकरी गट हे महाराष्ट्रातील शेती क्रांतीचे शिल्पकार ठरणार आहेत, त्यांच्या अनुभवातून लाखो शेतकरी प्रेरणा घेतील. विधानमंडळात महिला शेतकरी विधेयक मंजूर करण्यात येणार आहे. शेतीच्या मालकीमध्ये नाव नसलेल्या महिलांनाही अधिकृत शेतकरी म्हणून मान्यता दिली जाणार आहे. मागील वर्षी फार्मर कपमध्ये सहभागी झालेल्या गटांमध्ये सोयाबीन, कापूस आणि मका या पिकांच्या उत्पादनात सरासरी ७१ टक्क्यांनी वाढ झाली. सामूहिक खरेदीमुळे कृषी निविष्ठांवर १,५८४ कोटी रुपयांची बचत झाली, तर सामूहिक श्रमांमुळे एकरी सुमारे ६ हजार रुपयांची मजुरीची बचत झाली. गटशेतीमुळे उत्पादन खर्च कमी होऊन शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढण्यास मोठी मदत होत असल्याचे त्यांनी सांगितले.


मुख्यमंत्री म्हणाले की, महाराष्ट्र हे कृत्रिम बुद्धिमत्तेचा शेतीमध्ये वापर करणारे देशातील पहिले राज्य ठरत आहे. ‘महाविस्तार अ‍ॅप’ आणि ‘फार्मर कप’मधील माहिती एकत्रित करून शेतकऱ्यांना अधिक प्रभावी मार्गदर्शन करण्यात येईल. फार्मर कपमधून मिळालेल्या अनुभवांच्या आधारे राज्याच्या कृषी धोरणांमध्येही आवश्यक बदल करण्यात येतील. राज्य शासनाच्या विविध योजनांचे एकत्रित नियोजन (कन्व्हर्जन्स) केल्यास गटशेती अधिक सक्षम होईल. यावर्षी अल निनोमुळे पर्जन्यमान कमी राहण्याची शक्यता लक्षात घेऊन शेतकऱ्यांनी जलसंधारणाच्या सर्व संरचनांची तातडीने दुरुस्ती, गाळ काढणे आणि पाणीसाठा वाढविण्याची कामे हाती घ्यावीत, जलयुक्त शिवारसारख्या उपक्रमांमुळे पूर्वीच्या दुष्काळी परिस्थितीत मोठा दिलासा मिळाला होता, असे त्यांनी सांगितले. मुख्यमंत्री म्हणाले की, फार्मर कपमध्ये उत्कृष्ट काम करणाऱ्या शेतकरी गटांच्या गावांना स्वतः भेट देणार आहेत. शेतीचा विकास हे राज्यासमोरील सर्वात मोठे आव्हान असले तरी शासन, पाणी फाऊंडेशन, कृषी विभाग आणि शेतकरी यांनी एकत्रितपणे काम केल्यास पुढील पाच ते सात वर्षांत महाराष्ट्रातील शेती क्षेत्रामध्ये ऐतिहासिक परिवर्तन घडवून आणता येईल. प्रत्येक सहभागी शेतकरी हा आधीच विजेता असून, ही चळवळ राज्यातील कृषी समृद्धीचा नवा अध्याय ठरेल, असा विश्वास मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केला. कृषी मंत्री भरणे म्हणाले की, एकत्रितपणे शेती केल्यास आणि सामूहिक प्रयत्नातून शेतीचे नियोजन केल्यास उत्पादनवाढीसह शेतकऱ्यांचे उत्पन्नही निश्चितपणे वाढू शकते. फार्मर कप उपक्रमामुळे शेतकऱ्यांमध्ये नव्या उमेद आणि आत्मविश्वासाचा संचार झाला आहे. विशेषतः स्वतःची जमीन नसतानाही एकत्र येऊन शेती करण्याचा निर्णय घेतलेल्या महिला गटांचे विशेष कौतुक आहे. प्रत्येकाचा शेतीशी असलेला भावनिक संबंध आणि बांधिलकी लक्षात घेऊन सामूहिक शेतीचा मार्ग स्वीकारल्यास महाराष्ट्र शेती क्षेत्रात पुन्हा आदर्श निर्माण करू शकतो.

### विकसित भारतासाठी शेतकऱ्यांच्या उन्नतीवर भर : आमिर खान

अभिनेते आमिर खान म्हणाले की, विकसित भारताचे स्वप्न पूर्ण करायचे असेल तर सर्वप्रथम शेतकरी उन्नत आणि सक्षम होणे आवश्यक आहे. राज्यभरात फार्मर कपच्या माध्यमातून १८ हजारांहून अधिक शेतकरी गटांची निर्मिती झाली आहे. या संपूर्ण उपक्रमात मेंटर्सची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. जसा एक उत्तम शिक्षक विद्यार्थ्यांचे भविष्य घडवतो, त्याचप्रमाणे मार्गदर्शक शेतकरी गटांना योग्य दिशा देऊन त्यांच्या यशात मोलाची भूमिका बजावतील. हा उपक्रम डिजिटल आणि प्रत्यक्ष संपर्क यांचा प्रभावी संगम आहे. डिजिटल माध्यमातून अल्प खर्चात मोठ्या संख्येने लोकांपर्यंत पोहोचता येते, तर प्रत्यक्ष संवादातून विश्वास आणि आत्मियता निर्माण होते. या दोन्हींच्या एकत्रित वापरामुळे हा प्रयोग अधिक प्रभावी ठरणार आहे.

## चालत्या बाईकवर जावयाचा सासूवर हल्ला, हेल्मेट डोक्यात घालून संपवलं

**मुंबई (दै. संध्या)**



कौटुंबिक नात्याला काळीमा फासणारी एक अत्यंत थरारक आणि धक्कादायक घटना तेलंगणा राज्यातील करीमनगर जिल्ह्यातून समोर आली आहे. येथे एका 28 वर्षीय नराधम जावयाने आपल्या सासूचा चालत्या बाईकवर हेलमेटने डोक्यात प्रहार करून क्रूरपणे खून केला. या खळबळजनक घटनेनंतर आरोपीने पोलिसांना आणि कुटुंबीयांना दिशाभूल करण्यासाठी सासूचा मृत्यू हृदयविकाराच्या झटक्याने बाईकवरून पडल्यामुळे झाल्याचा बनाव रचला होता. मात्र, पोलिसांनी परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासले असता हा अपघात नसून थंड डोक्याने केलेला खून असल्याचे उघड झालं. या घटनेतील मृत महिलेची ओळख अरुणा असे असून, आरोपी जावयाचे नाव स्नेहित (वय 28वर्षे) आहे. स्नेहितने काही काळापूर्वी अरुणा यांची मुलगी कविता हिच्यासोबत प्रेमविवाह केला होता.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, 29 एप्रिल रोजी आरोपी स्नेहित हा आपली सासू अरुणा यांना बाईकवर मागे बसवून कुठेतरी घेऊन जात होता. बाईक चालवत असतानाच स्नेहितने अचानक आपल्या डोक्यातील हेल्मेट काढले आणि मागे बसलेल्या सासू अरुणा यांच्या डोक्यात अत्यंत जोराने मारले. या अचानक झालेल्या हल्ल्यामुळे अरुणा यांचा बाईकवरील समतोल सुटला आणि त्या चालत्या गाडीवरून थेट रस्त्यावर कोसळल्या. रस्त्यावर कोसळल्यामुळे अरुणा यांच्या डोक्याला आणि शरीराला गंभीर दुखापत झाली. त्यांना तात्काळ उपचारासाठी जवळच्या रुग्णालयात दाखल करण्यात आले, मात्र उपचारादरम्यान त्यांची प्राणज्योत मालवली. सासूचा मृत्यू झाल्यानंतर आरोपी स्नेहितने आपल्या गुन्ह्यावर पांघरूण घालण्याचा प्रयत्न सुरू केला. त्याने नातेवाईकांना आणि शेजाऱ्यांना सांगितलं की, अरुणा यांना बाईकवर असताना अचानक फिट्स आली आणि त्या चक्कर येऊन खाली पडल्या. सुरुवातीला सर्वांनी त्याच्या या सांगण्यावर विश्वास ठेवला.

## मुख्यमंत्री सहाय्यता निधीचा भक्ती विठोबाची, सेवा आरोग्याची उपक्रम



**मुंबई (दै. संध्या)**

आषाढी वारीच्या निमित्ताने पंढरपूरकडे पायी मार्गस्थ होणाऱ्या लाखो वारकऱ्यांच्या सेवेसाठी मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्षातर्फे 'चरण सेवा' उपक्रम यंदाही राबविण्यात येत आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून सुरू करण्यात आलेल्या या उपक्रमांतर्गत जिल्हा प्रशासन, शासकीय व खासगी वैद्यकीय महाविद्यालये, विविध आरोग्य संस्था, सेवाभावी संघटना तसेच स्वयंसेवक यांच्या समन्वयातून पालखी मार्गावरील मुक्कामाच्या ठिकाणी वारकऱ्यांच्या चरणसेवेला प्रारंभ झाला आहे. त्यात आरोग्य तपासणी, प्राथमिक उपचार आणि आरोग्य जनजागृतीच्या सुविधा उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत.

वारकऱ्यांसाठी राबविण्यात येणाऱ्या 'चरण सेवा' उपक्रमात सातारा, पुणे, सोलापूर, नाशिक, बुलढाणा, अकोला, जालना, बीड, नांदेड, धाराशिव आणि छत्रपती संभाजीनगर या ११ प्रमुख जिल्ह्यांचा समावेश आहे. पालखी मार्गावरील सुमारे ४०० विश्रांती व मुक्काम स्थळी वारकऱ्यांसाठी चरण सेवा, वैद्यकीय तपासणी, प्राथमिक उपचार तसेच आवश्यक आरोग्य सुविधा उपलब्ध करून दिल्या जातील.

मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्षाच्या समन्वयातून १२ हजारांहून अधिक प्रशिक्षित डॉक्टर, फिजिओथेरपिस्ट, परिचारिका, पॅरामेडिकल कर्मचारी, वैद्यकीय व फिजिओथेरपीचे विद्यार्थी तसेच स्वयंसेवक या उपक्रमात सहभागी होऊन वारकऱ्यांच्या सेवेसाठी कार्यरत असतील.

या उपक्रमांतर्गत औषधी आयुर्वेदिक तेलाद्वारे पायाची मालिश, फिजिओथेरपी, प्राथमिक उपचार, वैद्यकीय तपासणी तसेच आवश्यकतेनुसार पुढील उपचारासाठी संबंधित रुग्णालयांकडे संदर्भित करण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. यासाठी सुमारे ३ हजार लिटर आयुर्वेदिक तेलाची व्यवस्था करण्यात आली असून, गरजेनुसार पालखी मार्गावर रुग्णवाहिका सेवाही सज्ज ठेवण्यात आली आहे.

चरण सेवेसोबतच केंद्र व राज्य शासनाच्या विविध आरोग्य योजनांची माहिती, स्वच्छतेचे महत्त्व, संसर्गजन्य व पावसाळ्यातील आजारांपासून बचाव, निरोगी जीवनशैलीचा संदेश तसेच प्रतिबंधात्मक आरोग्यविषयक मार्गदर्शन ८ आरोग्य जनजागृती रथांच्या माध्यमातून पालखी मार्गावरील वारकरी आणि नागरिकांपर्यंत पोहोचविण्यात येणार आहे. तसेच, वारकऱ्यांच्या शारीरिक व मानसिक तंदुरुस्तीसाठी पालखी मार्गावरील निवडक ठिकाणी योगसत्रांचेही आयोजन करण्यात आले आहे.

गतवर्षी राबविण्यात आलेल्या 'चरण सेवा' उपक्रमाला वारकऱ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला होता. या उपक्रमाद्वारे सुमारे १ लाख ७५ हजार वारकऱ्यांना थेट चरण सेवा, वैद्यकीय तपासणी आणि उपचार सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या, तर १० लाखांहून अधिक नागरिकांपर्यंत आरोग्य जनजागृतीचा संदेश पोहोचविण्यात आला होता. यंदाही अधिकाधिक वारकऱ्यांपर्यंत चरण सेवा, वैद्यकीय सुविधा आणि आरोग्य जनजागृती प्रभावीपणे पोहोचविण्यासाठी व्यापक नियोजन करण्यात आले आहे.

### ३ हजार लिटर आयुर्वेदिक तेलाद्वारे मालिश

आषाढी वारीदरम्यान दररोज अनेक किलोमीटर पायी चालणाऱ्या वारकऱ्यांच्या पायांवर मोठा ताण येतो. पायांना सूज, वेदना, फोड, स्नायूंचा ताण व थकवा यांसारख्या समस्यांवर तात्काळ उपाययोजना उपलब्ध व्हाव्यात, यासाठी पालखी मार्गावरील मुक्कामाच्या ठिकाणी प्रशिक्षित वैद्यकीय पथके व स्वयंसेवक कार्यरत राहणार आहेत.

क्युआर स्कॅन करून दै. संध्याच्या युट्युब चॅनलला सबस्क्राईब करा
SUBSCRIBE
www.sandhyaepaper.com

### ढिंग-टांग




## १६ दिवसांत आरोपपत्र, ५५ हून अधिक साक्षीदार; ६० दिवसांत ऐतिहासिक निकाल

# नसरापूर प्रकरण : नराधमाला फाशीची शिक्षा

**पुणे (दै. संध्या)**



पुणे जिल्ह्यातील भोर तालुक्यातील नसरापूर येथे अवघ्या साडेतीन वर्षांच्या चिमुरडीवर पाशवी अत्याचार करून तिची निर्घृण हत्या करणाऱ्या भीमराव कांबळे (वय 65) या नराधमाला पुणे जिल्हा व सत्र न्यायालयाने आज (सोमवारी, 29 जून) मरेपर्यंत फाशीची शिक्षा सुनावली आहे. विशेष न्यायाधीश एस. आर. साळुंखे यांनी हा ऐतिहासिक निकाल दिला. विशेष म्हणजे, गुन्हा घडल्यापासून अवघ्या दोन महिन्यांत आणि खटल्याची सुनावणी केवळ 16 दिवसांत पूर्ण करून निकाल देण्यात आलेला हा राज्यातील पहिलाच आणि सर्वात जलदगतीने निकाली लागलेला खटला ठरला आहे.

चार दिवसांपूर्वी (25 जून) न्यायालयाने कांबळेला दोषी ठरवले होते, मात्र शिक्षेचा निर्णय राखून ठेवला होता. आज अंतिम निकाल देताना न्यायाधीशांनी नोंदवलेली निरीक्षणे अत्यंत हादरवून टाकणारी होती. निकालाचे वाचन करताना विशेष न्यायाधीश एस. आर. साळुंखे यांनी आरोपीच्या क्रूरतेवर कठोर शब्दांत ताशेरे ओढले.

हत्येनंतरही अत्याचार, फाशीही अपुरीच: "आरोपीने चिमुकलीला जिवंत राहण्याचा कोणताही पर्याय ठेवला नाही. तिच्यावर अमानुष अत्याचार केले, एवढेच नाही तर हत्येनंतरही त्याने तिच्या मृतदेहावर लैंगिक अत्याचार केले. अशा नराधमाला फाशीची शिक्षा देखील अपुरीच आहे."

क्रूरतेचा कळस: "मुलीच्या अंगावर तब्बल 18 जखमा होत्या. तिचा श्वास कोंडण्यासाठी तिची पँट तिच्या तोंडात 21 सेंटीमीटर आत कोंबण्यात आली होती. असहाय्य मुलीने अतोनात वेदना सहन केल्या."

दुर्मिळातील दुर्मिळ घटना" : "आरोपीने सुधारण्याची पातळी कधीच ओलांडली आहे. त्याचा पूर्व इतिहास पाहता (यापूर्वी 53 वर्षांचा असताना त्याने कुटुंबातील मुलीवर आणि एका वृद्धेवरही अत्याचार करण्याचा प्रयत्न केला होता) त्याला कोणताही पश्चात्ताप नाही. ही घटना 'दुर्मिळातील दुर्मिळ' श्रेणीत मोडते."

विशेष सरकारी वकील अजय मिसर यांनी या प्रकरणात आरोपीला फाशीची शिक्षा व्हावी यासाठी सर्वोच्च न्यायालयाच्या 12 निकालांचे दाखले दिले. या सर्व निकालांचे नसरापूरच्या घटनेशी साधर्म्य होते.

न्यायाधीशांनी अंतिम निकाल देताना 'निर्भया प्रकरण', 'बशर अली केस', 'शंकर खाडे केस' आणि 'बच्चन सिंग विरुद्ध स्टेट ऑफ पंजाब' या प्रकरणांचे दाखले दिले. "शांत डोक्याने कट रचून केलेली हत्या, गुन्ह्यातील क्रूरता आणि या घटनेमुळे समाजाला बसलेला धक्का हे सर्व घटक फाशीच्या शिक्षेसाठी पात्र ठरतात. स्वतःची वासना पूर्ण करण्यासाठी असहाय्य बालिकेसोबत केलेले हे कृत्य अमानवी आहे," असे न्यायालयाने स्पष्ट केले. या निकालादरम्यान न्यायालयाने पोलीस आणि तपास यंत्रणांच्या कामाचे तोंडभरून कौतुक केले. "गुन्हा घडल्यानंतर अवघ्या १६ दिवसांत पोलिसांनी भक्कम आरोपपत्र दाखल केले. उन्हाळ्याच्या सुट्टीतही कोर्टाने या खटल्याला पूर्ण वेळ दिला. 55 साक्षीदार तपासले गेले. डॉक्टर, सायबर तज्ज्ञ आणि फॉरेन्सिक टीमने वाखाणण्याजोगी कामगिरी केली. पोलिसांनी उत्कृष्ट तपास केल्याबद्दल ते अभिनंदनास पात्र आहेत."

"असा जलद न्याय मिळणे हे एक स्वप्न असते, जे सर्वच प्रकरणांत शक्य होत नाही. मात्र, या प्रकरणातील टीम वर्क आणि विशेष सरकारी वकिलांचा पाठपुरावा सर्वांसाठी एक आदर्श उदाहरण आहे," असे न्यायाधीश म्हणाले.

# विलास घुले प्रकरणात मुख्यमंत्र्यांनी स्वतः लक्ष घालावं

## *परळीकरांचे ऐकून खोटे आरोप करू नयेत; मनोज जरांगे पाटलांची मागणी*

**मुंबई (दै. संध्या)**



बीड जिल्ह्यातील टाकळी गावातील विलास घुले हत्या प्रकरणामुळे सध्या राजकीय आणि सामाजिक वातावरण चांगलंच तापलं आहे. या संपूर्ण प्रकरणावर आता मराठा आरक्षण आंदोलक नेते मनोज जरांगे पाटील यांनी अत्यंत महत्त्वाची आणि आक्रमक प्रतिक्रिया दिली आहे. विलास घुले हत्या प्रकरणात राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्वतः लक्ष घालावे, अशी मागणी मनोज जरांगे पाटील यांनी केली आहे. या प्रकरणाच्या चौकशीसाठी स्थापन करण्यात आलेल्या एसआयटीने (SIT) केवळ वरवरचा तपास न करता या संपूर्ण प्रकरणाच्या मुळाशी जाणे गरजेचं असल्याचं मत त्यांनी व्यक्त केलं.

घुले कुटुंबावर कोणत्याही प्रकारचा अन्याय होऊ देणार नाही, असा ठाम विश्वास जरांगे पाटील यांनी दिला. घुले प्रकरणाशी संबंधित एका महिलेने माध्यमांसमोर येऊन अत्यंत खळबळजनक दावे आणि आरोप केले होते. या सर्व घडामोडींनंतर मनोज जरांगे पाटील यांनी माध्यमांशी बोलताना ही महत्त्वाची प्रतिक्रिया दिली. मनोज जरांगे पाटील यांनी यापूर्वीच्या एका प्रकरणाचा दाखला देत पोलिसांच्या आणि एसआयटीच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. ते म्हणाले की, "यापूर्वी महादेव मुंडे प्रकरणात देखील एसआयटी स्थापन करण्यात आली होती. मात्र तिथे केवळ थातूरमातूर तपास झाला. या घुले हत्येच्या प्रकरणात एसआयटीला एकतर्फी काम करता येणार नाही. जर या प्रकरणात खासदार बजरंग सोनवणे यांचा मुलगा दोषी असेल तर सत्य काय आहे ते समोर येईलच. कायद्यानुसार जी कारवाई व्हायची ती होईल."

यावेळी मनोज जरांगे पाटील यांनी नाव न घेता राष्ट्रवादीचे नेते आणि माजी मंत्री धनंजय मुंडे यांच्यावर अप्रत्यक्षपणे जोरदार निशाणा साधला. आम्ही परळीवाल्यांसारखे आरोपी लपवत नाही. त्यांनी खून करूनही तो केला नाही असं म्हटलं. पण तशी नियत आमची नाही. आम्ही मराठे कधीही असं वागत नाही, असा टोला त्यांनी लगावला. घुले कुटुंबाला जर आमची मदत लागली तर आम्ही त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे आहोत. पण परळीवाल्यांचे ऐकून तुम्ही कोणावरही खोटे आरोप करू नका, असं जरांगे म्हणाले.

दरम्यान, या प्रकरणात ज्याच्या तक्रारीवरून गुन्हा दाखल करण्यात आला आहे, त्या उमेश मानेवर एका महिलेने आरोप केले आहेत. उमेश मानेने आपले आक्षेपार्ह व्हिडीओ काढून ब्लॅकमेल केले, शारीरिक संबंध ठेवले नाहीत तर नवरा आणि मुलांना मारून टाकू अशी धमकी दिल्याचा आरोप एका महिलेने केला आहे. उमेश माने हा मयत विलास घुलेचा मित्र असून त्याला मारण्यासाठी आलेल्या लोकांनी मध्ये आलेल्या विलास घुलेला मारहाण केली आणि त्यामध्ये त्याचा मृत्यू झाल्याची माहिती समोर येत आहे.

## संपादकीय

# विश्वासाच्या ठेवीवर अविश्वासाचा डल्ला !

अयोध्येत जाऊन प्रभू रामलल्लाचे दर्शन घ्यावे, ही इच्छा अनेक वर्षांपासून मनात होती. बाबरी मशीद अस्तित्वात असताना तेथे जाण्याचा योग आला होता. मात्र भव्य राममंदिर उभारल्यानंतर दर्शन घेण्याची संधी आता मिळाली. या प्रवासाचा आनंद मनात असतानाच रामलल्ला मंदिर न्यासाच्या निधीतील कथित आर्थिक गैरव्यवहाराच्या बातम्यांनी मन विषण्ण झाले. श्रद्धेच्या आधारावर उभारलेल्या मंदिरातील निधीबाबत निर्माण झालेल्या शंकांनी एकच प्रश्न समोर उभा केला. विश्वासाच्या ठेवीवर डल्ला नेमका कोणी मारला? लखनौहून अयोध्येकडे जाताना संपूर्ण रामजन्मभूमी आंदोलनाचा इतिहास डोळ्यांसमोर उभा राहिला. पुरातत्त्व विभागाने दिलेले पुरावे, न्यायालयीन प्रक्रिया आणि देशभर राबविण्यात आलेली शिलापूजन मोहीम आजही जनमानसात ताजी आहे. जगभरातील रामभक्तांनी स्वेच्छेने दिलेल्या योगदानातून उभे राहिलेले हे मंदिर श्रद्धेचे अद्वितीय प्रतीक आहे.

अयोध्येला प्रभू श्रीरामांचे जन्मस्थान मानले जाते. त्यामुळे येथे बालरूपातील रामलल्लाची मूर्ती प्रतिष्ठापित करण्यात आली आहे. या भव्य मंदिराच्या उभारणीत पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक मोहन भागवत यांचे योगदान महत्त्वपूर्ण मानले जाते. राममंदिर हा भारतीय जनता पक्ष आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या दीर्घकालीन भूमिकेचा केंद्रबिंदू राहिला आहे. रामराज्याच्या आदर्शातून न्याय, समता, उपेक्षितांचे कल्याण आणि सामाजिक सलोखा प्रस्थापित करण्याचा संदेश सातत्याने दिला गेला. मंदिरात प्रवेश करताच भव्य वास्तू, शिस्तबद्ध व्यवस्था आणि भक्तिमय वातावरण मनाला स्पर्शून गेले. बहुतांश बांधकाम पूर्ण झाले असून उर्वरित काम अंतिम टप्प्यात आहे. देशाच्या कानाकोपऱ्यातून आलेल्या भाविकांमध्ये महाराष्ट्रातील भक्तांची संख्या लक्षणीय होती. त्यांच्याशी संवाद साधताना एक गोष्ट प्रकर्षाने जाणवली—हे मंदिर सरकारी निधीतून नव्हे, तर सामान्य नागरिकांच्या दहा रुपयांपासून ते उद्योगपतींच्या कोट्यवधी रुपयांच्या देणगीतून उभे राहिले आहे. त्यामुळे या निधीबाबत गैरव्यवहाराच्या चर्चा समोर आल्याने भाविकांच्या भावना खोलवर दुखावल्या गेल्या आहेत.

अयोध्येतील अनेक नागरिकांशी संवाद साधताना काहींनी सांगितले की, काळाच्या ओघात बाहेरून आलेल्या काही व्यक्तींचा प्रभाव अनावश्यकरीत्या वाढला आणि त्यातूनच अनेक प्रश्न निर्माण झाले. काहींनी तिरुपती देवस्थानाच्या व्यवस्थापनाचा आदर्श समोर ठेवत तेथील पारदर्शक आर्थिक रचना अयोध्येतही स्वीकारायला हवी होती, असे मत व्यक्त केले. तिरुपतीमध्ये वरिष्ठ प्रशासकीय अधिकारी आणि स्वतंत्र आर्थिक समिती संपूर्ण कारभारावर लक्ष ठेवते. अयोध्येसाठीही अशाच व्यवस्थेचा विचार झाला होता, मात्र तो प्रत्यक्षात आला नाही, अशी माहिती मिळाली. सध्या या प्रकरणाची चौकशी विशेष तपास पथकाकडे असून काही अटकाही झाल्या आहेत. तसेच चंपत राय आणि डॉ. अनिल मिश्रा यांनी आपल्या पदांचा राजीनामा दिला आहे.

लखनौला परतताना मनात सतत एकच विचार घोळत होता—श्रद्धेचा गैरफायदा घेणारे खरे दोषी कोण? या प्रवासात दोन दिवस लखनौ शहरही जवळून अनुभवता आले. संस्कृती, कारागिरी, स्थापत्य आणि खाद्यसंस्कृती यांचा सुंदर संगम असलेले हे शहर प्रत्येक पर्यटकाला भुरळ घालते. येथील बडा इमामवाडा स्थापत्यकलेचा अद्वितीय नमुना आहे. १७८४ मध्ये अवधचे नवाब आसफ-उद्-दौला यांनी भीषण दुष्काळाच्या काळात लोकांना रोजगार मिळावा म्हणून या वास्तूची उभारणी सुरू केली. दिवसा गरीब कामगार काम करत, तर प्रतिष्ठा अबाधित राहावी म्हणून आर्थिकदृष्ट्या अडचणीत आलेल्या श्रीमंतांना रात्री काम दिले जाई. रोजगार आणि स्वाभिमान यांचा सुंदर समतोल साधणारी ही योजना त्या काळातील सामाजिक जाणिवेचे प्रतीक वाटते.

## संस्कृत सुभाषित

संपन्नतर मेवान्नं दारिद्रा भुज्जते सदा !
क्षुत्वादुतां जनयति सा चाढ्येषु सुदुर्लभा !!

अर्थ– गरीब लोक नेहमी अत्यंत चविष्ट अन्नाचे ग्रहण करतात. खूप कष्ट करपरूशन त्यांनी जी भूक लागते, त्या भुकेनेच त्यांचे अन्न स्वादिष्ट बनते. अन्नाची ही चव (कष्ट न करणाऱ्या) धनाढ्यांना दुर्लभ असते.

## गुरु वचन

### भक्ताचे समाधान

दक्षिण भारतात एक शेतकरी राहात होता. तो शेतीची कामे करण्यासह भक्तीमय पदेही रचत असे तसेच आजारी व निराधार लोकांची सेवाही करत होता. भगवान श्रीकृष्ण त्याचे आराध्यदेवत होते. भगवान श्रीकृष्णांच्या लिला असलेला ग्रंथ श्रीमद भागवताचे लोकभाषेत अनुवाद करायचा असे त्याने ठरविले होते. ज्यामुळे येथील लोक प्रभूंच्या लिलांचा आनंद घेऊ शकतील.

शेतकऱ्याने कितीतरी वर्षाच्या अथक परिश्रमाने भागवताचा अनुवाद पुर्ण केला. एका दिवशी एक विद्वान संत त्याच्या नगरीत प्रवचन देण्यासाठी आले. त्यांना शेतकऱ्यांच्या भक्तीरचना आवडलेल्या होत्या. त्यांनी भागवताच्या अनुवादाचे बाड पाहिले. तेव्हा त्यांना आश्चर्य वाटले ते म्हणाले की, या अनुवादाची भाषा समर्थ आणि सक्षम अशी आहे. तू अशा उत्कृष्ट भाषेचा वापर कसा काय केला. त्यांनी त्याला सल्ला दिला की या राज्यातील राजाला तू हा ग्रंथ भेट दे. ते खुप धार्मिक वृत्तीचे आहेत. शिवाय माझे मित्रही. माझ्या सांगण्याने ते तुला या ग्रंथासाठी योग्य असे बक्षीसही देतील. बक्षीसस्वरुपात तुला अनेक गावांची जहागिरीसुद्धा देऊ शकतात. भक्त कवी शेतकऱ्याने सांगितले, मी आपल्या शेतात कष्ट करून पिकविलेल्या पिके विकून माझ्या कुटुंबियांचे पालन पोषण करतो. यापेक्षा जास्त असलेले धन, संपत्ती माझ्या भक्तीमध्ये बाधा उत्पन्न करेल. व मी हा ग्रंथ भगवानांच्या पावनचरित्राला सर्वसामान्यापर्यंत पोहोचविण्यासाठी रचला आहे. धनदौलत व संपत्तीसाठी नाही. संत मग भक्त शेतकऱ्याची विरक्तीची भावना पाहुन आश्चर्यचकित झाले.

## उपदेशकथा

### ‘जादूगार’ नरेंद्र

स्वामी विवेकानंदांचे लहानपणीचे नाव होते नरेंद्र. तो शाळेत असतानाची ही गोष्ट. ‘सिरापिस’ नावाची एक ब्रिटिश युद्धनौका खिदरपूरच्या घाटावर नांगरून पडली होती. नरेंद्र आणि त्याच्या मित्रांच्या मनात आले की, आपण ती आतून पहावी पण त्यांना आत सोडणार कोण? मग एके दिवशी त्यांना कळले की, जवळच्या बंगल्यात राहणारा एक ब्रिटिश अधिकारी नौका पाहण्यासाठीच्या प्रवेशिका देतो. लगेच हे सगळे मित्र तेथे जाऊन पोहोचले पण बंगल्याचा रक्षक त्यांना आत जाऊ देईना, सगळी मुले त्याच्याभोवती गोळा होऊन त्याच्याशी हुज्जत घालू लागली पण तो कोणास दाद लागू देईना. एवढ्यात त्या बंगल्याच्या दारातून नरेंद्र हसत हसत आणि हातात प्रवेशिका नाचवित बाहेर आला. सगळ्यांनी एकच जल्लोष केला. रक्षक तर आश्चर्यचकितच झाला. त्याने नरेंद्राला विचारले, ‘काय रे, तू कसा काय आत घुसलास?’ त्यावर नरेंद्र त्याला म्हणाला, ‘तुम्हाला ठाऊक नाही – मी एक जादूगार आहे. मी अदृश्य झालो. आत गेलो आणि साहेबापुढे पुन्हा प्रकट होऊन प्रवेशिका घेऊन आलो.’ तो रक्षक आ वासून बघत असताना सर्वजण युद्धनौकेकडे जाण्यास निघाले. वाटेत मित्रांनी खरे काय झाले ते विचारल्यावर नरेंद्र त्यांना म्हणाला, ‘अरे कसली जादू अन् कसलं काय ! तुम्ही त्याच्याशी हुज्जत घालत होता तेव्हा माझ्या लक्षात आलं की, त्या बंगल्याला मागच्या बाजूलाही एक दार आहे म्हणून मग मी गुपचूप मागे जाऊन त्या दारानं साहेबांकडे गेलो आणि आणल्या प्रवेशिका !’

कथा उपदेश : वेळप्रसंगी युक्तीचा वापर केल्यास ती यशस्वी होते.

## पंचांग

| | |
|---|---|
| पंचांग | योग:ब्रह्म १५:१८:१८ |
| ३० जून २०२६ | करण:बालव १८:३३:४१ |
| मंगळवार | करण:कौलव (अहोरात्र) |
| विक्रम संवत्– २०८२ | सूर्य:मिथुन |
| निज ज्येष्ठ शके | चन्द्र:धनु |
| संवत्– १९४८ | हिजरी सन् – १४४८ |
| संवत्सर – पराभवनाम | मुस्लिम मास – मोहरम |
| अयन– दक्षिणयन | तारीख – १४ |
| मास– निज ज्येष्ठ | विशेष |
| ऋतु– सौर ग्रीष्म | गुरू हरगोविंदसिंह जयंती |
| कृष्ण पक्ष | पौर्णिमा समाप्ती |
| तिथि:प्रतिपदा (अहोरात्र) | पहाटे ०५.२६ |
| नक्षत्र:पूर्वाषाढा (अहोरात्र) | |

## दै. ‘संध्या’ धमाल सूडोकु क्र. ९९६

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | 3 | | | 1 | 8 | | 5 | |
| 2 | | | 6 | | | 1 | | |
| 4 | | | 7 | | | 8 | | 2 |
| 8 | | | 4 | 5 | | | 2 | |
| 1 | | 2 | 8 | | 3 | 9 | | 5 |
| | 7 | | | 2 | 9 | | | 8 |
| 3 | | 8 | | | 7 | | | 6 |
| | | 4 | | | 2 | | | 9 |
| | 2 | | 5 | 8 | | | 3 | |

### : सूडोकु :

खेळाचे नियम : प्रत्येक उभी लाइन, आडवी लाइन आणि ३–३ च्या वर्गात १ ते ९ पर्यंतची संख्या भरा. परंतु ही अट आहे की, नंबरची पुनरावृत्ति कोणत्याही उभ्या किंवा आडव्या लाइन आणि चौकानात आली नाही पाहिजे. प्रत्येक कोडयाचे केवळ एकच उत्तर आहे.या कोडयाला भरण्यासाठी आपण पेन्सिलचा आणि खोड रबराचा उपयोग केला तर ते आपल्यासाठी अधिक सुविधा जनक होईल.

– उत्तर उद्याच्या अंकात

### सूडोकु क्र. ९९५ चे उत्तर

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 5 | 1 | 9 | 3 | 7 | 8 | 2 | 4 | 6 |
| 8 | 4 | 3 | 5 | 6 | 2 | 7 | 1 | 9 |
| 2 | 6 | 7 | 4 | 9 | 1 | 8 | 3 | 5 |
| 1 | 3 | 6 | 2 | 4 | 9 | 5 | 7 | 8 |
| 7 | 8 | 2 | 1 | 5 | 6 | 4 | 9 | 3 |
| 9 | 5 | 4 | 7 | 8 | 3 | 6 | 2 | 1 |
| 4 | 9 | 1 | 6 | 2 | 5 | 3 | 8 | 7 |
| 3 | 2 | 5 | 8 | 1 | 7 | 9 | 6 | 4 |
| 6 | 7 | 8 | 9 | 3 | 4 | 1 | 5 | 2 |

## इतिहासात आजचा दिवस

### आंतरराष्ट्रीय

- १७५८ – डॉमस्टाटलची लढाई.
- १८०५ – मिशिगनला अमेरिकेचा प्रांत म्हणून मान्यता.
- १८९२ – बर्मिंगहॅममध्ये बेडकांचा पाऊस पडला.
- १९०५ – अल्बर्ट आईन्स्टाईन यांनी त्यांचा क्रांतिकारक सापेक्षतेचा सिद्धांत मांडला.

### राष्ट्रीय

- २००६ – हिमाचल प्रदेशाच्या घनहाटीच्या जवळ एक बस २५० फुट खोल दरीत कोसळून १७ जण ठार झाले, तर इतर २५ जण जखमी झाले.
- २००६ – भारताने पाकिस्तानच्या ३८ कैद्यांची तर पाकिस्तानने भारताच्या १९ कैद्यांची मुक्तता केली.

### जन्म

- १४७० – चार्ल्स आठवा, फ्रांसचा राजाचा जन्म.
- १९३३ – माईक स्मिथ, इंग्लिश क्रिकेटपटूचा जन्म.
- १९४१ – पीटर पॉलॉक, दक्षिण आफ्रिकेचा क्रिकेटपटूचा जन्म.
- १९५४ – पियरे चार्ल्स, डॉमिनिकाचा पंतप्रधानचा जन्म.
- १९६६ – अब्दुल अजीज (माईक टायसन), अमेरिकन मुष्टियोद्धाचा जन्म.
- १९६९ – सनत जयसुर्या, श्रीलंकेचा क्रिकेटपटूचा जन्म.
- १९७३ – दोड्डा गणेश, भारतीय क्रिकेटपटूचा जन्म.

### निधन

- १९१७ – दादाभाई नौरोजी, थोर नेता व अर्थशास्त्रज्ञ यांचे निधन.
- १९१९ – जॉन विल्यम स्टूट रॅले, ब्रिटीश भौतिकशास्त्रज्ञ व नोबेल पारितोषिक विजेता यांचे निधन.
- १९३४ – चिंतामणी नागेश रामचंद्र राव, भारतीय रसायनशास्त्रज्ञ यांचे निधन.

## : SMS :

Aapko Moon Pe Jana ho to Aap kis k Paas Jao gey? ISRO? NASA? No. Ranbir Kapoor k Paas. Kyon K Uske "POCKET mein Rocket" Hai.

## हवामानाचा अंदाज

| | | |
|---|---|---|
| औरंगाबाद | ३०.९ | २५.७ |
| अहमदनगर | ३४.१ | २४.९ |
| अकोला | ३८.६ | ३१ |
| अमरावती | ४०.१ | ३०.८ |
| बीड | ४३.५ | ३१.८ |
| भंडारा | ४२.२ | ३१.१ |
| बुलढाणा | ४७.३ | ३३.२ |
| चंद्रपूर | ४३.१ | ३२.७ |
| चेन्नई | ४३.४ | ३२ |
| नवी दिल्ली | ४६ | ३७ |
| धुळे | ३४.७ | २९.१ |
| गोंदिया | ४२ | २७.४ |
| जळगाव | ३७.४ | २९.८ |
| कोल्हापूर | ३२.६ | २३ |
| लातूर | ३५.१ | २५.७ |
| मुंबई | ३८.२ | ३३.७ |
| नागपूर | ४२.३ | २६.५ |
| नांदेड | ३७.७ | २९ |
| नंदूरबार | ३५.४ | २९.८ |
| नाशिक | ३५.५ | २४.६ |
| पुणे | ३२.३ | २३.७ |
| पंढरपूर | ३७.६ | २५.२ |
| सातारा | ३४.७ | २१.७ |
| सांगली | ३५.७ | २३.७ |
| सोलापूर | ३७.४ | २५.२ |
| वर्धा | ४२.२ | ३१.७ |

## आजचे राशिभविष्य

**मेष :** शुभ रंग: लाल, शुभ दिशा: उत्तर शुभकामाची रूपरेषा आखाल. राजकीय कामात यश मिळण्याचे योग आहेत.

**तूळ :** शुभ रंग :निळा, शुभ दिशा: दक्षिण जुन्या परिचित व्यक्तिची अचानक भेट होईल. मनोबलात वाढ होईल.

**वृषभ :** शुभ रंग: पिवळा, शुभ दिशा: पूर्व जोशपूर्वक कामात रस घ्याल. हुशार व्यक्तिची भेट होईल त्यामुळे फायदा होईल. मन प्रसन्न राहील. आपल्या वस्तू संभाळा.

**वृश्चिक :** शुभ रंग: जांभळा, शुभ दिशा:दक्षिण कामात यश मिळाल्याने आनंदी रहाल. प्रवास फायदेशीर असणार आहे.

**मिथून :** शुभ रंग: केसरी, शुभ दिशा: दक्षिण सामाजिक कामात यश व सन्मान मिळण्याचे योग आहे. पूर्ण मोबदला मिळेल.

**धनू :** शुभ रंग:लाल, शुभ दिशा: पूर्व कौटुंबिक सदस्याचे आपल्या विषयी मत चांगले राहील. काम करतांना वेळेचे बंधन राखा.

**कर्क :** शुभ रंग: हिरवा, शुभ दिशा: उत्तर मित्रांचे सहकार्य लाभेल. विचारपूर्वक काम केल्याने कामात यश मिळणार आहे. साथीदारांच्या कामावर लक्ष असू द्या.

**मकर :** शुभ रंग: हिरवा, शुभ दिशा: पूर्व विशेष काम होण्याचे योग आहेत. सहकार्यामुळे मन प्रसन्न राहील. सावधानी बाळगा.


**सिंह :** शुभ रंग: गुलाबी, शुभ दिशा:उत्तर मनमानीने काम या प्रवृत्तीमुळे नुकसान होण्याची शक्यता आहे. आर्थिक स्थिती खराब राहील.

**कुंभ :** शुभ रंग: केसरी, शुभ दिशा: पूर्व पूर्वी केलेल्या कामाचा चांगला परिणाम दिसेल. मुलांच्या बाबतीत भावनीक समस्या निर्माण होतील.

**कन्या :** शुभ रंग: पांढरा, शुभ दिशा: उत्तर कामकाजात आलेली समस्या आपल्या प्रयत्नामुळे दूर होईल. बाहेरील व्यक्तींच्या कामकाजावर विशेष लक्ष द्या.

**मीन :** शुभ रंग: गुलाबी, शुभ दिशा: पूर्व मागील स्मृती उजाळल्यामुळे दु:ख होईल. धार्मिक प्रवृत्तीत वाढ होईल. उच्च अधिकाऱ्यांच्या भेटी होतील.

## ‘दै. संध्या’ जम्बो शब्दकोडे क्र. ९९६



### आडवे शब्द

१. रक्षाबंधनाचा धागा
५. वैदूकडील औषध
८. अवहेलना
११. टप्प्याटप्प्याने केलेला प्रवास
१५. हिंदीत काका
१६. नाकात घालून मिरवण्याचा खास महाराष्ट्रीय दागिना
१७. मंत्रीमंडळ
१८. प्रसन्न होऊन दिलेली देणगी, आशीर्वाद
२१. (पाप) धुणे
२३. निवासस्थान
२४. तपकीर
२६. हावरटपणा
२८. विड्याच्या पानांची वेल, केशराचाही एक प्रकार
३०. अंगावर घालणे– --- करणे
३१. वाईट सवय
३३. बाजार
३४. व्यवस्था, काम पाहणे
३५. सुंकल्यापेक्षा मोठी
३७. वन, रान
३९. बाळभाषते पाणी
४१. चपळ
४३. अपशकुन
४४. हाताचा तळवा
४५. छोटी ताटली
४७. बाई
४९. सडसडीत
५१. बेत
५३. लक्षात येईल असे सांगणे
५५. लक्ष्मीचे एक नाव
५६. दुसऱ्यावर चटकन विश्वास ठेवणारा, भोळा शंकर
५७. तात्पर्य
५८. मासा पकडण्याचे साधन
६०. एखाद्याबद्दल झालेला मनाचा ग्रह
६१. अवाढव्य, भव्य
६३. दोन डोंगरांमधील खोलगट जागा
६४. विश्व, दुनिया
६५. वायू, वारा
६७. प्रताप
६८. अहिल्येचा उद्धार करणारा
६९. दक्षतेच्या इशारा
७०. अखेर
७१. मधली खोली
७३. गुरु–शिष्याचे नाते जोडणारा धागा
७४. देवकीचा भाऊ कृष्णाचा ----
७५. राजेशाहीतील देहदंडाची एक क्रूर पद्धत
७८. रागावला
७९. ताणलेल्या दोरीचा आवाज

### उभे शब्द

१. श्रीरामाचे स्तोत्रकवच
२. राग, चीड
३. हळू, सावकाश
४. मृत्यू नसलेला
५. कापडाला लावलेली चुणीदार पट्टी
६. अत्यंत घाबरणे (वाक्य प्रचार)
७. मिंधा
८. तुरेवाले फळ
९. रस्ता
१०. धमनी
१२. बारीकसारीक
१३. तापापूर्वीचे अंग मोडून येणे
१४. प्रवेशकराचे ठाणे
१९. पोते शिवण्याची सुई
२०. प्रेम, आपलेपणा
२२. अंगावरील बारीक केस
२५. पद्धत
२७. समाजातील वजन
२९. नड
३२. वृत्तपत्रातील कप्पा
३५. खंदक
३६. उलटीपूर्वीची स्थिती
३८. श्रेष्ठ नट
३९. कट्टा, चबुतरा
४०. सरसरीत
४१. हद्दपार
४२. पूर्ण भिजलेला
४४. लेखणी
४६. बाजू, काठ
४८. गबाळा
५०. तमाशा कलावंत
५१. बाभळीचा पायात रुतणारा
५२. खरेदी, विक्री
५४. माराची उमटलेली खूण
५६. संध्याकाळी देवापाशी केलेली तेलवात
५७. वर्ष, सन
५९. उदबत्ती
६२. हिंदीतील सावळी संध्याकाळ
६३. दरवळ
६४. जेव्हा (हिंदी)
६६. चिडणे, चीर पडणे
६७. पळून गेलेला
६८. किडनीच्या आकाराचा दाणा असणारे लाल कडधान्य
७१. नमुना
७२. चालत
७४. थरथर
७५. शंकर
७६. चरण
७७. कर्जाऊ रक्कम

### जम्बो शब्दकोडे क्र. ९९५ चे उत्तर

आडवे उत्तर : १.वर्तमानपत्र ५.अंगाईगीत ९.कल्पक ११.रास्त १२.गल १३.तरतूद १५.कवाड १८.सट १९.बाप २०.नाकावर बोट ठेवणे २३.मालक २४.रवरव २५.साल २६.नाडकर्णी २७.रवि २८.भांग ३०.कसर ३१.चकमक ३३.वडवानल ३५.दमणूक ३८.काणी ३९.रयत ४०.क्षयमास ४२.दाबणे ४३.नर ४५.हलका ४६.खबर ४८.गोदावरी ५०.मका ५१.लीनता ५४.सरासरी ५६.ओबडधोबड ५८.मी ५९.खल ६०.उपासक ६४.तळपाय ६५.अंत ६६.मनमुराद ६८.सलवार ७१.कोळी ७२.गांगायमुना ७४.सदा ७५.महाभारत ७६.दादा ७७.आनन

उभे उत्तर : १.वचक २.माकड ३.पराचा कावळा करणे ४.त्रस्त ५.अंग ६.गालबोट ७.गीत ८.तरसणे ९.कद १०.कर्णोपकर्णी १४.तूट १६.वानरविचका १७.आरसा १९.बालक २०.नार २१.बोलभांड २२.ठेचा २३.माड २६.नारद २९.गवाक्ष ३०.कलमा ३२.कणीदार ३३.वतनदार ३४.नयन ३६.महाकाली ३७.करविता ४१.सहकारी ४१अ.दु:ख ४४.रव ४७.बटबटीत ४९.रीस ५०.मसलत ५२.नवस ५३.मधोमध ५५.राख ५७.डळमळीत ६०.उपासना ६१.पायल ६२.कदरदान ६३.परागंदा ६५.अंक ६७.दगा ६९.वासन ७०.दहा ७१.कोर ७३.मुभा

RNI No. 1663/1957 (DAILY SANDHYA) |
दैनिक संध्या पब्लिकेशन्स प्रा. लि. यांच्या मालकीचे हे दैनिक मुद्रक व प्रकाशक ज्योती नाळे यांनी सामना प्रेस (प्रबोधन प्रकाशन) सिंहगड रोड, वडगांव खुर्द पुणे–४११०४१ येथे छापून, १०३८ आकार भवन, दुसरा मजला, टिळक रोड, पुणे – ४११००२ येथे प्रसिद्ध केले.
संपादिका : ज्योती नाळे (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) (फोन : ०२०–२४४७९२९२)
Daily “Sandhya” News paper is owned by Dainik Sandhya Publications Pvt. Ltd. Printed & Published by Jyoti Nale, Printed at Saamana Press (Prabodhan Prakashan) Pvt. Ltd. Sihagad Road, Vadgaon Khurd, Pune 411 041, published at 1038, Aakar Bhavan, Tilak Road, Pune 411002. Editor - Jyoti Nale.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### येरवडा येथील 'सखी' ग्रुपतर्फे पर्यावरणपूरक वटपौर्णिमा साजरी

■ कुंडीतील वटवृक्षाचे पूजन करून दिला पर्यावरण संवर्धनाचा संदेश

पुणे (दैनिक संध्या) : महाराष्ट्र हाउसिंग बोर्ड, येरवडा येथील महिलांच्या 'सखी' ग्रुपतर्फे वटपौर्णिमेचा सण यंदा पर्यावरणपूरक पद्धतीने उत्साहात साजरा करण्यात आला. निसर्ग संवर्धनाचा संदेश देत महिलांनी कुंडीतील वटवृक्षाचे विधिवत पूजन करून समाजासमोर एक आदर्श निर्माण केला. या उपक्रमासाठी सखी ग्रुपच्या वनिता जाधव यांनी पुढाकार घेतला. कार्यक्रमास अनुराधा शिवरात्री, वनिता देशमुख, सुजाता पाटील, स्वाती रणपिसे, सुवर्णा माने, सिंधू जायभाय, निर्मला जाधव, रत्ना महाजन, वनिता परिहार, प्रियांका तरटे, अनुपमा वाघमोडे, निलम रणपिसे, श्रद्धा जायभाय, सारिका मनू, स्नेहल मराठे आणि सुनिता जायभाय यांच्यासह अनेक महिला उपस्थित होत्या. वडाच्या फांद्या तोडून आणण्याऐवजी कुंडीत लावलेल्या वटवृक्षाचे पूजन करून महिलांनी पर्यावरण संवर्धनाचा संदेश दिला. उपस्थित सुवासिनींनी पारंपरिक वेशभूषेत सहभागी होत धार्मिक परंपरा आणि पर्यावरण संरक्षण यांचा सुंदर संगम घडवून आणला. पूजनानंतर हळदी-कुंकू समारंभ आणि परस्पर शुभेच्छा देत वटपौर्णिमेचा सण आनंदात साजरा करण्यात आला. यावेळी आयोजक वनिता जाधव म्हणाल्या, "पर्यावरणाचा समतोल राखणे आणि सणांचे पावित्र्य जपणे या दुहेरी उद्देशाने आम्ही हा उपक्रम गेली अनेक वर्ष सातत्याने राबवत आहोत." या अभिनव उपक्रमाला परिसरातील सखी ग्रुपच्या महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.




### "पोलीस मित्र संघटनेतर्फे पोलीसांसाठी आरोग्य तपासणी शिबिर"

पुणे (दैनिक संध्या) : धकाधकीचे जीवन असलेल्या पोलीसांची आरोग्य तपासणी व्हावी, या उद्देशाने महाराष्ट्र राज्य पोलीस मित्र संघटना आणि " विवान " फौंडेशनच्यावतीने शिवाजीनगर पोलीस स्टेशन येथे पोलीसांसाठी आरोग्य तपासणी शिबिर घेण्यात आले. त्यात १५० पोलीसांची आरोग्य तपासणी करण्यात आली. सहाय्यक पोलीस आयुक्त चंद्रकांत भोसले यांच्या हस्ते शिबिराचे उदघाटन करण्यात आले. या प्रसंगी वरिष्ठ पोलीस निरीक्षक गिरीश कुमार देगावकर, संघटनेचे अध्यक्ष राजेंद्र कपोते, नगरसेवक अपूर्व खाडे, पोलीस निरीक्षक अमर काळगे, पोलीस निरीक्षक जगताप, पोलीस निरीक्षक रणदिवे, 'विवान'च्या उषा धुमाळे-भालेराव उपस्थित होते. पोलिसांचे जीवन धकाधकीचे असते सण, उत्सव, मोर्चे, दंगली, नेत्यांचे दौरे, शांतता व सुव्यवस्था यासाठी त्यांना सतत जागरूक राहावे लागते. वाहतूक पोलिसांनाही रस्त्यावर ड्युटी करतांना धुरामुळे श्वसनाचे त्रास होतात. पोलिसांना स्वतःच्या आरोग्य तपासणीसाठी वेळ मिळत नाही आणि त्यातूनच पुढे गंभीर आजार उद्भवतात, हे लक्षात घेऊन पोलिसांनी आपल्या आरोग्याची काळजी घेणे गरजेचे आहे, त्यांनी नियमित आरोग्य तपासणी करावी, असे आवाहन संघटनेचे अध्यक्ष राजेंद्र कपोते यांनी या प्रसंगी बोलताना केले. या शिबिरात पोलीस अधिकारी, पोलीस कर्मचारी व वाहतूक पोलिस यांची दंत चिकित्सा, रक्तदाब, रक्तातील साखर, कर्करोग, नेत्र चिकित्सा आदी तपासण्या करण्यात आल्या. तसेच चष्म्याचे वाटप करण्यात आले. या आरोग्य तपासणीसाठी ताराचंद हॉस्पिटल व कस्तुरबा हॉस्पिटल यांनी सहकार्य केले.

### लांजाचा निलेश कुळये व पुण्याची तृप्ती भोसले सिंहगड एपिक ट्रेल मॅरेथॉनचे विक्रमी विजेते



पुणे (दैनिक संध्या) : वेस्टर्न घाट्स रनिंग फाउंडेशनच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या पाचव्या सिंहगड एपिक ट्रेल आंतरराष्ट्रीय मॅरेथॉन स्पर्धेत ४२ किलोमीटर गटात रत्नागिरी जिल्ह्यातील लांजा येथील निलेश कुळये आणि पुण्याच्या तृप्ती भोसले यांनी अनुक्रमे पुरुष व महिला गटात प्रथम क्रमांक पटकावत विक्रमी विजेतेपदावर नाव कोरले. सिंहगडाच्या पायथ्याशी शनिवारी (२७ जून) पार पडलेल्या या स्पर्धेत जगातील ५ देश, भारतातील २६ राज्ये आणि ६५ शहरांतील सुमारे १२०० धावपटूंनी सहभाग घेतला. छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्वराज्यासाठी प्राणार्पण करणारे सुभेदार नरवीर तानाजी मालुसरे, श्रीमंत कान्होजीराजे जेधे देशमुख, सरनोबत नरवीर पिलाजी गोळे तसेच सर्व शूर मावळ्यांना ही स्पर्धा समर्पित करण्यात आली होती. इंटरनॅशनल ट्रेल रनिंग असोसिएशनशी संलग्न असलेल्या या स्पर्धेत ११, २१, ३० आणि ४२ किलोमीटर अशा चार गटांमध्ये धावपटूंनी सिंहगडाच्या पाच विविध वाटांवरून आव्हानात्मक धाव पूर्ण केली. डोंगर-दऱ्या, चिखल, कडे-कपाऱ्या आणि दुर्गम वाटांमधून पार पडणाऱ्या या माउंटन ट्रेल मॅरेथॉनद्वारे पर्यावरण संरक्षण, गड-किल्ल्यांचे संवर्धन, पुरातन वास्तूंचे जतन आणि नियमित व्यायामाचा संदेश देण्यात आल्याची माहिती संस्थेचे अध्यक्ष दिग्विजय जेधे यांनी दिली. स्पर्धेची सुरुवात आणि समारोप सिंहगड रोपवे कार्यालयाजवळ झाला. उद्घाटन पुणे जिल्हा नियोजन अधिकारी किरण इंदलकर, वन विभागाचे महादेव मोहिते, पुरातत्त्व विभागाचे सहाय्यक संचालक विलास वाहणे, सिंहगड रोपवेचे अध्यक्ष उदयराज शिंदे, पुणे ग्रामीण पोलीस, पर्यटन विभागाचे अधिकारी, घेरा सिंहगड ग्रामपंचायतीचे पदाधिकारी आणि ग्रामस्थ यांच्या उपस्थितीत झाले. स्पर्धेच्या यशस्वी आयोजनासाठी वेस्टर्न घाट्स रनिंग फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष दिग्विजय जेधे, विश्वस्त अनिल पवार, मंदार मते, महेश मालुसरे, राजेश सातपुते, अमर धुमाळ, मारुती गोळे तसेच दौंड, मुळशी, हवेली, वेल्हा आणि पुणे शहरातील 'टीम डब्ल्यूजीआरएफ'च्या सुमारे ३५० स्वयंसेवकांनी दोन दिवस परिश्रम घेतले.

### थकीत कर्जवसुलीस गती देण्यासाठी सहकारी बँकांना पोलिस

पुणे (दैनिक संध्या) : राज्यातील सहकारी बँकांना थकीत कर्जवसुली करताना येणाऱ्या अडचणींची दखल राज्य सरकारने घेतली आहे. पोलिस व महसूल प्रशासनाच्या समन्वयातून वसुली प्रक्रियेला गती देण्याचे निर्देश गृह विभागाने दिले आहेत. जनसेवा सहकारी बँकेचे अध्यक्ष डॉ. राजेंद्र हिरेमठ यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे दिलेल्या निवेदनानंतर मंत्रालयात या संदर्भात उच्चस्तरीय बैठक पार पडली. अतिरिक्त मुख्य सचिव (गृह) मनीषा पाटणकर-म्हैसकर यांच्या अध्यक्षतेखाली ही बैठक झाली. कर्जवसुली दरम्यान तारण मालमत्तेचा प्रत्यक्ष ताबा मिळवण्यास होणाऱ्या विलंबामुळे बँकांचा 'एनपीए' वाढतो.

# लोककलावंतांना राजाश्रयाची गरज

## समरसता लोककला संमेलनामध्ये लोककलावंतांची मागणी




**पुणे (दै. संध्या)**

महाराष्ट्रामध्ये शेकडो वर्षापासून लावणी, तमाशा, गवळण ,भारुड, पोवाडा आदी विविध प्रकारच्या लोककला सादर होत आहेत. या लोककलांनी महाराष्ट्राचे जगणे आणि संस्कृती समृद्ध केले आहेत. या लोककला महाराष्ट्राची ओळख आणि वैभव झाले आहेत परंतु या कला सादर करणारे लोककलावंत मात्र अद्याप अनेक समस्यांना तोंड देत आहेत. लोककलावंत टिकले तरच खऱ्या अर्थाने लोककला टिकेल लोककलावंतांना आधार देण्यासाठी लोकांच्या पाठिंबाबरोबरच सरकारने आधार देऊन त्यांना राजश्रय देण्याची गरज आहे असे मत ज्येष्ठ लोककलावंतांनी केली.

महाराष्ट्र राज्य सांस्कृतिक संचालनालय आणि समरसता साहित्य परिषदेतर्फे पुण्यातील बालगंधर्व रंगमंदिर येथे आयोजित करण्यात आलेल्या पहिल्या समरसता लोककला संमेलनामध्ये जेष्ठ लोककलावंतांनी आपली भावना व्यक्त केली . ज्येष्ठ नृत्यांगना मंगला बनसोडे, सुरेखा पुणेकर, ज्येष्ठ गायक नंदेश उमप , जयमला इनामदार, पुणे विद्यापीठाच्या ललित कला केंद्रचे प्रमुख प्रवीण भोळे आदी चर्चासत्रामध्ये सहभागी झाले होते. प्रसन्न पाटील, धनंजय खुडे, निलेश गद्रे आदी यावेळी उपस्थित होते , अक्षय मोरे यांनी सूत्रसंचालन केले.

रघुवीर खेडकर म्हणाले, अत्यंत हलाखीच्या परिस्थितीमध्ये पन्नास वर्षांपूर्वी आम्ही लोककला जपली आणि ती समृद्ध केले. पूर्वी तमाशाचे शंभर परंतु संपूर्ण महाराष्ट्रामध्ये आता तमाशाचे केवळ दहा ते बारा फड राहिले आहेत लोककला या लोककलावंतांमुळे टिकले आहेत परंतु लोककलावंत जर आर्थिक अडचणीत असेल तर तो किती वर्ष लोककला आत्मसात करू शकतो त्यामुळे लोककला टिकण्यासाठी सरकारने लोककलावंतांना आधार देण्याची गरज आहे.

मंगला बनसोडे म्हणाल्या, जनतेने माझ्या कलेला कायम दाद दिली, जनतेच्या प्रेमामुळेच मी आज इथपर्यंत येऊ शकले. प्रेक्षकांनी मला जर प्रेम दिले नसते तर मी हा प्रवास करू शकले नसते. त्यामुळे प्रेक्षकांनी दिलेल्या प्रेमासाठी मी त्यांची आयुष्यभर ऋणी राहणार आहे.

सुरेखा पुणेकर म्हणाल्या लोककलावंतांच्या समस्या सरकार पुढे मांडण्याची गरज आहे परंतु सरकारच्या या संमेलनामध्येच स्वतः सरकारचे प्रतिनिधी उपस्थित राहिले नाहीत हा एक प्रकारे लोककलावंतांचा अपमान आहे. लोककलावंतांच्या समस्या सरकारने ऐकून घेतल्या नाहीत तर त्या कशा सुटतील. गेल्या अनेक वर्षांपासून लोककलावंत समस्यांशी संघर्ष करत आहेत. या समस्या शासन दरबारी मांडण्यासाठी लोक कलावंतांनी एकत्र येण्याची गरज आहे.

नंदेश उमप म्हणाले, लोककलावंतांनी आपली एकजूट दाखवून दिली पाहिजे. आपण जर एकत्र येऊन सरकार समोर आपल्या मागण्या मांडल्या तर त्या मागण्या निश्चितच मान्य होतील. मी शासन कमिटीचा सदस्य म्हणून लोककलावंतांच्या अनेक मागण्या आतापर्यंत सरकारसमोर मांडले आहेत आणि त्यापैकी अनेक मागण्या मान्य देखील झाल्या आहेत. जितेंद्र वाईकर यांनी सूत्रसंचालन केले.

प्रवीण भोळे म्हणाले ज्या लोककलावंतांनी शेकडो वर्ष महाराष्ट्राचे मनोरंजन केले परंतु समाजाने त्यांच्या पदरी काय टाकले हा विचार करण्याची गरज आहे. आज डिजिटलच्या युगामध्ये रंगमंचावरील कला नष्ट होत असताना लोक कलावंत एखाद्या अर्थाने हा महाराष्ट्राचा सांस्कृतिक ठेवा जपत आहेत यासाठी आपण त्यांचे आभार मानले पाहिजे त्यांच्या आर्थिक परिस्थितीमध्ये सुधारणा होण्यासाठी ज्या योजना आवश्यक आहेत त्या योजना लागू करून लोककलावंतांना पुन्हा एकदा सोन्याचे दिवस यावेत यासाठी सर्वांनी मिळून प्रयत्न केले पाहिजे.

## श्री. राजेंद्र पवार यांना राष्ट्रीय 'एमिनेंट इंजिनियर' पुरस्कार जाहीर

**पुणे (दै. संध्या)**



■ 'द इन्स्टिट्यूशन ऑफ इंजिनियर्स'कडून ऑगस्टमध्ये गौरव

महावितरण कंपनीचे संचालक (मानव संसाधन) श्री. राजेंद्र पवार यांच्या विद्युत क्षेत्रातील गेल्या ३७ वर्षांच्या योगदानाची दखल घेत 'द इन्स्टिट्यूशन ऑफ इंजिनियर्स' (भारत) संस्थेच्या वतीने त्यांना 'एमिनेंट इंजिनियर' हा देशपातळीवरील मानाचा पुरस्कार जाहीर झाला आहे. अमरावती येथे येत्या २१ व २२ ऑगस्टला आयोजित 'आयईआय'च्या ४१ व्या राष्ट्रीय विद्युत अभियंता अधिवेशनामध्ये संचालक श्री. राजेंद्र पवार यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात येईल. या दोन दिवसीय अधिवेशनात 'विकसित भारताचे ध्येय: एआय आणि हरित तंत्रज्ञानाद्वारे ऊर्जा क्षेत्राचा कायापालट' या विषयावर राष्ट्रीय चर्चासत्र होणार आहे. देशाच्या तांत्रिक प्रगतीमध्ये महत्त्वाचे योगदान देणाऱ्या व सर्वात मोठी व्यावसायिक संस्था असलेल्या 'द इन्स्टिट्यूशन ऑफ इंजिनिअर्स इंडिया'ची स्थापना १९२० मध्ये झाली आहे. कोलकाता मुख्यालय असलेल्या या संस्थेचे देशभरात १२५ पेक्षा अधिक स्थानिक केंद्र आहेत. श्री. राजेंद्र पवार यांनी विद्युत अभियांत्रिकीची पदवी घेतल्यानंतर महावितरणमध्ये कनिष्ठ अभियंता ते मुख्य अभियंता पदापर्यंत काम केले आहे. या ३६ वर्षांच्या कालावधीत प्रामुख्याने ग्रामीण भागातील दऱ्याखोऱ्यांसह घरगुती, शेती, व्यावसायिक व औद्योगिक क्षेत्रात नवीन वीजयंत्रणा उभारणे, नवीन वीजजोडण्या आणि सुरळीत वीजपुरवठ्यासाठी उल्लेखनीय कामे केली आहेत.

## चतुरस्त्र कवी विनोद अष्टुळ यांना महाराष्ट्र रत्न पुरस्कार प्राप्त

**पुणे (दै. संध्या)**



राजर्षी शाहू महाराज यांची जयंती व दलित पँथर संघटनेचे अध्यक्ष बापूसाहेब भोसले यांच्या वाढदिवसानिमित्त युवा महाराष्ट्र फाउंडेशन संस्था आणि आंतरराष्ट्रीय मानवाधिकार राजदूत संघटना यांच्यातर्फे पत्रकार भवन पुणे येथे राज्यस्तरीय महाराष्ट्र रत्न पुरस्कार २०२६, पत्रकार सन्मान सोहळा व पुरस्कार वितरण सोहळा आयोजित करण्यात आला होता. विचार पिठावर ह.भ.प.चेतनानंद महाराज पुणेकर, दलित पँथरचे अध्यक्ष बापूसाहेब भोसले, संस्थेचे संस्थापक अध्यक्ष डॉ.अविनाश संकुडे, चित्रपट महामंडळाचे सल्लागार ॲड.मंदार जोशी, पत्रकार संघाचे उपाध्यक्ष जाधव साहेब, एम.आय.टीचे डायरेक्टर थोरवेसाहेब असे इतर मान्यवर उपस्थित होते.

विनोद अष्टुळ यांनी मराठी भाषा संवर्धनासाठी गेल्या चौदा वर्षात सातत्याने दोनशे सव्वीस साहित्य सम्राट पुणे संस्थेच्या मार्फत मासिक कवी संमेलन, कवींचे वाढदिवस, वारीतील संमेलन, साहित्यिक श्रावण सहल, शब्दकोड दिवाळी, काव्यचित्र प्रदर्शन, आकाशवाणी सादरीकरण, मोफत ग्रंथपेढी, संयुक्त कवीसंमेलने, बहुभाषिक कवीसंमेलने, साहित्य सन्मान पुरस्कार असे नाविन्यपूर्ण उपक्रम उद्याने, मंदिरे, ग्रंथालये, दवाखाना, सुवर्णपेढी, अनाथ आश्रम, लहान मोठे सभागृहे, स्मशानभूमीतसुद्धा घेतले जात असून शाळा, कॉलेज आणि विविध उत्सवांसाठी शब्द बोले काळजाला हा विशेष उपक्रम राबविण्यात येतो. अष्टुळ यांनी सर्वांसाठी खुले आणि विनामूल्य असे व्यासपीठ निर्माण केले आहे. त्यामुळे अनेक नामवंत कवी लेखक आणि साहित्यिक निर्माण झाले आहेत. अष्टुळ हे सहकार, कामगार, आध्यात्मिक, कला आणि साहित्यिक अशा विविध क्षेत्रांमध्ये सातत्याने प्रामाणिकपणे विविध पदांवर कार्य करत आहेत. यामुळेच त्यांना आजवर अण्णाभाऊ साठे, छत्रपती संभाजी महाराज, अटल बिहारी वाजपेयी, कुसुमाग्रज, आद्यकवी कालिदास, कवी संजीव, महाराष्ट्र भूषण, मोहम्मद रफी, टॉप टेन कवी, चतुरस्त्र कवी आणि मनपा पुणे गुणवंत गौरव असे अनेक पुरस्कार प्राप्त झालेले आहेत. यांच्या कार्याचा आढावा घेऊन युवा महाराष्ट्र प्रतिष्ठान संस्थेने चतुरस्त्र कवी विनोद अष्टुळ यांना मान्यवरांच्या हस्ते महाराष्ट्र रत्न पुरस्कार २०२६ प्रदान केला आहे.

ह.भ.प.चेतनानंद महाराज पुणेकर यांनी आपल्या अमृतवाणीतून विविध क्षेत्रातील पुरस्कार्थींना माणूस, समाज आणि राष्ट्र जोडण्याचे काम करण्यासाठी सत्यातील ईश्वराची ओळख करून दिली. सर्व महामानव हे मानवतावादासाठीच झिजले असून त्यांच्या कार्याचा माणुसकी हा समान धागा आहे. त्यांना वेगळे न करता सर्वांनी त्यांचे कार्य आत्मसात करून प्रत्येकाने पुढील कार्य आनंदाने करावे. अशाप्रकारे महाराजांनी सर्वांना प्रबोधनात्मक शुभेच्छा दिल्या.

यावेळी सिने नाट्य अभिनेते प्रशांत बोगम, श्रीकृष्ण भिंगारे, गायक प्रशांत राठोड, गायिका श्रुतीका क्षीरसागर, विजय रणदिवे यांनी विशेष कौतुक केले.

कार्यक्रमाचे सूत्र संचालन गणेश मोढवे यांनी तर आभार बापूसाहेब भोसले यांनी व्यक्त केले.

## मेडिकव्हर हॉस्पिटल्स पुणेचा आणखी एक यशस्वी टप्पा

**पुणे (दै. संध्या)**

■ एका वर्षात 16 वे यशस्वी लिव्हर ट्रान्सप्लांट, 63 वर्षीय रुग्णाला मिळाले नवजीवन



प्रगत अवयव प्रत्यारोपण सेवांमध्ये आणखी एक महत्त्वपूर्ण यश संपादन करत मेडिकव्हर हॉस्पिटल्स, पुणे यांनी गेल्या एका वर्षातील सलग 16 वे यशस्वी लिव्हर ट्रान्सप्लांट पूर्ण केले आहे. या यशस्वी शस्त्रक्रियेमुळे यकृताच्या गंभीर आजाराने त्रस्त असलेल्या 63 वर्षीय रुग्णाला नवजीवन मिळाले असून तो आता निरोगी आणि सक्रिय आयुष्य जगत आहे.

सदर रुग्णाला 2023 मध्ये डिकॉम्पेन्सेटेड क्रॉनिक लिव्हर डिसीज (DCLD) असल्याचे निदान झाले होते. त्यांना तीव्र कावीळ, दोन्ही पायांमध्ये सूज आणि पोटात मोठ्या प्रमाणात पाणी साचणे (ॲसाइटिस) अशा गंभीर लक्षणांचा सामना करावा लागत होता. यकृताचे कार्य सातत्याने खालावत असल्यामुळे पोटातील अतिरिक्त द्रव काढण्यासाठी त्यांना महिन्यातून तीन ते चार वेळा 'ॲसाइटिक टॅपिंग' ही प्रक्रिया करावी लागत होती. रुग्णाच्या वैद्यकीय इतिहासात हृदयविकाराचाही समावेश होता. 2017 मध्ये त्यांच्यावर पर्क्युटेनियस ट्रान्सल्युमिनल कोरोनरी अँजिओप्लास्टी (PTCA) करण्यात आली होती. त्यामुळे लिव्हर ट्रान्सप्लांटपूर्वी त्यांची सखोल वैद्यकीय तपासणी आणि मूल्यांकन करण्यात आले. मेडिकव्हर हॉस्पिटल्स पुणे येथील यकृतरोगतज्ज्ञ, ट्रान्सप्लांट सर्जन, हृदयरोगतज्ज्ञ, भूलतज्ज्ञ आणि अतिदक्षता विभागातील तज्ज्ञांच्या बहुविद्याशाखीय टीमने रुग्णाचे परीक्षण करून त्यांना लिव्हर प्रत्यारोपणासाठी योग्य असल्याचे निश्चित केले.

त्यानंतर 21 मे 2026 रोजी रुग्णावर कॅडेव्हर लिव्हर ट्रान्सप्लांट यशस्वीरित्या करण्यात आले. शस्त्रक्रिया सुरळीत पार पडली आणि शस्त्रक्रियेनंतरच्या काळातही रुग्णाची प्रकृती स्थिर राहिली. प्रत्यारोपणानंतर रुग्णाच्या आरोग्यात लक्षणीय सुधारणा झाली.

## सिया गोयलच्या वकीलपत्रासाठी दोन वकिलांमध्ये पेटला वाद!

**पुणे (दै. संध्या)**

पुण्यातल्या लोहगडावरील खून प्रकरणामुळे संपूर्ण देशात संताप व्यक्त केला जात आहे. सिया गोयल या २० वर्षीय मुलीने आपल्या होणाऱ्या नवऱ्याचा खून का केला? याची कारणं पोलिस शोधत आहेत. त्यातच आता सियाच्या वकीलपत्रावरुन दोन वकिलांमध्ये वाद रंगल्याचं दिसून येतंय. पुण्यातले प्रसिद्ध वकील ॲड. विपूल दुशिंग यांचं म्हणणं आहे की, मी पोलिस ठाण्यात जाऊन सियाच्या वकीलपत्रावर सही आणलेली आहे, कुटुंबियांनी मलाच वकीलपत्र दिलेलं आहे. तर दुसरे वकील ॲड. श्रीवास्तव हेही पोलिस ठाण्यात जाऊन सही आणल्याचं सांगत आहेत. त्यामुळे खरं कुणाचं आणि खोटं कुणाचं? हे अद्याप स्पष्ट झालेलं नाही. सिया गोयल हिला कोर्टामध्ये दाखल करण्यापूर्वीच दोन वकिलांमध्ये वाद सुरु झाल्याचं दिसून येतंय. सिया आणि चेतनला पोलिसांनी लोहगडावर नेऊन सीन रिक्रिएशन केला होता. सिया आणि चेतन ही दोघं एकमेकांवर या घटनेचा दोष देत असल्याचं कळतंय. चेतनला नेमकं खाली ढकललं कुणी? यावरुन त्या दोघांमध्ये एकमेकांवर आरोप सुरु आहेत.

# भारतीय दर्शनशास्त्रातील विश्लेषणात्मक दृष्टीकोन अंगिकारा

**पुणे (दै. संध्या)**

■ डायनॅमिक भारत २०४७ साकारण्यासाठी कॉपी – पेस्ट मधून बाहेर पडा

■ प्राचीन इतिहास संशोधक नीलेश ओक यांचे प्रतिपादन

■ नागरीक सोशल फाऊंडेशन आयोजित विशेष व्याख्यान

पाश्चात्यांनी बिंबवलेल्या कालखंडाहूनही भारतीय उपखंडाचा इतिहास व संस्कृती प्राचीन आहे. आपल्या वेद, उपनिषदे, दर्शने तसेच महाकाव्यांतून मिळणारे खगोलशास्त्रीय पुरावे, त्यातील नेमकेपणा, प्रगत नौकानयन आणि समृद्ध कृषीक्षेत्र, याद्वारा प्राचीन भारतीय उपखंडाची समृद्धी अधोरेखित होते. दर्शनशास्त्रांत सांगितलेला वैज्ञानिक तसेच विश्लेषणात्मक दृष्टीकोन स्वीकारला, तर डायनॅमिक भारत २०४७ नक्कीच दृष्टीपथात येईल, असे प्रतिपादन प्राचीन भारतीय इतिहास संशोधक नीलेश ओक यांनी रविवारी सायंकाळी येथे केले. पाश्चात्त्यांचे तेवढे सगळे उत्तम, विज्ञानसिद्ध हे मानणारी कॉपी – पेस्ट पद्धत आपण सोडली पाहिजे आणि प्राचीन भारतीय ज्ञानपरंपरेचा मागोवा घेतला पाहिजे, असेही ते म्हणाले.



नागरीक सोशल फाऊंडेशनने ॲम्बिशन्स कॉमर्स इन्स्टिट्यूटच्या सहकार्याने आयोजित केलेल्या डायनॅमिक भारत २०४७ या विषयावरील विशेष व्याख्यानप्रसंगी ओक बोलत होते. याप्रसंगी ॲम्बिशन्सचे संचालक कौस्तुभ अत्रे, वक्ता विभाग प्रमुख दीपक मेहेंदळे,फाऊंडेशनचे विश्वस्त अमेय सप्रे, संचालक प्रीतम थोरवे, चंद्रशेखर यादव आदी मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते. भारतमातेच्या प्रतिमापूजनाने आणि पुष्कराज सप्रे यांनी गायिलेल्या वंदेमातरम् प्रार्थनेसह दीपप्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरवात झाली.

ओक यांनी भारतीय उपखंडाचा प्राचीनतम इतिहास तसेच कालखंडाचा नेमकेपणा, याविषयी पूर्वपक्ष आणि उत्तरपक्ष अशी मांडणी केली. गतानुगतिक वृत्तीचा त्याग करून, स्वतः अभ्यास करून, पुराव्यांची पडताळणी करून, प्रसंगी पुराव्यांचा शोध घेऊन आपल्या इतिहासाची, संस्कृतीच्या वैशिष्ट्यांची मांडणी तसेच पुनर्मांडणी करणे आवश्यक आहे, असे सांगून ओक म्हणाले, देशाला २०४७ चे स्वप्न साकारायचे असेल, तर पूर्वजांची ज्ञानप्राप्तीची ओढ, जिज्ञासा, विश्लेषणाची शास्त्रशुद्ध पद्धती, चिकित्सक दृष्टीचा समन्वय आधुनिक ज्ञानविज्ञान आणि तंत्रस्नेही अभ्यास, यांची आवश्यकता आहे.

ते पुढे म्हणाले, आपले वेद, महाकाव्ये यांचा कालखंड अलीकडचा होता, असे ठसविले जाते. प्रत्यक्षात आपली संस्कृती सर्वांत प्राचीन आहे आणि वेदांमधील नोंदी व उल्लेख, रामायण – महाभारतातील खगोलशास्त्रीय पुरावे, नक्षत्रांचे संदर्भ तपासले तर महाभारत युद्धाचा काळ इसवीसनपूर्व ५५६१ आणि रामायणातील नोंदींनुसार रामरावण युद्धाचा काळ १२ ते १४ हजार वर्षांपूर्वीचा आहे, हे सिद्ध होते. वाल्मीकी रामायणातील उल्लेखांनुसार सुग्रीवाने सीतेचा शोध घेण्यासाठी वानरपथके पाठवताना जे भूभाग व दिशांचा उल्लेख केला आहे, त्यावरून तत्कालीन भारतीयांना अंटार्टिका, आर्टिक प्रदेश, आल्प्स व अँडीज पर्वतरांगांची नेमकी माहिती होती, हे स्पष्ट होते. ज्ञानसाधनेसाठी संशय हवा, पण तो बुद्धीनिष्ठ असावा. श्रद्धा सात्विक असावी आणि जिज्ञासेला प्रयोजन हवे तरच आधुनिक काळात आपण जागतिक पातळीवर संशोधनाच्या क्षेत्रात योगदान देऊ शकू. हे साध्य करण्यासाठी तरुणाईने गीता, ज्ञानेश्वरीसह भारतीय दर्शनशास्त्रांचा आवर्जून अभ्यास केला पाहिजे, असेही ते म्हणाले.

स्वागतपर प्रास्ताविक अमेय सप्रे यांनी केले. सई धडफळे यांनी आभार मानले. स्नेहल दामले यांनी सूत्रसंचालन केले. उत्तरार्धात प्रश्नोत्तरेही झाली.

## थोडक्यात पण महत्वाचे...

### आषाढीवारीच्या पार्श्वभूमीवर आळंदीत सुरक्षा, स्वच्छता व शिस्तीवर भर

■ धर्मशाळा व मंगल कार्यालय चालकांची संयुक्त बैठक

आळंदी (दैनिक संध्या) : आगामी आषाढीवारीच्या पार्श्वभूमीवर आळंदी पोलीस स्टेशन हद्दीतील सर्व धर्मशाळा व्यवस्थापक तसेच मंगल कार्यालय मालक व चालक यांची संयुक्त आढावा बैठक पार पडली. लाखो वारकऱ्यांच्या आगमनाच्या पार्श्वभूमीवर घातपात प्रतिबंध, महिला सुरक्षा, वाहतूक नियोजन, स्वच्छता आणि पर्यावरण संवर्धन यावर बैठकीत विशेष भर देण्यात आला. बैठकीत वरीष्ठ पोलीस निरीक्षक बी.एस.नरके यांनी मार्गदर्शन करताना सांगितले की, वारी काळात सुरक्षा आणि शिस्त राखण्यासाठी सर्व संबंधितांनी प्रशासनाच्या सूचनांचे काटेकोर पालन करणे आवश्यक आहे. विशेषतः ४ जुलै ते ९ जुलै या कालावधीत धर्मशाळा व मंगल कार्यालयांमध्ये विवाह सोहळे आयोजित करू नयेत, असे स्पष्ट निर्देश देण्यात आले. महिला वारकऱ्यांच्या सुरक्षेला प्राधान्य देत मुक्कामस्थळी आवश्यक खबरदारी घेणे, संशयास्पद हालचाली दिसल्यास तातडीने पोलिसांना माहिती देणे.सीसीटीव्ही व्यवस्था कार्यान्वित ठेवणे आणि मुक्कामासाठी येणाऱ्या व्यक्तींची नोंद ठेवण्याबाबत सूचना करण्यात आल्या. मुख्याधिकारी माधव खांडेकर यांनी पाणीटंचाईची पार्श्वभूमी लक्षात घेऊन पाण्याचा काटकसरीने वापर करण्याचे आवाहन केले. तसेच धार्मिक कार्यक्रमांदरम्यान ध्वनी प्रदूषण होणार नाही याची दक्षता घेण्याच्या सूचना देण्यात आल्या. स्वच्छता आणि पर्यावरणपूरक वारीसाठीही बैठकीत महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले. शिल्लक अन्न रस्त्यावर टाकू नये किंवा इंद्रायणी नदी घाटावर वाटप करू नये, धर्मशाळांमध्ये मुक्कामादरम्यान दोन गटांमध्ये वाद निर्माण होणार नाहीत यासाठी व्यवस्थापकांनी सतर्क राहावे, असे स्पष्ट सांगण्यात आले. नगराध्यक्ष प्रशांत कुऱ्हाडे म्हणाले की परीसर स्वच्छ ठेवणे, कचऱ्याची योग्य विल्हेवाट लावणे आणि प्लास्टिक पत्रावळींचा वापर टाळण्याचे आवाहन करण्यात आले. तसेच माजी नगरसेवक डि. डि.भोसले म्हणाले की वारीतील दिंड्यांसोबत येणारी वाहने मुख्य रस्त्यांवर किंवा वाहतुकीस अडथळा ठरणाऱ्या ठिकाणी पार्क होणार नाहीत यासाठी विशेष नियोजन करण्याच्या सूचना देण्यात आल्या. यावेळी गटनेते सचिन उपस्थित होते. सर्व धर्मशाळा व मंगल कार्यालय चालकांनी प्रशासन व पोलिसांना पूर्ण सहकार्य करण्याची ग्वाही दिली.

### नायगाव येथे वटपौर्णिमा उत्सहात साजरी



पुरंदर (दैनिक संध्या) : पुरंदर तालुक्याच्या पुर्व भागातील श्री क्षेत्र नायगाव येथे वट पौर्णिमा निमित्त भाविकांनी श्री सिद्धेश्वर महाराज व माता जोगेश्वरी यांच्या दर्शनाचा लाभ घेतला. वट पौर्णिमेनिमित्त पहाटे पांडेश्वर येथून ग्रामस्थांनी आणलेल्या कऱ्हेच्या पाण्याने श्री सिद्धेश्वर महाराज व माता जोगेश्वरी यांना स्नान घालण्यात आले.हभप मधुसूदन महाराज सरस्वती (बीड) यांच्या सुश्राव्य किर्तनाचा भाविकांनी लाभ घेतला. त्यांनी अनेक उदाहरणे देऊन भाविकांना मंत्रमुग्ध केले.त्यांना हभप आबा महाराज बोरकर,चांगण महाराज,संतोष कोलते, धनंजय मोरे व मृदुंग साथ तेजस खेसे यांनी दिली.भजन साथ नायगाव भजनी मंडळाने दिली.विणेकरी हभप मधुकर चौंडकर होते. श्री सिद्धेश्वर महाराज व माता जोगेश्वरी यांची आकर्षक महापुजा पुजारी अरुण जगताप यांनी केली. अन्नदान पिंपरी चिंचवड येथील उद्योगपती विकास ताकवणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिकाच्या माजी नगरसेविका नंदाताई ताकवणे यांच्या वतीने करण्यात आले. वटपौर्णिमा असल्याने महिलांनी रंगीबेरंगी साड्या व अलंकार परिधान केले होते.वडाच्या झाडाचे पूजन करण्यासाठी महिलांनी आपल्या परिसरात व मंदिरा समोर असणारे वडाचे झाड त्याला प्रदक्षिणा घालून वट पौर्णिमा साजरी केली.पूजेसाठी लागणारे हळदी, कुंकू,ओटी सामान,दोरा,बांगडी,वस्त्रमाळ, आंबे, वस्त्र आदी साहित्य घेऊन वटवृक्षाला सात प्रदक्षिणा घालून महिला पूजा करीत होत्या.नवविवाहित तरुणींमध्ये उत्साह दिसून आला.वडाच्या झाडाला दोऱ्याचे सात फेरे बांधल्यानंतर पतीला दीर्घ आयुष्य लाभावे व जन्मोजन्मी हाच पती मिळावा म्हणून या झाडाचे हळदी कुंकवाने पूजन केले. मंदिर परिसराची स्वच्छता,लाईट,पाणी,दर्शनबारी आदिंची उत्तम व्यवस्था श्री सिध्देश्वर देवस्थान ट्रस्टच्या वतीने केल्याचे राहुल कड यांनी सांगितले.

### विधानपरिषद उपसभापती निवडणूक 1 जुलै रोजी जाहिर होणार

मुंबई (दैनिक संध्या) : राज्य विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनात विधान परिषदेच्या नव्या उपसभापतींची निवड केली जाणार आहे. विधान परिषदेचे सभापती राम शिंदे यांनी विधान परिषदेच्या उपसभापती पदाच्या निवडणुकीसाठी येत्या बुधवारी १ जुलै २०२६ तारीख जाहीर केली आहे. नुकत्याच पार पडलेल्या विधान परिषद निवडणुकीत शिवसेनेच्या ज्येष्ठ नेत्या तथा विधान परिषदेच्या माजी उपसभापती डॉ.नीलम गोऱ्हे या बिनविरोध निवडून आल्या आहेत. त्यामुळे त्यांचीच या पदावर वर्णी लागण्याची दाट शक्यता आहे. राम शिंदे म्हणाले, महाराष्ट्र विधान परिषदेच्या उपसभापतीचे पद रिक्त आहे. महाराष्ट्र विधान परिषद नियमातील नियम ७ मधील तरतुदीस अनुसरून मी उपसभपतीच्या निवडणुकीसाठी बुधवार,१ जुलै २०२६ हा दिवस निश्चित केला आहे. विधानसभेचे अध्यक्षपद आणि विधानपरिषदेचे सभापती पद भाजपाच्या खात्यात आहे. तर विधानसभेचे उपाध्यक्ष पद अजित पवार यांच्या राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाच्या खात्याकडे आहे. त्यामुळे विधानपरिषदेचे उपाध्यक्षपद शिंदे शिवसेनेकडे जाणार हे निश्चित मानले जात आहे. येत्या १ जुलै रोजी विधानपरिषद उपसभापतीची निवडणूक जाहिर होत आहे. पण विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहाला विरोधी पक्षनेते पद नाही. नियमानूसार मागणी करूनही महायुती सरकारने अद्याप दिलेलं नाही.

# महा ई-सेवा केंद्र चालकांचा शासनाविरुद्ध एल्गार

**१ जुलैपासून आझाद मैदानावर 'अर्धनग्न' आंदोलनाचा इशारा, लोणी काळभोरच्या अप्पर तहसीलदारांना दिले निवेदन**

लोणी काळभोर (दै. संध्या) :



शासनाकडून नव्याने सुरू करण्यात आलेले 'महासारथी पोर्टल', तसेच ग्रामपंचायत आणि महाविद्यालयीन स्तरावर दिलेले आयडी यामुळे राज्यातील हजारो महा ई-सेवा केंद्र चालकांवर उपासमारीची वेळ आली आहे. शासनाच्या या धोरणामुळे निर्माण झालेल्या तांत्रिक व आर्थिक समस्यांकडे लक्ष वेधण्यासाठी 'अखिल स्तरीय महा ई सेवा व आधार केंद्र संघटन' आक्रमक झाले आहे.

शासनाच्या या सुशिक्षित बेरोजगारविरोधी धोरणाचा तीव्र निषेध करण्यासाठी 'अखिल स्तरीय महा ई सेवा व आधार केंद्र संघटन' च्या वतीने लोणी काळभोर (ता. हवेली) येथील अप्पर तहसीलदार तृप्ती कोलते यांना मुंबईतील आझाद मैदानावर होणाऱ्या बेमुदत संपाबाबतचे अधिकृत निवेदन देण्यात आले.

या धोरणाविरोधात बुधवारी (ता. ०१जुलै) मुंबईतील आझाद मैदानावर धरणे आंदोलन आणि वेळ पडल्यास 'अर्ध नग्न धरणे आंदोलन' करण्याचा इशारा संघटनेने दिला आहे. याबाबत संघटनेचे अध्यक्ष डॉ. अमर पवार (ठाणे), कार्याध्यक्ष उमंग शहा (मुंबई) आणि सचिव विनोद तायडे (अमरावती) यांनी थेट मुख्यमंत्री, राज्यपाल आणि माहिती तंत्रज्ञान मंत्र्यांना पत्र पाठवून आपल्या मागण्या मांडल्या आहेत.

संघटनेने प्रसिद्ध केलेल्या पत्रकात म्हटले आहे की, प्रशासनाकडून नव्याने चालू झालेली व्हॉट्सअ‍ॅपवर शासकीय प्रमाणपत्र देण्याची योजना नागरिकांसाठी सोपी वाटत असली, तरी ती महा ई-सेवा केंद्र चालकांच्या मुळावर आली आहे.

राज्यात आधीपासूनच अधिकृत 'आपले सरकार सेवा पोर्टल' अस्तित्वात आहे. असे असतानाही ग्रामपंचायत स्तरावर आणि महाविद्यालयांमध्ये स्वतंत्र आयडी देण्यात आले आहेत.


आता त्यात भर म्हणून 'महासारथी पोर्टल' सुरू केल्याने अधिकृत केंद्र चालकांचा व्यवसाय पूर्णपणे कोलमडणार आहे.

राज्यातील लाखो सुशिक्षित बेरोजगार तरुणांनी महा ई-सेवा केंद्रे उभी केली आहेत. शासनाच्या या नव्या समांतर धोरणांमुळे केंद्र चालकांच्या थेट उपजीविकेवरच कुऱ्हाड कोसळली असून, त्यांचे कुटुंब रस्त्यावर येण्याची भीती निर्माण झाली आहे. या गंभीर परिस्थितीची दखल शासनाने तात्काळ घ्यावी, अन्यथा 1 जुलैपासून संपूर्ण महाराष्ट्रातील केंद्र चालक मुंबईत आंदोलन छेडतील, असा इशारा पत्राद्वारे देण्यात आला आहे.

दरम्यान, पूर्व हवेलीतील केंद्र चालकांनी लोणी काळभोर येथील अप्पर तहसीलदार कार्यालयावर धडक दिली. हे निवेदन देताना 'अखिल स्तरीय महा ई सेवा व आधार केंद्र संघटन' महाराष्ट्र राज्याचे पुणे जिल्हा निरीक्षक राज गायकवाड, पुणे जिल्हा अध्यक्ष दादासाहेब गायकवाड आणि सचिव गणेश ठोंबरे, राजेश केरकर, सुभाष काळभोर, समीर सावंत व इतर महा ई सेवा केंद्र सदस्य उपस्थित होते.

## पहिल्याच विक्रीत दोन्ही भ्रमणध्वनींची विक्रमी विक्री; पुढील विक्रीची घोषणा

नवी दिल्ली (दै. संध्या) :




एआय प्लस स्मार्टफोन कंपनीच्या नोव्हा २ निओ आणि नोव्हा २ प्रो या नव्या भ्रमणध्वनींना ग्राहकांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला असून, २६ जून रोजी झालेल्या पहिल्याच विक्रीत दोन्ही उपकरणांचा संपूर्ण साठा संपला. यानंतर कंपनीने ३० जून रोजी दुपारी १२ वाजता पुढील विक्री सुरू होणार असल्याची घोषणा केली आहे.

हे दोन्ही भ्रमणध्वनी २२ जून रोजी आयोजित करण्यात आलेल्या 'इंडियाज गॉट नोव्हा' या विशेष सादरीकरण सोहळ्यात सादर करण्यात आले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन तंत्रज्ञान क्षेत्रातील तज्ज्ञ राजीव मखनी यांनी केले. यावेळी विनोदवीर व दृकश्राव्य माध्यम निर्माते समय रैना तसेच एआय प्लस स्मार्टफोनचे मुख्य कार्यकारी अधिकारी माधव शेठ उपस्थित होते. कंपनीच्या मुक्त परीक्षण उपक्रमाअंतर्गत तंत्रज्ञान अभ्यासक, समीक्षक, प्रसारमाध्यमांचे प्रतिनिधी आणि ग्राहकांनीही सहभाग घेतला. नोव्हा २ निओ आणि नोव्हा २ प्रो हे भ्रमणध्वनी प्रथमच पाचव्या पिढीच्या दूरसंचार सेवेचा वापर करणाऱ्या ग्राहकांपासून ते अधिक सक्षम आणि विश्वासार्ह उपकरण शोधणाऱ्या वापरकर्त्यांपर्यंत सर्वांना लक्षात घेऊन विकसित करण्यात आले आहेत. नव्या प्रणालीवर आधारित स्वच्छ वापर अनुभव, विश्वासार्ह कार्यक्षमता आणि दीर्घकाळ टिकणारी बॅटरी ही त्यांची प्रमुख वैशिष्ट्ये आहेत. याबाबत प्रतिक्रिया व्यक्त करताना एआय प्लस स्मार्टफोनचे मुख्य कार्यकारी अधिकारी तथा एनएक्सटी क्वांटम शिफ्ट टेक्नॉलॉजीजचे संस्थापक माधव शेठ म्हणाले, "नोव्हा २ निओ आणि नोव्हा २ प्रो यांना मिळालेला प्रतिसाद अत्यंत उत्साहवर्धक आहे. पहिल्याच विक्रीत दोन्ही उपकरणांचा संपूर्ण साठा संपल्याने ग्राहकांचा आमच्यावरील विश्वास अधिक दृढ झाला आहे. परवडणाऱ्या किमतीत उत्कृष्ट कार्यक्षमता, आकर्षक रचना आणि स्वच्छ वापर अनुभव देण्याच्या आमच्या प्रयत्नांना ग्राहकांनी भरभरून प्रतिसाद दिला आहे. पुढील विक्रीत आणखी अनेक ग्राहकांपर्यंत नोव्हा मालिकेचा अनुभव पोहोचेल, अशी आम्हाला अपेक्षा आहे." नोव्हा २ निओमध्ये मीडियाटेक डायमेन्सिटी ६३०० संच, १२० हर्ट्झ क्षमतेचा उच्च दर्जाचा पडदा, ६,००० मिलीअँपिअर तास क्षमतेची बॅटरी आणि नव्या प्रणालीवर आधारित कार्यप्रणाली देण्यात आली आहे.

## सत्यमेव जयते फार्मर कप स्पर्धेसाठी पुरंदर तालुक्यातील ५८ गट सज्ज

जेजुरी (दै. संध्या) :



**मुख्यमंत्र्यांनी केला ऑनलाइन स्पर्धेचा शुभारंभ**

गेली दहा वर्षांहुन अधीक काळ राज्यातील शेतकऱ्यांच्या सक्षमीकरणासाठी विशेष काम करणाऱ्या पाणी फाउंडेशनच्या "सत्यमेव जयते फार्मर कप २०२६" या स्पर्धेचा शुभारंभ राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते आभासी पद्धतीने करण्यात आला .राज्याचे कृषिमंत्री दत्तात्रय भरणे, पाणी फाउंडेशनचे अमीर खान या प्रसंगी उपस्थित होते.

पुरंदर पंचायत समिती येथे पाणी फाउंडेशन, उमेद व शासनाचा कृषी विभाग यांच्या वतीने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. तालुक्यातून ५८ शेतकरी गटांनी या स्पर्धेत भाग नोंदवला आहे.

आपल्या मनोगतात मुख्यमंत्री फडणवीस यांनी पाणी फाउंडेशनचे विशेष आभार मानत या स्पर्धेसाठी पर्याप्त निधी दिला जाईल असे सांगितले.अलनिनो मुळे हे वर्ष संकटाचे आहे परंतु हे आव्हान स्वीकारून वाटचाल केली तर पुढील काळ चांगला आहे याच काळात जलसंधारण कामाला गती द्या, तुमच्या प्रयत्नामुळे पुढील काही वर्षात शेती क्षेत्र परावर्तीत होईल व त्याचे सर्व श्रेय तुम्हांला जाणार आहे असे सांगत मुख्यमंत्र्यानी कप जरी जिंकला नाही तरी तुम्ही विनर आहात असे सांगितले.

कृषीमंत्री भरणे व अमीरखान यांनीही मनोगतातुन शुभेच्छा दिल्या या कार्यक्रमास तालुक्यातून विविध गावचे शेतकरी गट विशेषतः महिला गट, ग्रामसखी, पुणे कृषी विद्यापिठाच्या विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.या कार्यक्रमात अंजीर व सीताफळ संशोधन केंद्राचे शास्त्रज्ञ डॉ युवराज बालगुडे यांनी मार्गदर्शन केले. पाणी फाउंडेशनचे तालुका समन्वयक मयुर साळुंके, कृषी अधिकारी संदीप कदम, अतुल हिंगणे, उमेदच्या अभियान व्यवस्थापक नंदा कुर्डे प्रभाग समन्वयक गणेश किकले यांनी या कार्यक्रमाचे आयोजन केले

## चाकण येथे संतोषशेठ वाव्हळ यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव

चाकण (दै. संध्या) :



चाकण येथील यंग जॉली क्लबचे मार्गदर्शक व प्रसिद्ध बांधकाम व्यावसायिक अतिशय संयमशील नेतृत्व आणि आमचे परम कर्तबगार मित्र संतोषशेठ वाव्हळ यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव करण्यात आला. संतोषशेठ वाव्हळ यांना वाढदिवसानिमित्त राजगुरुनगर सहकारी बँकेचे अध्यक्ष व विद्यमान संचालक सागरभाऊ पाटोळे यांनी सदिच्छा व शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी दुर्गाई हृदय प्रतिष्ठानचे सचिव राजेंद्र शिंदे, उद्योजक विष्णू कड, भाजपा नेते सूर्यकांत बारणे, सुधीर वाघ, संदीप परदेशी आदींसह चाकणकर ग्रामस्थ, उद्योजक, व्यापारी, व्यवसाईक, तरुण कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. भारतीय जनता पार्टी खेड तालुक्याच्या वतीने उद्योगपती संतोषशेठ वाव्हळ यांचा वाढदिवस अत्यंत उत्साहात व दिमाखात साजरा करण्यात आला. उद्योजक विष्णु कड व सागर पाटोळे यांनी यावेळी आपल्या मनोगतातून संतोषशेठ वाव्हळ यांच्या कार्याचा गौरव केला. भाजपाचे खेड तालुका उपाध्यक्ष सूर्यकांत उर्फ आप्पा ज्ञानेश्वर बारणे यांनी सर्वांचे आभार मानले.

## उत्पन्न वाढवा, अन्यथा कारवाईला सामोरे जा : प्रताप सरनाईक

मुंबई (दै. संध्या) :

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या (एसटी) उत्पन्नात अपेक्षित वाढ करण्यात अपयशी ठरणाऱ्या अधिकाऱ्यांवर कठोर कारवाईचा इशारा देत परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी सर्व स्तरावरील अधिकाऱ्यांना एक महिन्याचा अल्टिमेटम दिला आहे. या कालावधीत उत्पन्न वाढीसाठी ठोस परिणाम दिसून आले नाहीत, तर संबंधित अधिकाऱ्यांवर बदली, पदावनती अथवा निलंबनासारखी कठोर शिस्तभंगाची कारवाई करण्यात येईल, असे त्यांनी स्पष्ट केले आहे.

मंत्री सरनाईक म्हणाले की, एसटी ही केवळ वाहतूक सेवा नसून राज्यातील सर्वसामान्यांची जीवनवाहिनी आहे. शासनाने कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित आर्थिक मागण्या मान्य करून मोठा दिलासा दिला आहे. त्यामुळे आता व्यवस्थापन आणि अधिकारी वर्गानेही आपल्या जबाबदारीचे भान ठेवून उत्पन्न वाढीसाठी जास्तीत जास्त प्रयत्न करणे आवश्यक आहे. केवळ बैठका घेऊन किंवा कागदोपत्री नियोजन करून चालणार नाही, तर प्रत्यक्ष परिणाम दिसला पाहिजे. यंदाच्या एप्रिल आणि मे महिन्यात, भाडेवाढ लागू असूनही एसटीला मोठा तोटा सहन करावा लागला आहे.

**पुणे जिल्हा परिषद, बांधकाम विभाग (दक्षिण)**

**ई - निविदांतर्गत खुली बी १ निविदा सुचना क्रं. १४ सन २०२६-२७**

पुणे जिल्हा परिषद, नवीन प्रशासकीय इमारत, वेलस्ली रोड, कॅम्प पुणे-१ यांच्या वतीने अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, पुणे जिल्हा परिषद, पुणे यांचे तर्फे पुरंदर - १ एकूण - १ कामांची ई-निविदा http:mahatenders.gov.in या संकेतस्थळावर **दि. २९/०६/२०२६ रोजी दु. १२.०० वा.** प्रसिध्द करणेत आल्या आहेत. ई निविदेबाबत संपूर्ण माहिती http:mahatenders.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध करुन देणेत आलेली आहे.

सही/-
कार्यकारी अभियंता (दक्षिण)
जिल्हा परिषद, पुणे

सही/-
अति. मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद, पुणे

जा.क्र. जि. प. बांध/ले-६/१११/२०२६
पुणे दि. २९/०६/२०२६

# आषाढी वारीनिमित्त येरवडा खुले कारागृहात कीर्तन महोत्सव

पुणे (दै. संध्या) :

■ विठ्ठलनामाच्या गजराने परिसर दुमदुमला



महाराष्ट्र कारागृह विभागाच्या "सुधारणा व पुनर्वसन" या ब्रीदवाक्याला अनुसरून येरवडा खुले कारागृह प्रशासनाकडून बंदीबांधवांसाठी विविध धार्मिक, सांस्कृतिक, सामाजिक, प्रबोधनात्मक व मनोरंजनात्मक उपक्रम सातत्याने राबविले जातात. त्याचाच एक भाग म्हणून आषाढी वारीनिमित्त शनिवारी (२७ जून) येरवडा खुले कारागृह येथे महाराष्ट्र राज्य पोलीस सेवा मंडळाच्या सहकार्याने भव्य कीर्तन महोत्सव आयोजित करण्यात आला.

हा उपक्रम अपर पोलीस महासंचालक तथा महानिरीक्षक (कारागृह व सुधारसेवा) डॉ. सुहास वारके यांच्या संकल्पनेतून साकार झाला. विशेष कारागृह महानिरीक्षक योगेश देसाई आणि कारागृह उपमहानिरीक्षक (पश्चिम विभाग) सुनील ढमाळ यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन करण्यात आले.

सायंकाळी चार ते साडेसहा या वेळेत पार पडलेल्या या महोत्सवात आनंदगड संस्थान (कोळगाव डोळस, करंजावणे) येथील ह.भ.प. स्वप्निल महाराज दौंडकर यांनी प्रबोधनपर कीर्तन सादर केले. त्यांच्या ओजस्वी निरूपणातून भक्ती, नैतिक मूल्ये आणि आत्मपरिवर्तनाचा संदेश देण्यात आला.

कीर्तनादरम्यान "ज्ञानोबा-तुकाराम" आणि विठ्ठल नामाच्या अखंड गजराने संपूर्ण कारागृह परिसर भक्तिमय वातावरणाने भारावून गेला. या कार्यक्रमात १६५ बंदीबांधवांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. कीर्तनातील विचार आणि संदेशांनी उपस्थित सर्वजण मंत्रमुग्ध झाले.

कार्यक्रमाला संगीताचीही उत्कृष्ट साथ लाभली. संगीत विशारद ह.भ.प. अमोल महाराज जाधव आणि ह.भ.प. जयराम महाराज यांनी गायनाची, तर मृदंग विशारद ह.भ.प. राहुल महाराज जाधव यांनी मृदंगाची सुरेल साथ दिली.

या प्रसंगी येरवडा खुले कारागृहाचे अधीक्षक शामकांत शेडगे, वरिष्ठ तुरुंगाधिकारी नागेश कांबळे, महाराष्ट्र राज्य पोलीस सेवा मंडळाचे सचिव सुमीत दरंदले, मंडळाच्या आध्यात्मिक विभागाचे अध्यक्ष ह.भ.प. शेखर सत्यवान लोखंडे आणि उपाध्यक्ष ह.भ.प. तुषार गोरक्षनाथ आल्हाट यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी वरिष्ठ तुरुंगाधिकारी नागेश कांबळे, नागनाथ भानवसे, सुनील गायकवाड, बालाजी सावंत, राजेंद्र धनगर, प्रकाश भोसले, विजयकुमार दिवेकर, तोसिफ शेख, राकेश पवार, वैभव पाटील, याकुब शेख, निलेश मांढरे, सरला साबळे, सुरेखा म्हेत्रे, शैला कदम, मोनिका लांडगे तसेच कारागृह प्रशासनातील सर्व अधिकारी, कर्मचारी आणि बंदीबांधवांनी विशेष परिश्रम घेतले.

**सासवड नगरपरिषद कार्यालय**
सासवड, ता. पुरंदर, जि. पुणे
Email ID-saswadme@gmail.com फोन नं. ०२११५-२२२३४९,२२२४३७

जा. क्र :- २३२४/२०२६ दिनांक : २९/०६/२०२६

सासवड नगरपरिषदेच्या आरोग्य विभागासाठी आरोग्य निरीक्षक पदाकरीता कंत्राटी स्वरूपात सेवा घेणेसाठी द्वी लिफाफा सीलबंद निविदा दर मागविण्यात येत आहे. कोऱ्या निविदा फॉर्म दि. ३०/०६/२०२६ ते दि.०६/०७/२०२६ पर्यंत सुट्टीचे दिवस सोडून कार्यालयीन वेळेत संबंधित विभागाकडे रोखीने विकत मिळतील. तरी इच्छुक कंत्राटदाराने निविदा फॉर्म रितसर भरून सीलबंद पाकिटात लिफाफा क्र. २ मध्ये सादर करावी. लिफाफा क्र. १ मध्ये जी निविदा भरलेली असेल त्याचा स्पष्ट उल्लेख व निविदा फॉर्ममध्ये नमुद आवश्यक कागदपत्रे इ. सह बयाणा रक्कम भरल्याची पावती क्रमांकासह लिफाफ्यावर नमूद करावा. सदरची भरलेले निविदा फॉर्म दि. ०७/०७/२०२६ अखेर सायंकाळी ४.०० वाजेपर्यंत समक्ष पोहोच करावे. तसेच कोणतीही निविदा अंशतः अथवा पूर्णपणे स्विकारण्याचा किंवा नाकारणेचा अधिकार सासवड नगरपरिषदेने राखून ठेवलेला आहे. टपालाने पाठविलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

| अ. क्र. | तपशील | बयाणा रक्कम | निविदा फॉर्म किंमत |
|---|---|---|---|
| १ | सासवड नगरपरिषद आरोग्य विभागासाठी आरोग्य निरीक्षक पदाकरीता कंत्राटी स्वरूपात सेवा घेणे. (सन २०२६-२७) | २०००/- | ५००/- |

शिक्का

सही/-
(डॉ. कैलास चव्हाण)
मुख्याधिकारी

सही/-
(आनंदीकाकी चंदुकाका जगताप)
नगराध्यक्षा

सासवड नगरपरिषद, सासवड

## थोडक्यात पण महत्वाचे...





### पिंगळे रोडवरील धोकादायक वीज फिडर बॉक्स हटविण्यात यावा

■ नगरसेवक यश साने यांचे महापालिकेला निवेदन

पिंपरी (दैनिक संध्या) : चिखली परिसरातील पिंगळे रोडवरील सत्संग भवनासमोर असलेला वीज फिडर तातडीने स्थलांतरित करून वाहतुकीतील अडथळा दूर करावा, अशी मागणी शिक्षण समिती सदस्य तथा नगरसेवक यश दत्ताकाका साने यांनी पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या विद्युत विभागाकडे निवेदनाद्वारे केली आहे. निवेदनात म्हटले आहे की, सत्संग भवनासमोर रस्त्याच्या कडेला उभारलेला वीज फिडर बॉक्स सध्या नागरिक आणि वाहनचालकांसाठी धोकादायक ठरत आहे. सत्संग भवन परिसरात विविध कार्यक्रमांमुळे नागरिकांची व वाहनांची मोठी गर्दी होत असते. अशा परिस्थितीत रस्त्यालगत असलेल्या या फिडर बॉक्समुळे वाहनांना वळण घेताना अडचणी निर्माण होत असून वाहतूक कोंडीची समस्या वाढत आहे. स्थानिक रहिवासी, वाहनचालक आणि सत्संग भवनात येणाऱ्या नागरिकांनी या समस्येबाबत वारंवार तक्रारी केल्याचेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे. संभाव्य अपघात टाळण्यासाठी आणि वाहतुकीची सुरक्षितता सुनिश्चित करण्यासाठी संबंधित वीज फिडर बॉक्स रस्त्यालगतच्या जागेवरून हटवून सुरक्षित ठिकाणी स्थलांतरित करावा, अशी मागणी करण्यात आली आहे. या जनहिताच्या प्रश्नाला प्राधान्य देत तात्काळ पाहणी करून आवश्यक कार्यवाही करावी तसेच करण्यात आलेल्या कारवाईचा अहवाल सादर करावा, अशी विनंती यश साने यांनी महापालिका प्रशासनाकडे केली आहे.



### शिवसेना पक्षाच्या वतीने चेतन बेंद्रे यांची पिंपरी-चिंचवड शहर प्रवक्तेपदी नियुक्ती

पिंपरी (दैनिक संध्या) : शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या विचारांनी प्रेरित होऊन तसेच शिवसेना मुख्य नेते तथा महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या आदेशानुसार आणि महासंसदरत्न खासदार श्रीरंग उर्फ आप्पा बारणे यांच्या मार्गदर्शनाखाली युवा सेना शहरप्रमुख (पिंपरी-चिंचवड) चेतन गौतम बेंद्रे यांची शिवसेना पिंपरी-चिंचवड शहर प्रवक्ता या महत्त्वाच्या पदावर नियुक्ती करण्यात आली आहे. चेतन बेंद्रे हे सामाजिक, शैक्षणिक आणि जनहिताच्या विविध उपक्रमांमध्ये सातत्याने सक्रिय असून, त्यांच्या कार्याची दखल घेत पक्षाने त्यांच्यावर ही महत्त्वपूर्ण जबाबदारी सोपविली आहे. शिवसेनेची भूमिका प्रभावीपणे जनतेपर्यंत पोहोचवणे, पक्ष संघटना अधिक सक्षम करणे तसेच सर्वसामान्य नागरिकांच्या प्रश्नांना वाचा फोडण्यासाठी ते प्रभावीपणे कार्य करतील, असा विश्वास खासदार श्रीरंग उर्फ आप्पा बारणे यांनी व्यक्त केला आहे. यावेळी चेतन बेंद्रे यांनी पक्ष नेतृत्वाचे मनःपूर्वक आभार मानत, शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या विचारांचा प्रचार-प्रसार करत पक्षवाढीसाठी पूर्ण ताकदीने कार्य करण्याची ग्वाही दिली. यावेळी महासंसदरत्न खासदार श्रीरंग उर्फ आप्पा बारणे, उपनेत्या तथा नगरसेविका सुलभा उबाळे, युवा सेना सचिव तथा नगरसेवक विश्वजीत बारणे, जिल्हाप्रमुख राजेश खांडभोर, युवा सेना मावळ लोकसभा प्रमुख राजेंद्र तरस, बापू कातळे तसेच युवा सेना जिल्हाप्रमुख सागर पाचर्णे, महानगर प्रमुख राजेश फलके उपस्थित होते.

### मोशी आरटीओ परिसरात बेशिस्त पार्किंगचा विळखा; नागरिक त्रस्त

पिंपरी (दैनिक संध्या) : मोशी प्राधिकरणातील उपप्रादेशिक परिवहन (आरटीओ) कार्यालयाबाहेर दररोज येणाऱ्या वाहनांच्या बेशिस्त पार्किंगमुळे परिसराला अनधिकृत पार्किंगचा विळखा पडला आहे. यामुळे परिसरातील नागरिकांना सतत वाहतूक कोंडीचा सामना करावा लागत आहे. आरटीओ कार्यालयात विविध कामांनिमित्त येणारे नागरिक आपली वाहने रस्त्यावर आणि आजूबाजूला कशीही उभी करून निघून जातात. या कार्यालयाच्या बाजूलाच मोठ्या रहिवासी सोसायट्या आहेत. या सोसायट्यांच्या प्रवेशद्वारासमोर आणि संरक्षक भिंतींना लागूनच दिवसभर गाड्या उभ्या केल्या जात असल्याने, येथील रहिवाशांना आपल्या स्वतःच्या सोसायटीत ये-जा करतानाही विनाकारण त्रास सहन करावा लागत आहे. या समस्येबाबत स्थानिक नागरिकांनी आणि सोसायट्यांच्या पदाधिकाऱ्यांनी आरटीओ प्रशासन तसेच संबंधित विभागांकडे वारंवार तक्रारी केल्या आहेत, मात्र अद्यापपर्यंत कोणतीही ठोस कार्यवाही झालेली नाही. आरटीओ कार्यालयासाठी स्वतंत्र व हक्काची जागा आरक्षित करण्यात आल्याच्या चर्चा गेल्या अनेक दिवसांपासून फक्त कागदावर आणि बैठकांमध्येच सुरू आहेत. मात्र, या चर्चांना प्रत्यक्ष कृतीची जोड मिळून कामाला गती येणे आता अत्यंत आवश्यक आहे. शासकीय व अशासकीय कार्यालयांमध्ये कामानिमित्त येणारे नागरिक अनेकदा आपल्या वाहनांचे अत्यंत बेशिस्तपणे पार्किंग करतात. ही वस्तुस्थिती आहे. मात्र, या कार्यालयाच्या अगदी बाजूलाच रहिवासी परिसर असल्यामुळे नागरिकांनी याबाबत तीव्र संताप व्यक्त केला आहे. दरम्यान, चिखली येथे स्थलांतर झाल्यानंतर कार्यालयाच्या मागील बाजूस असलेल्या ब्रेक टेस्ट ट्रॅकच्या रिकाम्या जागेत दुचाकी आणि चारचाकी वाहनांच्या पार्किंगसाठी सुयोग्य आखणी केली जाईल. नागरिकांना आपली वाहने रस्त्यावर लावण्याऐवजी या निश्चित केलेल्या जागेत पार्क करण्याचे आवाहन केले जाईल, ज्यामुळे या भागातील वाहतूककोंडी कमी होण्यास मोठी मदत होणार असल्याची माहिती प्रशासनाने दिली आहे.

### उर्से टोलनाक्याजवळून महामार्गावर उलट्या दिशेने वाहने; अपघाताचा गंभीर धोका

उर्से (दैनिक संध्या) : यशवंतराव चव्हाण पुणे–मुंबई द्रुतगती मार्गावरील उर्से टोलनाका स्थलांतरित झाल्यानंतर उर्से खिंड आणि सोमाटणे येथील एक्झिट लेनमधून वाहनांची उलट्या दिशेने होणारी घुसखोरी चिंताजनक पातळीवर पोहोचली आहे. टोलची रक्कम वाचवण्यासाठी काही वाहनचालक थेट नो-एन्ट्रीतून द्रुतगती मार्गावर प्रवेश करत असून, आता या प्रकारात अवजड टिप्परचाही समावेश झाल्याने मोठ्या अपघाताची भीती व्यक्त होत आहे. मावळातून पिंपरी-चिंचवड, रावेत आणि पुण्याकडे जाणारे काही वाहनचालक सोमाटणे टोल टाळण्यासाठी उर्से व सोमाटणे येथील एक्झिट लेनचा गैरवापर करतात. द्रुतगती मार्गावर विरुद्ध दिशेने प्रवेश करणारी ही वाहने भरधाव वाहतुकीसमोर अचानक आल्याने इतर वाहनचालकांची तारांबळ उडते. विशेषतः अवजड वाहने मोठे वळण घेत द्रुतगती मार्गावर चढत असल्याने काही काळ वाहतुकीलाही अडथळा निर्माण होतो. या मार्गावर सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आले असले तरी नियमभंगाचे प्रकार सुरूच आहेत.

# ‘संघर्ष’ हाच भाजपचा डीएनए

## आमदार श्रीकांत भारतीय यांनी उलगडला आणीबाणीचा थरारक इतिहास




■ निगडीत ‘लोकशाही रक्षकांचा’ कृतज्ञता सोहळा संपन्न; आमदार श्रीकांत भारतीय यांनी कार्यकर्त्यांना दिला देशसेवेचा कानमंत्र

पिंपरी (दै. संध्या)

२५ जून १९७५ रोजी लोकशाहीचा गळा घोटणाऱ्या आणीबाणीच्या काळ्या कालखंडाला ५१ वर्षे पूर्ण झाली.

या पार्श्वभूमीवर, निगडीतील ग. दि. माडगूळकर सभागृहात भारतीय जनता पार्टीच्या वतीने आयोजित ‘लोकशाही रक्षक पुरस्कार’ सोहळ्यात आणीबाणीच्या काळातील संघर्षाचा इतिहास पुन्हा एकदा जिवंत झाला. आमदार श्रीकांत भारतीय यांनी आपल्या ओघवत्या भाषणातून कार्यकर्त्यांमध्ये नवा उत्साह संचारला.

हा कार्यक्रम केवळ एक सोहळा नसून नव्या पिढीसाठी संघर्षाचा दीपस्तंभ असल्याचे प्रतिपादन त्यांनी केले. भारतीय जनता पक्षाचा उदय हा आणीबाणीच्या काळात लोकांनी दिलेल्या असीम समर्पणातून झाला असून, ‘संघर्ष’ हा आमच्या पक्षाचा डीएनए (DNA) आहे, असे ते ठामपणे म्हणाले. इतिहास हा केवळ डोक्याने वाचायचा नसून तो हृदयाने समजून घ्यायचा असतो, असे सांगत त्यांनी कार्यकर्त्यांना लोकशाहीसाठी दिलेल्या बलिदानाची जाणीव करून दिली आणि आपापसातील समन्वय वाढवण्याचे आवाहन केले. शहराध्यक्ष शत्रुघ्न (बापू) काटे यांनी आणीबाणीच्या काळातील भीषण आठवणींना उजाळा देत तत्कालीन काँग्रेस सरकारवर जोरदार हल्ला चढवला. हा भारताच्या इतिहासातील सर्वात काळा दिवस होता, ज्या दिवशी जनतेचे मूलभूत अधिकार हिरावून घेतले गेले होते.

मात्र, अनेक राष्ट्रभक्तांनी तुरुंगवास सोसला आणि अमानुष छळ सहन केला, परंतु हुकूमशाहीसमोर गुडघे टेकले नाहीत. त्यांच्या याच त्यागामुळे आज आपण स्वतंत्र भारतात मोकळा श्वास घेत आहोत, असे ते म्हणाले.

या सोहळ्यात आणीबाणीत सत्याग्रह करणाऱ्या आणि मिसा (MISA) कायद्यांतर्गत जेल भोगणाऱ्या ज्येष्ठ कार्यकर्त्यांचा आमदार श्रीकांत भारतीय यांच्याहस्ते ‘लोकशाही रक्षक पुरस्कार’ देऊन गौरव करण्यात आला. यावेळी सभागृहात उपस्थित अनेकांचे डोळे पाणावले होते. या कार्यक्रमाचे संपूर्ण संयोजन भाजपा संघटन सरचिटणीस मोरेश्वर शेडगे यांनी केले.

या कार्यक्रमास आमदार उमा खापरे, आमदार अमित गोरखे, आमदार शंकर जगताप, मा. आमदार अश्विनीताई जगताप, संयोजक संगठन सरचिटणीस मोरेश्वर शेडगे, उपमहापौर शर्मिला बाबर, स्थायी समितीचे अध्यक्ष अभिषेक बारणे, प्राधिकरणाचे माजी अध्यक्ष सदाशिव खाडे, जेष्ठ नेते मधू जोशी, आणीबाणी सत्याग्रही संघटनेचे आबा खांबे, माजी अध्यक्ष डॉ.बाळकृष्ण नाईक, युवा मोर्चाचे अध्यक्ष दिनेश यादव, महिला मोर्चा अध्यक्षा सुजाता पालांडे, माजी विरोधी पक्षनेत्या डॉ.गिताताई आफळे, मधुकर बच्चे, विकास डोळस, वैशाली खाडये, संजय पटनी, संतोष तापकीर, कैलास सानप, अजय पाताडे, पोपट हजारे, राजू दुर्गे, देवदत्त लांडे, अजित कुलथे, नंदू भोगले, यांच्यासह सर्व मोर्चे, आघाडी व प्रकोष्ठ यांचे अध्यक्ष, सर्व मंडल अध्यक्ष अनेक पदाधिकारी, विविध आघाड्यांचे जिल्हाध्यक्ष, आजी-माजी नगरसेवक, शक्तीकेंद्र प्रमुख, बूथ प्रमुख आणि शेकडो कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. ‘भारत माता की जय’ आणि ‘लोकशाही अमर रहे’ अशा घोषणांनी संपूर्ण सभागृह दणाणून गेले होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक शहराध्यक्ष शत्रुघ्न काटे तर सूत्रसंचालन देवदत्त भिंगारकर यांनी केले आणि आभार कार्यक्रमाचे संयोजक मोरेश्वर शेडगे यांनी मानले.

## आळंदी देवस्थानच्या कर्मचाऱ्यांना सेवाभावाचे प्रशिक्षण

आळंदी (दै. संध्या)



### भाविकांना नम्र सेवा देण्याची घेतली शपथ

संत ज्ञानेश्वर माऊली मंदिरातील कर्मचाऱ्यांमध्ये स्वयंशिस्त, जबाबदारी आणि सेवाभाव वृद्धिंगत करण्यासाठी आळंदी देवस्थानच्या वतीने विशेष प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिरात मंदिर व्यवस्थापन, सुरक्षा, गर्दी नियंत्रण आणि स्वच्छता यासंदर्भात कर्मचाऱ्यांना मार्गदर्शन करण्यात आले.

मागील महिन्यात घडलेल्या दानपेटी चोरीच्या घटनेच्या पार्श्वभूमीवर देवस्थानाची प्रतिमा अधिक बळकट करण्याच्या उद्देशाने ५७ कर्मचाऱ्यांना दोन टप्प्यांत हे प्रशिक्षण देण्यात आले. कार्यक्रमाचे उद्घाटन पुण्याचे सह धर्मादाय आयुक्त दिनेश कोथळीकर यांच्या हस्ते झाले. यावेळी देवस्थानचे प्रमुख विश्वस्त डॉ. भावार्थ देखणे तसेच इतर विश्वस्त उपस्थित होते. व्यवस्थापन क्षेत्रातील तज्ज्ञ डॉ. अभय कुलकर्णी, डॉ. श्रीकांत कल्लूरकर आणि डॉ. सुधीर हसमनीस यांनी ज्ञानेश्वरीतील ओव्या तसेच व्यावहारिक उदाहरणांच्या माध्यमातून कर्मचाऱ्यांना मार्गदर्शन केले. भाविकांशी संवाद साधताना नम्रता, संयम आणि सेवाभाव जपण्याचे महत्त्व त्यांनी अधोरेखित केले.

प्रशिक्षणादरम्यान प्रत्येक भाविकामध्ये माऊलींचे रूप पाहून त्यांची आदरपूर्वक सेवा करण्याचा संदेश देण्यात आला. शिबिराच्या समारोपावेळी सर्व कर्मचाऱ्यांनी भाविकांशी सन्मानाने वागण्याची, सेवाभाव जपण्याची आणि देवस्थानाची प्रतिष्ठा वृद्धिंगत करण्याची माऊलींच्या सेवकाची शपथ घेतली. “भाविकांची सेवा हीच माऊलींची सेवा” या भावनेतून आयोजित करण्यात आलेल्या या प्रशिक्षण उपक्रमाचे भाविक आणि नागरिकांकडून स्वागत करण्यात येत आहे.

## पिंपरी बाजारात पालेभाज्या महागल्या

पिंपरी (दै. संध्या) : पिंपरी येथील लालबहादूर शास्त्री भाजी मंडईत रविवारी (दि. 28) जून रोजी बाजारात गेल्या आठवड्याप्रमाणे फळभाज्यांचे दर स्थिर होते. पालेभाज्यांची आवक कमी झाल्यामुळे पालेभाज्यांचे दर वाढले होते. वाटाणा, घेवडा, राजमा, पावटा दर तेजीतच आहेत . तर भेंडी, फ्लॉवर, कोबी, वांगी स्वस्त झाले आहेत. लसूण 140 - 180 रुपये किलो दराने विक्री केली जात आहे. कोथिंबीर, मेथीची जुडी 20 - 25 रुपये दराने विक्री केली जात आहे. आवक कमी असल्याने दर वाढलेले आहेत. रविवारी बाजारात गवार 60 रुपये किलो, शेवगा 70 रुपये किलो होता. टोमॅटो 25 रुपये, भेंडी 50 रुपये किलो, फ्लॉवर 50रुपये, कोबी 25 रुपये, मिरची 50 रुपये, गाजर 30 रुपये, शिमला 50 रुपये, लसूण 160 - 170 रुपये, आले 70 रुपये, वांगी 30 रुपये, काकडी 40 रुपये, कारले 50, कांदे 20 - 25

## ‘राजर्षी छत्रपती शाहू महाराज विचार प्रबोधन पर्व’ उत्साहात संपन्न

पिंपरी (दै. संध्या)

पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने आयोजित दोन दिवसीय ‘राजर्षी छत्रपती शाहू महाराज विचार प्रबोधन पर्व २०२६ उत्साहात संपन्न झाले. २५ व २६ जून रोजी संभाजीनगर, चिंचवड येथील साई मंदिर उद्यानात आयोजित या प्रबोधन पर्वामध्ये राजर्षी शाहू महाराज यांच्या समतावादी, पुरोगामी आणि लोककल्याणकारी विचारांचा जागर विविध सांस्कृतिक, सामाजिक आणि प्रबोधनात्मक कार्यक्रमांच्या माध्यमातून करण्यात आला. प्रबोधन पर्वाचे उद्घाटन उपमहापौर शर्मिला बाबर यांच्या हस्ते राजर्षी शाहू महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन करण्यात आले. यावेळी माजी महापौर मंगला कदम,नगरसदस्य कुशाग्र कदम, नगरसदस्या अनुराधा गोरखे, सुप्रिया चांदगुडे,उप आयुक्त अण्णा बोदडे,जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक,कोल्हापूर जिल्हा मित्र मंडळाचे अध्यक्ष पांडुरंग पाटील, कार्याध्यक्ष जगदीश परिट, सचिव सुनील पाटील, खजिनदार मिलिंद वेल्हाळ, उत्सव प्रमुख पी. वाय. पाटील आदी उपस्थित होते. त्यानंतर मे.जयेंदू मातोश्री प्रोडक्शन यांनी ७० कलाकारांसह सादर केलेल्या ‘फोक संस्कृती’ या बहुरंगी लोककला कार्यक्रमाने उपस्थितांची उत्स्फूर्त दाद मिळवली. प्रबोधनपर्वाच्या दुसऱ्या दिवशी राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या जयंती निमित्त महापालिकेच्या मुख्य प्रशासकीय इमारतीमधील छत्रपती शाहू महाराज यांच्या प्रतिमेस तसेच के.एस.बी.चौक येथील पुतळ्यास उपमहापौर शर्मिला बाबर यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

## पवना बंदिस्त जलवाहिनी प्रकल्प पुन्हा चर्चेत

पिंपरी (दै. संध्या)



पवना बंदिस्तजलवाहिनी प्रकल्पावरून घडलेल्या मावळ गोळीबार प्रकरण या हिंसक आंदोलनाच्या आठवणी १५ वर्षांनंतरही अंगावर काटा आणतात, परंतु याच प्रकल्पाला विरोध करणारे सत्तेवर आल्यापासून हा प्रकल्प पूर्ण करण्याच्या मागे लागले आहेत. आता तर यावर अंतिम शिक्कामोर्तब करण्यासाठी मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री यांच्या उपस्थितीत महत्त्वपूर्ण बैठक आयोजित करण्यात आली आहे. त्यामुळे 'व्यर्थ न बलिदान'चे काय असा प्रश्न निर्माण झाला आहे. या हिंसक आंदोलनात बळी ठरलेल्या शेतकऱ्यांची आठवण करुन देवून "व्यर्थ ना हो बलिदान" चा नारा देत आम्ही सत्तेवर आल्यास हा प्रकल्प रद्द करण्याचा निर्णय घेवू, शेतकऱ्यांवर दाखल झालेले गुन्हे मागे घेवू अशी आश्वासने भाजप नेते व पदाधिकाऱ्यांनी दिली होती. यानंतर भाजप सरकार राज्यातच नव्हे तर केंद्रातही सत्तेवर आले. इतकेच नाही तर मावळमध्ये आधीपासूनच भाजपची सत्ता होती आणि पिंपरी-चिंचवड महापालिकेतही भाजपचीच एकहाती सत्ता आली. त्यामुळे आता खऱ्या अर्थाने हा प्रकल्प रद्दच होणार असा विश्वास मावळच्या जनतेला होता.

## पिंपरी-चिंचवडच्या पाणीप्रश्नी राज्य सरकार ‘ॲक्टिव्ह मोड’वर..!

पिंपरी (दै. संध्या)

■ जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांची ३० जूनला आढावा बैठक

■ भाजपा आमदार महेश लांडगे यांच्या मागणीला सकारात्मक प्रतिसाद

पिंपरी-चिंचवड शहराच्या पाणीपुरवठ्याचा प्रश्न मार्गी लावण्यासाठी राज्याचे जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांनी सकारात्मक भूमिका घेत संबंधित विभागांची संयुक्त आढावा बैठक घेण्याचे निर्देश दिले आहेत. विधानसभा पावसाळी अधिवेशनाच्या निमित्ताने भाजपा नेते तथा आमदार महेश लांडगे यांनी विखे-पाटील यांची भेट घेऊन शहरासाठी प्रस्तावित पाणी आरक्षण प्रस्तावांबाबत सविस्तर निवेदन सादर केले.

यावेळी आमदार लांडगे यांनी पिंपरी-चिंचवडची झपाट्याने वाढणारी लोकसंख्या, औद्योगिक विस्तार आणि भविष्यातील वाढती पाण्याची गरज याकडे लक्ष वेधले. महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या अंदाजानुसार सन २०४१ पर्यंत शहराची लोकसंख्या सुमारे ९६ लाखांपर्यंत पोहोचणार असल्याने दीर्घकालीन जलसुरक्षेसाठी तातडीने नियोजन करण्याची आवश्यकता असल्याचे त्यांनी सांगितले.

> “पिंपरी-चिंचवड शहराची वाढती लोकसंख्या आणि औद्योगिक विस्तार लक्षात घेता भविष्यातील पाणीपुरवठ्याचे नियोजन आजच करणे आवश्यक आहे. शहराला दीर्घकालीन जलसुरक्षा मिळावी यासाठी विविध पाणी आरक्षण प्रस्ताव शासनाकडे मांडले आहेत. जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांनी सकारात्मक भूमिका घेत संबंधित विभागांची संयुक्त आढावा बैठक बोलावण्याचे निर्देश दिले आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली या बैठकीतून ठोस निर्णय होऊन शहरातील नागरिकांना भविष्यात पाण्याची कमतरता भासू नये, यासाठी आम्ही सातत्याने पाठपुरावा करणार आहोत. **– महेश लांडगे, आमदार, भाजपा, पिंपरी-चिंचवड, पुणे.**

निवेदनात आंद्रा धरणातून अतिरिक्त १ टीएमसी पाणी आरक्षण, ठोकरवाडी धरणातून सुमारे ५ टीएमसी पाणी उपलब्ध करून देणे या प्रस्तावांचा समावेश आहे. या प्रस्तावांचा एकत्रित विचार करून भविष्यातील पाणी गरजांचा सर्वंकष आढावा घेण्यासाठी जलसंपदा विभाग, पाटबंधारे विभाग, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका प्रशासन आणि संबंधित तांत्रिक यंत्रणांची संयुक्त बैठक आयोजित करण्याची मागणी आमदार लांडगे यांनी केली होती.

त्यावर जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांनी सकारात्मक प्रतिसाद देत येत्या मंगळवारी, दि. ३० जून २०२६ रोजी संबंधित विभागांची आढावा बैठक घेण्याचे निर्देश दिले आहेत. या बैठकीत विविध पाणी आरक्षण प्रस्तावांच्या तांत्रिक, प्रशासकीय आणि धोरणात्मक बाबींवर सविस्तर चर्चा होणार आहे. शहरातील लाखो नागरिकांच्या पिण्याच्या पाण्याच्या दृष्टीने ही बैठक महत्त्वपूर्ण असून, भविष्यातील पाणीपुरवठा नियोजनासाठी ती निर्णायक ठरणार आहे.

विशेष म्हणजे, शहराच्या पाणी पुरवठ्याशी संबंधित अत्यंत महत्त्वाचा पवना थेट पाईपलाईन प्रकल्पाबाबतही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीमध्ये दि. ३ जुलै २०२६ रोजी सविस्तर आढावा बैठक होणार आहे.

# पिंपरी-चिंचवडसाठी स्वतंत्र अन्नधान्य वितरण कार्यालयाची मागणी

## आमदार महेश लांडगे यांचा सभागृहात औचित्याचा मुद्दा

पिंपरी (दै. संध्या)




> “पिंपरी-चिंचवडची लोकसंख्या, औद्योगिक विस्तार आणि सार्वजनिक वितरण व्यवस्थेवरील वाढता ताण लक्षात घेता स्वतंत्र अन्नधान्य वितरण कार्यालय ही काळाची गरज आहे. स्थानिक पातळीवर सक्षम यंत्रणा उभी राहिल्यास लाभार्थ्यांना वेळेवर सेवा मिळेल, वितरण व्यवस्थेत पारदर्शकता वाढेल आणि लाखो नागरिकांची अन्नसुरक्षा अधिक प्रभावीपणे सुनिश्चित होईल. शासनाने याबाबत तातडीने सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी मागणी राज्य सरकारकडे केली आहे. **– महेश लांडगे, आमदार, भाजपा, पिंपरी-चिंचवड, पुणे.**

पिंपरी-चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील सुमारे ३२ लाख नागरिकांच्या अन्नसुरक्षेचा प्रश्न विधानसभेत चर्चेत आला. भाजपाचे आमदार महेश लांडगे यांनी आज विधानसभेत औचित्याचा मुद्दा उपस्थित करत पिंपरी-चिंचवडसाठी स्वतंत्र अन्नधान्य वितरण कार्यालय (Public Distribution System – PDS) स्थापन करण्याची तसेच शहराच्या वाढत्या लोकसंख्येनुसार स्वतंत्र अन्नधान्य इष्टांक (Quota) मंजूर करण्याची जोरदार मागणी केली आहे.

मुंबई येथील विधानभवन येथे पावसाळी अधिवेशन सुरू आहे. यावेळी आमदार लांडगे यांनी राज्य सरकारचे लक्ष वेधले. ते म्हणाले की, पिंपरी-चिंचवड हे राज्यातील सर्वाधिक वेगाने विकसित होणारे औद्योगिक आणि नागरी शहर असून, मोठ्या प्रमाणावर स्थलांतरित कामगार व वाढत्या लोकसंख्येमुळे सार्वजनिक वितरण व्यवस्थेवरील ताण दिवसेंदिवस वाढत आहे. मात्र, शहरातील संपूर्ण अन्नधान्य वितरणाचे नियोजन आणि प्रशासकीय कामकाज आजही पुणे शहरातील कार्यालयामार्फत केले जात असल्याने नागरिकांना अनेक अडचणींचा सामना करावा लागत आहे.

अन्नधान्याचे वेळेवर वितरण, नवीन लाभार्थ्यांची नोंदणी, शिधापत्रिकांमधील दुरुस्ती, नाव समाविष्ट करणे किंवा वगळणे, तक्रार निवारण, इष्टांक वाटप यासह विविध प्रशासकीय कामांमध्ये मोठा विलंब होत असून, त्याचा फटका पात्र व गरजू लाभार्थ्यांना बसत आहे. आमदार लांडगे यांनी सरकारकडे पिंपरी-चिंचवडसाठी स्वतंत्र अन्नधान्य वितरण कार्यालयाला प्रशासकीय मान्यता देण्याबरोबरच आवश्यक पदनिर्मिती करण्याची मागणी केली. तसेच शहराच्या लोकसंख्येनुसार स्वतंत्र अन्नधान्य इष्टांक मंजूर करून राष्ट्रीय अन्नसुरक्षा योजना व सार्वजनिक वितरण व्यवस्थेचा लाभ अधिकाधिक पात्र लाभार्थ्यांपर्यंत प्रभावीपणे पोहोचविण्याची आवश्यकता त्यांनी अधोरेखित केली.

यासोबतच ई-राशन कार्ड, ऑनलाइन सेवा, लाभार्थी पडताळणी, डिजिटल निरीक्षण प्रणाली आणि वितरण व्यवस्थेवर स्थानिक स्तरावर प्रभावी नियंत्रण ठेवण्यासाठी स्वतंत्र कार्यालय अत्यावश्यक असल्याचे त्यांनी सभागृहाच्या निदर्शनास आणून दिले.

आमदार लांडगे यांनी हा विषय लाखो नागरिकांच्या अन्नसुरक्षेशी, सार्वजनिक वितरण व्यवस्थेच्या कार्यक्षमतेशी आणि जनहिताशी संबंधित असल्याने शासनाने याबाबत तातडीने सकारात्मक निर्णय घेऊन आवश्यक कार्यवाही करावी, अशी ठाम मागणी केली.

# आळंदीत मंगल कार्यालयांचा सुळसुळाट

आळंदी (दै. संध्या)

**वाहतूक कोंडीवर लगाम कधी? विरोधीपक्षनेते आदित्य घुंडरे यांची कारवाईची मागणी**



तीर्थक्षेत्र आळंदीमध्ये दिवसेंदिवस वाढणाऱ्या मंगल कार्यालयांमुळे शहराची वाहतूक व्यवस्था कोलमडत असून नागरिकांना प्रचंड गैरसोयीचा सामना करावा लागत आहे. या पार्श्वभूमीवर नियमबाह्य व अनधिकृत मंगल कार्यालयांवर तात्काळ प्रशासकीय कारवाई करून शहरातील वाहतूक कोंडीला आळा घालावा, अशी मागणी विरोधीपक्षनेते आदित्य घुंडरे यांनी आळंदी नगरपरिषदेच्या मुख्याधिकाऱ्यांकडे केली आहे.

आळंदी शहरात विवाह सोहळे, विविध सामाजिक कार्यक्रम आणि मोठ्या प्रमाणावरील गर्दीमुळे मुख्य रस्ते अनेकदा ठप्प होत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. अरुंद रस्ते, वाहनतळाचा अभाव आणि सार्वजनिक मार्गावर होणारे बेशिस्त पार्किंग यामुळे सर्वसामान्य नागरिकांना रोजच त्रास सहन करावा लागत असल्याचा आरोप करण्यात आला आहे. विशेष म्हणजे वाहतूक कोंडीमुळे रुग्णवाहिका, अग्निशमन दलाची वाहने तसेच विद्यार्थ्यांच्या वाहनांनाही अडथळे निर्माण होत असल्याने हा विषय केवळ वाहतुकीपुरता मर्यादित नसून सार्वजनिक सुरक्षिततेचाही बनला असल्याचे आदित्य घुंडरे यांनी म्हटले आहे.

यासंदर्भात शहरातील सर्व मंगल कार्यालयांची परवानगी, अग्निसुरक्षा, वाहनतळ क्षमता आणि वाहतूक व्यवस्थापनाची तपासणी करून नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. आवश्यक असल्यास अशा मंगल कार्यालयांचे कामकाज तात्पुरते स्थगित किंवा बंद करण्याचाही निर्णय घ्यावा, असे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

## अध्यक्षपदी सायकर; उपाध्यक्षपदी केसवड तर सचिवपदी धुमाळ

लोणी काळभोर (दै. संध्या)



मुळशी महाराष्ट्र राज्य वीज तांत्रिक कामगार सहकारी पतसंस्थेच्या अध्यक्षपदी बाळासाहेब लक्ष्मण सायकर, उपाध्यक्षपदी संतोष अनंता केसवड तर सचिवपदी विश्वास शिवाजी धुमाळ यांची बिनविरोध निवड करण्यात आली आहे.

या संस्थेच्या सन २०२६ ते २०३१ या पाच वर्षांच्या कालावधी साठीच्या संचालक मंडळ निवडीची पंचवार्षिक निवडणूक नुकतीच पार पडली आहे. त्यानंतर संचालक मंडळाच्या सभेत अध्यक्ष, उपाध्यक्ष यांची निवड करण्यात आली. या सभेच्या अध्यक्षस्थानी निवडणूक निर्णय अधिकारी तथा अध्यासी अधिकारी म्हणून उमेश धिटे उपस्थित होते.

अध्यक्षपदासाठी बाळासाहेब सायकर, उपाध्यक्ष पदासाठी संतोष केसवड, सचिव पदासाठी विश्वास धुमाळ यांचे प्रत्येकी एकच अर्ज आल्याने या निवडी बिनविरोध पार पडल्या. नवनिर्वाचित संचालक मंडळ पुढीलप्रमाणे- बाळासाहेब लक्ष्मण सायकर (अध्यक्ष), संतोष अनंता केसवड (उपाध्यक्ष), विश्वास शिवाजी धुमाळ (सचिव), मंगेश महादेव पारखी, विकास वामन जाधव, संदीप शिवाजी बनकर, अमोल तुकाराम शेलार, सुकलाल वामनराव जाधव, प्रणाली मुकेश शिर्के, छाया प्रभाकर पंचाळे व राजाराम दत्तू जाधव. यावेळी बोलताना नवनियुक्त अध्यक्ष बाळासाहेब सायकर यांनी सर्व संचालकांना सोबत घेऊन वीज कर्मचाऱ्यांच्या व पतसंस्थेच्या हितासाठी पारदर्शक व प्रगतीशील कारभार करण्याचा संकल्प व्यक्त केला.

## तळेगाव आठवडा बाजारात चोरांवर पोलिसांची करडी नजर; ग्राहक व विक्रेत्यांच्या सुरक्षेसाठी विशेष मोहीम

तळेगाव ढमढेरे (दै. संध्या) : दर सोमवारी भरणाऱ्या आठवडा बाजारात चोरांना प्रतिबंध करण्यासाठी ग्रामपंचायत व पोलीस प्रशासन सज्ज असून, खिसे कापू, मोबाईल चोर यांच्यावर पोलिसांची करडी नजर आहे. येथील आठवडा बाजारात दर सोमवारी पोलीस निरीक्षक चंद्रशेखर यादव यांच्या सूचनेनुसार पोलीस पथक नियुक्त करण्यात आले आहे. सहाय्यक फौजदार प्रशांत गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली हे पथक चोरांवर करडी नजर ठेवत आहे. ग्राहक व विक्रेत्यांच्या सुरक्षिततेसाठी ग्रामपंचायत अधिकारी चेतन वाव्हळ व त्यांचे सहकारी कर्मचारी तसेच तळेगाव ढमढेरे पोलीस दूरक्षेत्रातील पोलीस कर्मचारी विशेष काळजी घेत असून, चोरांपासून सावध रहा, महिलांनी आपले दागिने सुरक्षित ठेवावे, मोबाईल वरच्या खिशात न ठेवता खालच्या खिशात ठेवावा, रस्त्यावर वाहनांची गर्दी होणार नाही तसेच वाहतूक कोंडीवर नियंत्रण ठेवण्यासाठी विशेष दक्षता, बाजारात काही अडचण आल्यास ग्रामपंचायत कर्मचारी व पोलिसांशी संपर्क साधावा अशा प्रकारचे आवाहन लाऊड स्पीकरवर पोलीस व ग्रामपंचायत करीत आहेत.

## निधीअभावी ग्राम सुरक्षा यंत्रणा ठप्प

घोडेगाव (दै. संध्या)

निधी आभावी पुणे ग्रामीण जिल्ह्यातील ग्राम सुरक्षा यंत्रणेच्या टोलफ्री नंबरची सेवा 5 फेब्रुवारी पासून ठप्प होणार आहे.

ही सेवा सुरू ठेवण्यासाठी आवश्यक निधीची तरतूद ग्रामपंचायतीकडून न केल्याने व जिल्हा प्रशासनाने कोणतेही प्रयत्न केले नसल्यामुळे ही यंत्रणा बंद करण्याचा निर्णय व्यवस्थापनाने घेतला आहे. अशी माहिती संचालक डी के गोरडे पाटील यांनी दिली.

पुणे ग्रामीण जिल्ह्यात 1196 ग्रामपंचायत हद्दीत विविध शासकीय विभागांच्या योजनांची माहिती ग्रामस्थांना कळविणे, ग्रामसभेची वेळ, तारीख, विषय नागरिकांना कळविणे, पाणीपुरवठ्या बाबतच्या तात्काळ स्वरूपाच्या सूचना देणे, घरपट्टी पाणीपट्टी भरणा करणेबाबत सूचना देणे, वन्य प्राणी, बिबट्या, लांडगा यांच्या हल्ल्याची माहिती देणे, नैसर्गिक आपत्ती जसे पूर, भूकंप, वणवा,याबाबत नागरिकांना विविध सूचना देणे, विविध संकट काळात स्वत:च्या मोबाईलवरून सर्व गावकऱ्यांना एकाच वेळी कॉल च्या माध्यमातून सूचना देणे, सावध करणे किंवा मदतीला बोलावण्यासाठी उपयुक्त असणारी ग्राम सुरक्षा यंत्रणा पुणे ग्रामीण पोलीस दल दलाचा उपक्रम म्हणून फेब्रुवारी 2019 रोजी कार्यान्वित करण्यात आली होती.

ही यंत्रणा सुरू करण्याबाबत आवश्यक असणारी निधीची तरतूद ग्रामपंचायत अगर जिल्हा प्रशासनाकडून कोणतेही प्रयत्न झाले नसल्यामुळे ही यंत्रणा पाच जुलैपासून पूर्ण जिल्ह्यात बंद करण्याचा निर्णय ग्रामसुरक्षा यंत्रणेच्या व्यवस्थापन कडून घेण्यात आला आहे.

# कृषिकन्यांचे पिंपळे ग्रामपंचायतीत उत्साहात स्वागत

पिंपळे (दै. संध्या)




महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी संलग्न कृषी महाविद्यालय, शिवाजीनगर (पुणे) येथील कृषिकन्यांचे पिंपळे ग्रामपंचायतीच्या वतीने उत्साहपूर्ण वातावरणात स्वागत करण्यात आले. ग्रामीण जागरूकता, कार्यानुभव कार्यक्रम व कृषी औद्योगिक जोड (RAWE) 2026-27 अंतर्गत या कृषिकन्या पुढील सहा महिने गावात विविध कृषी उपक्रम राबविणार आहेत.

कृषिकन्या कल्याणी भांगे, प्रियंका मुनिश्वर, अपूर्वा कुंदप, समीक्षा मोकाशी, तनिष्का करंडे, पूजा गुंजवटे, रशिका काळे, रोहिणी करावंदे, कनिका कोचर, लोहिता व संचिता जाधव यांचे ग्रामपंचायत पिंपळे यांच्या वतीने जल्लोषात स्वागत करण्यात आले.

यावेळी सरपंच गौरी गोफणे, उपसरपंच अमोल सुधाकर पोमण, सारिका महेश दाते, किरण खेनट तसेच ग्रामपंचायत सदस्य व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. मान्यवरांच्या हस्ते कृषिकन्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. ग्रामीण जागरूकता व कार्यानुभव कार्यक्रमांतर्गत कृषिकन्या शेतकऱ्यांना आधुनिक शेती तंत्रज्ञान, पीक व्यवस्थापन, सेंद्रिय शेती, कृषी नवकल्पना व विविध पिकांवरील प्रात्यक्षिकांद्वारे मार्गदर्शन करणार आहेत. या उपक्रमामुळे परिसरातील शेतकऱ्यांना आधुनिक कृषी तंत्रज्ञानाची माहिती मिळण्यास मदत होणार आहे.

या कार्यक्रमासाठी सहयोगी अधिष्ठाता डॉ. सुभाष भालेकर, ग्रामीण जागृती कार्यानुभव समन्वयक डॉ. स्वाती खांदवे तसेच कार्यक्रम अधिकारी डॉ. दीप्ती वाघधरे व डॉ. पल्लवी सूर्यवंशी यांचे मार्गदर्शन लाभत आहे.

# देहूत वटवृक्ष लागवड व पूजन कार्यक्रम उत्साहात संपन्न

देहू (दै. संध्या)



वटपौर्णिमेच्या पावन निमित्ताने वृक्षदाई प्रतिष्ठान, श्रीक्षेत्र देहू यांच्या वतीने “निर्मळ वारी... हरित वारी” या पर्यावरणपूरक उपक्रमांतर्गत जगद्गुरू अभंग गाथा वन, श्रीक्षेत्र देहू येथे वटवृक्ष लागवड व वटवृक्ष पूजन कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. भारतीय संस्कृतीतील वटपौर्णिमेच्या परंपरेला पर्यावरण संवर्धनाची जोड देत “वृक्ष तोडू नका... वृक्ष लावा आणि जगवा” हा सामाजिक संदेश यावेळी देण्यात आला. कार्यक्रमादरम्यान पर्यावरण संरक्षण, वृक्षसंवर्धन आणि भारतीय संस्कृतीतील वृक्षांचे महत्त्व याविषयी उपस्थित मान्यवरांनी मार्गदर्शन केले.

यावेळी पुणे महानगरपालिकेच्या महापौर सौ. मंजुषा नागपुरे यांनी भारतीय संस्कृतीमध्ये वडाच्या झाडाचे असलेले धार्मिक, सामाजिक व पर्यावरणीय महत्त्व अधोरेखित केले. तसेच प्रत्येक नागरिकाने वृक्षसंवर्धनाची जबाबदारी स्वीकारण्याचे आवाहन केले.

कार्यक्रमास प्रमुख उपस्थिती म्हणून डिंपल मेहता (महापौर, मीरा-भाईंदर महानगरपालिका), हर्षालीताई भाविल चौधरी (महापौर, कल्याण-डोंबिवली महानगरपालिका), सुजाताताई पाटील (महापौर, नवी मुंबई महानगरपालिका), ज्ञानेश्वरीताई देवकर (उपमहापौर, सोलापूर महानगरपालिका) आणि शर्मिलाताई बाबर (उपमहापौर, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका) उपस्थित होत्या. कार्यक्रम स्वागताध्यक्षा सारिकाताई सुनील शेळके यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडला. तसेच पुजाताई दिवटे (नगराध्यक्षा, देहू नगरपंचायत), प्रियंकाताई कदम (उपमुख्याधिकारी, देहू नगरपंचायत) आणि ह.भ.प. जालिंदर महाराज मोरे (अध्यक्ष, जगद्गुरू श्री संत तुकाराम महाराज संस्थान) यांची प्रमुख उपस्थिती लाभली.

या उपक्रमाच्या माध्यमातून पर्यावरण संवर्धनाचा संदेश समाजाच्या प्रत्येक स्तरापर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न करण्यात आला. “प्रत्येक सण वृक्षांसाठी, प्रत्येक हात वृक्षसंवर्धनासाठी” हा संकल्प यावेळी उपस्थितांनी व्यक्त केला.

## आळंदीतील चतुर्थ वार्षिक करवाढीवर ७४८ हरकती

आळंदी (दै. संध्या)


**उद्याच्या सुनावणीत मिळकतधारकांच्या आक्षेपांवर अंतिम निर्णय होणार**

आळंदी नगरपरिषदेमार्फत सध्या शहरातील नागरिकांना सन 2026 ते 2030 यासाठी चतुर्थ वार्षिक करवाढीच्या पाठवलेल्या नोटिसांवर आळंदी शहरातून 748 हरकती प्राप्त झाल्या आहेत. शहरातील मिळकतधारकांकडून आलेल्या हरकतींवर आळंदी नगरपरिषदेत सुनावणी उद्या मंगळवारी (ता. 30) सकाळी दहा ते सायंकाळी सहा वाजेपर्यंत नगरपरिषद कार्यालयामध्ये होणार आहे. ही सुनावणी पुणे नगररचना विभागाचे उपसंचालक, सहाय्यक संचालक, नगरपरिषद मुख्याधिकारी आणि नगराध्यक्ष यांच्या उपस्थितीमध्ये होणार आहे. आळंदी नगरपरिषदेची चतुर्थ वार्षिक करवाढ मागील काही वर्षांत झालेली नव्हती. यापूर्वी 2017 मध्ये करवाढ झालेली होती. त्यानंतर कोरोना आणि प्रशासकीय राजवट असल्यामुळे करवाढ झाली नाही. मात्र आता राज्य शासनाच्या सूचनेनुसार सन 2022 आणि त्यानंतर दोन वेळा शहरातील इमारतींचे सर्वेक्षण करवाढीच्या अनुषंगाने करण्यात आले. इमारतींचे सुधारित सर्वेक्षण 2025 ला झाले. यामध्ये 3810 मिळकतींमध्ये वाढ झाली. आणि चतुर्थ वार्षिक करवाढ रचनेमध्ये साडेपाच कोटी रुपयांचा कर जास्तीचा गोळा होणार असल्याचा दावा आळंदी नगरपरिषद करत आहे.

# राजगुरुनगर नगरपरिषद ॲक्शन मोडवर

**गटारी स्वच्छता व पाणी निचऱ्याच्या कामांना वेग**

राजगुरुनगर (दै. संध्या)



रविवारी झालेल्या मुसळधार पावसामुळे राजगुरुनगर शहर व परिसरात अनेक ठिकाणी पाणी साचले. घरांमध्ये व दुकानांमध्ये पावसाचे पाणी शिरल्याने नागरिकांसह व्यावसायिकांचे मोठे नुकसान झाले. या प्रकारामुळे संतप्त नागरिकांनी नगरपरिषदेच्या कारभाराबाबत नाराजी व्यक्त करत तक्रारींचा पाऊस पाडला.

या तक्रारींची गांभीर्याने दखल घेत राजगुरुनगर नगरपरिषद ॲक्शन मोडवर आली असून शहरातील गटारींची स्वच्छता, अडथळे दूर करणे आणि पाणी निचऱ्याची योग्य व्यवस्था करण्याच्या कामांना वेग देण्यात आला आहे.

नगराध्यक्ष मंगेश गुंडाळ यांनी सहकारी नगरसेवक सह शहरातील विविध भागांची पाहणी केली. नागरिकांच्या तक्रारी प्रत्यक्ष ऐकून घेत तातडीने संबंधित विभागाला आवश्यक उपाययोजना करण्याच्या सूचना दिल्या. ज्या ठिकाणी गटारी तुंबल्या होत्या, तेथे स्वच्छता मोहीम राबविण्यात आली असून पाणी साचणाऱ्या ठिकाणी निचऱ्याची व्यवस्था करण्यात येत आहे.

नगरपरिषदेच्या या तत्पर कारवाईमुळे नागरिकांकडून समाधान व्यक्त करण्यात येत असून, शहरातील जलनिस्सारण व्यवस्थेत दीर्घकालीन सुधारणा करण्याची मागणीही पुढे येत आहे.

शहराच्या काही भागात अजूनही घाणीचे साम्राज्य असून त्यामुळे दुर्गंधी,डासांचा प्रादुर्भाव मुळे नागरिक हैराण झाले आहे. बेजबाबदार नागरिकांकडून सार्वजनिक ठिकाणी, आड बाजूला, गटारी, ओढे नाल्यात सर्रास कचरा टाकताना दिसून येते. परिणामी पावसाळ्यात गटारी तुंबण्याचे प्रकार उद्भवतात शहर स्वच्छतेसाठी प्रशासनाकडून वेळोवेळी स्वच्छता अभियान राबवून जनजागृती केली जाते.कचरा संकलनासाठी नियमित घंटागाडी,स्वच्छता कर्मचारी असूनही काही नागरिकांकडून सार्वजनिक ठिकाणी कचरा टाकला जातो.नागरिकांची ही मानसिकता बदलण्यासाठी प्रशासनाने ठोस पावले उचलण्याची गरज आहे.ठिकठिकाणी कॅमेरे बसून अथवा माहिती मिळवून अशा नागरिकाविरुद्ध दंडात्मक कारवाई होणे गरजेचे बनले आहे.

> “नागरिकांना पावसाळ्यात उद्भवणाऱ्या समस्यांवर त्वरित कार्यवाही करण्यात येईल, तसेच शहरात पुन्हा अशा प्रकारची परिस्थिती निर्माण होऊ नये यासाठी कायमस्वरूपी उपाययोजना करण्यावर भर दिला जाईल, असे आश्वासन दिले.”
>
> **- मंगेश गुंडाळ, नगराध्यक्ष, राजगुरुनगर नगरपरिषद**

## थोडक्यात पण महत्वाचे...



### वटसावित्री पौर्णिमेनिमित्त जेजुरीच्या विठ्ठल मंदिरात महिलांची गर्दी

जेजुरी (दैनिक संध्या) : वटसावित्री पौर्णिमेनिमित्त वडाच्या झाडाला पुजण्यासाठी जेजुरीच्या विठ्ठल मंदिरात महिलांनी मोठी गर्दी केली होती. वटसावित्री पौर्णिमा (वटपौर्णिमा) निमित्त सोमवार, २९ रोजी वडाच्या झाडाला पुजण्यासाठी व वडाच्या झाडाभोवती सात फेरे घेण्यासाठी जेजुरी येथील संत काशिनाथ महाराज विठ्ठल मंदिरात जेजुरी शहरातील महिलांनी मोठी गर्दी केली होती. हे व्रत विवाहित महिला पतीच्या दीर्घायुष्यासाठी आणि सुखी वैवाहिक जीवनासाठी करतात हिंदू संस्कृतीत वडाच्या झाडाला (वटवृक्ष) अत्यंत पवित्र मानले जाते. वडाच्या झाडामध्ये ब्रह्मा, विष्णू आणि महेश या तीनही देवांचा वास असतो, अशी मान्यता आहे. वडाचे झाड हे दीर्घायुषी आणि प्रचंड विस्तारणारे असते. या वृक्षाप्रमाणेच आपल्या संसाराचा आणि पतीच्या आयुष्याचा विस्तार व्हावा, ही त्यामागील भावना असते.

### महाराष्ट्र राज्य विस्तार अधिकारी संघटनेची त्रैमासिक सभा आळंदीत संपन्न

राजगुरुनगर (दैनिक संध्या) : महाराष्ट्र राज्य विस्तार अधिकारी संघटनेची त्रैमासिक सभा रविवार, दि. २८ जून २०२६ रोजी आळंदी येथील कारवा धर्मशाळेत उत्साहात पार पडली. राज्यभरातील विविध जिल्ह्यांतील पदाधिकारी व विस्तार अधिकारी मोठ्या संख्येने या दरम्यान उपस्थित होते. सभेचे सूत्रसंचालन विस्तार अधिकारी राम राठोड यांनी केले. प्रास्ताविक एस. एस. साळुंखे यांनी करून संघटनेच्या कार्याचा आढावा मांडला. यावेळी संघटनेचे सरचिटणीस बालाजी पोतदार यांनी संघटनेच्या कामकाजाची सविस्तर माहिती दिली. तर कोषाध्यक्ष रामप्रसाद मुंडे यांनी संघटनेच्या आर्थिक व्यवहारांचा जमा-खर्चाचा लेखाजोखा सभेसमोर सादर केला. यावेळी पुणे जिल्हा संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी मार्गदर्शन केले. तसेच विविध जिल्ह्यांतून उपस्थित राहिलेल्या अध्यक्ष व सचिवांनी विस्तार अधिकारी संघटनेच्या प्रलंबित मागण्या, अडचणी आणि त्यावरील उपाययोजनांबाबत आपली मते मांडली. सभेच्या अध्यक्षस्थानी असलेले महाराष्ट्र राज्य विस्तार अधिकारी संघटनेचे अध्यक्ष अनिल गावंड यांनी संघटनेच्या विविध प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी करण्यात आलेल्या प्रयत्नांचा सविस्तर आढावा दिला. तसेच आगामी काळात संघटनेच्या विविध मागण्यांच्या पूर्ततेसाठी राबविण्यात येणाऱ्या उपक्रमांची माहिती देत सदस्यांना संघटितपणे कार्य करण्याचे आवाहन केले.



### वटपौर्णिमेनिमित्त नारायणगाव वारुळवाडीत वटवृक्ष रोपांचे वाटप

नारायणगाव (दैनिक संध्या) : वटपौर्णिमा सणानिमित्त नारायणगाव वारूळवाडी येथील श्रीमती एस.आर. केदारी बालक मंदिर, गुरुवर्य आप्पा सबनीस विद्यामंदिर व नारायणगाव पोलीस स्टेशन येथे जुन्नर वन विभागाचे उपवनसंरक्षक प्रशांत खाडे, वनपरिक्षेत्र आधिकारी प्रदीप चव्हाण, वनपाल गौरी हिंगणे, वनरक्षक ज्ञानेश्वर पवार यांच्या सहकार्याने पोलीस पाटील व श्रीमती एस. आर. केदारी बालक मंदिर पालक शिक्षक संघाचे उपाध्यक्ष सुशांत भुजबळ यांच्या पुढाकाराने पर्यावरण संवर्धन व वृक्षारोपण करण्यासाठी विद्यार्थी, शिक्षिका व वडपूजनासाठी आलेल्या महिलांना वटवृक्ष झाडाच्या रोपांचे वाटप करण्यात आले. या निमित्ताने शाळेचे चेअरमन अरविंद मेहेर,डॉ.अनुष्का शिंदे, वनपाल गौरी हिंगणे, वनरक्षक ज्ञानेश्वर पवार, पोलीस पाटील सुशांत भुजबळ, ह.भ.प. रूपाली वाघ, मुख्याध्यापिका सुनिता पारखे, उपमुख्याध्यापिका अरुणा कानडे, ज्येष्ठ शिक्षिका रत्ना डुंबरे, आदित्य डेरे, शंतनू डेरे, भाग्यश्री भुजबळ, देविका भुजबळ यासह ग्रामोन्नती मंडळाचे सदस्य, पदाधिकारी, शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते. यावेळी डॉ.अनुष्का शिंदे यांनी वटपौर्णिमा सणाचे महत्त्व व वृक्षांची पर्यावरण संवर्धनासाठीची गरज याविषयी मोलाची माहिती दिली. ह.भ.प. रूपाली वाघ यांनीही पर्यावरण जागृती व झाडांबद्दल महत्व समजावून सांगितले तर वनपाल हिंगणे, वनरक्षक ज्ञानेश्वर पवार, आदित्य डेरे, शंतनू डेरे भाग्यश्री भुजबळ, देविका भुजबळ यांनी वृक्षांची लागवड व वृक्ष संगोपन करण्याविषयी महत्त्वपूर्ण माहिती सांगितली. शाळेचे चेअरमन अरविंद मेहेर यांनी या उपक्रमाचे कौतुक करत शुभेच्छा दिल्या. तसेच सर्वांना वृक्षारोपणाचे महत्त्व सांगितले व इतरांनाही वृक्ष लागवडीसाठी प्रेरणा दिली. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन आशा भुजबळ यांनी केले.





### भवानी फाऊंडेशनच्या वतीने स्वच्छतागृहाची उभारणी व शालेय साहित्याचे वाटप

उरण (दैनिक संध्या) : जेएनपीए परिसरातील कार्यरत असलेल्या भवानी सिपिंग सर्व्हिस कंपनी संचालित भवानी फाऊंडेशन यांच्यावतीने अंबरनाथ येथील कर्नाटक वैभव नमस्ते संस्थेच्या नीजलिंगाप्पा कन्नड पीआर विद्यालयाच्या मुली - मुलांसाठी दहा सिटचे स्वच्छतागृह बांधून देण्यात आले आहे.दहा लाख रुपये खर्चून मुली - मुलांसाठी उभारण्यात आलेल्या या स्वच्छतागृहात भारतीय, इंग्लिश अशा दोन्हीही पध्दतीच्या पॉटची व्यवस्था करण्यात आली आहे.सामाजिक बांधिलकीतून उभारण्यात आलेल्या या स्वतंत्र स्वच्छतागृहांमुळे विद्यालयातील मुलामुलींची होणारी गैरसोय दूर करण्यात मोठी मदत झाली आहे. या स्वच्छतागृहाचे लोकार्पण सोहळा नुकताच भवानी फाऊंडेशनचे संस्थापक अध्यक्ष के.डी.शेट्टी, भवानी शिपिंगचे मॅनेजिंग डायरेक्टर जिक्सीत शेट्टी यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आला. याप्रसंगी भवानी फाऊंडेशनचे माजी अध्यक्ष आर.बी.हेबली, सचिव श्रीमती शिखा शेट्टी, अंबिका हॉटेलचे मालक प्रभाकर शेट्टी,कर्नाटक वैभव नमस्ते संस्थेचे अध्यक्ष टिळक चालवाडी, उपाध्यक्ष एच.एन.इंगनुर, सचिव बसवंत पुजारी अन्य पदाधिकारी, विद्यालयाच्या मुख्याध्यापिका अनिता राजोली, शिक्षक वृंद व मान्यवर उपस्थित होते.यावेळी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते विद्यार्थी, विद्यार्थिनींना वह्या, पुस्तके व शालेय साहित्याचेही वाटप करण्यात आले.




दैनिक संध्या
नि:पक्ष समीक्षणाचे... निर्भीड दैनिक



# थोडक्यात पण महत्वाचे

## अधिकाऱ्यांवरही प्रशासकीय कारवाई सुरू

मुंबई (दैनिक संध्या) : यश विद्यानिकेतन या वसईयेथीलशैक्षणिकसंस्थेनेशासनाचीपरवानगी न घेता शाळेचे स्थलांतर केल्याचे निदर्शनास आले असून, या प्रकरणी संबंधित संस्थेवर कारवाई करण्यात येईल. तसेच शिक्षण हक्क कायदा (आरटीई) अंतर्गत क्षेत्रभेट न देता शाळांची नोंदणी करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांविरुद्ध कारणे दाखवा नोटीस बजावून प्रशासकीय कार्यवाही सुरू करण्यात आली असल्याची माहिती शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांनी विधानसभेत दिली. विधानसभेत यश विद्यानिकेतन ग्लोबल शाळेतील आरटीई (शिक्षण हक्क कायदा) अंतर्गत प्रवेशासंदर्भात सदस्य राजन नाईक यांनी प्रश्न उपस्थित केला होता. यास उत्तर देताना मंत्री भुसे बोलत होते. यावेळी सदस्य प्रशांत बंब आणि प्रवीण दटके यांनी उपप्रश्न विचारले. मंत्री भुसे म्हणाले की, वसईतील विद्यार्थ्यांना नियमाप्रमाणे शिक्षण हक्क कायद्यानुसार प्रवेश देऊन त्यांना न्याय देण्यात येईल. संबंधित अधिकारी किंवा कर्मचारी यांनी विद्यानिकेतन ग्लोबल शाळा किंवा परिसरातील शाळेची क्षेत्रीय भेट न घेता शाळेची नोंद केल्याचे निदर्शनात आले आहे. गटशिक्षण अधिकारी, पंचायत समिती वसई, संबंधित विस्तार अधिकारी (शिक्षण) व संबंधित केंद्रप्रमुख यांना कारणे दाखवा नोटीस देण्यात आली असून प्रशासकीय कार्यवाही सुरू असल्याचे त्यांनी सांगितले. सदरची शाळा शासनाची परवानगी न घेता स्थलांतरित करण्यात आली असून याप्रकरणी संबंधित संस्थेवर नियमानुसार कारवाई करण्यात येणार आहे. वसईतील संबंधित शाळेत आरटीईच्या 25 टक्के प्रवेशासाठी निवड झालेल्या बालकांना त्यांनी ऑनलाइन निवडलेल्या दहा शाळांपैकी रिक्त जागांवर प्रवेश देण्याची कार्यवाही सुरू असल्याची माहितीही मंत्री दादाजी भुसे यांनी दिली.

## अवैध सावकारीविरोधी कडक कायदा करणार

मुंबई (दैनिक संध्या) : राज्यातील बेकायदेशीर सावकारीला आळा घालण्यासाठी कायद्यात आणखी कडक तरतुदी करण्यात येणार असून पूर्वीच्या कायद्यापेक्षा अधिक कठोर शिक्षा देण्याची तरतूद नव्या कायद्यात केली जाईल, अशी माहिती सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांनी विधानसभेत प्रश्नोत्तराच्या तासात दिली. सहकार मंत्री पाटील म्हणाले की, राज्यातील शेतकऱ्यांना सुलभ कर्ज पुरवठा, बेकायदेशीर सावकारीवर कठोर नियंत्रण आणि तक्रारींवर प्रभावी कारवाई करून शेतकऱ्यांचे हित जोपासण्यास राज्य शासनाने सर्वोच प्राधान्य दिले आहे. कोणताही पात्र शेतकरी कर्जापासून वंचित राहणार नाही, असे सांगत मंत्री पाटील म्हणाले की, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांचे कर्ज थकीत असल्यामुळे ज्या शेतकऱ्यांना नव्याने पीक कर्ज मिळण्यात अडचणी येत आहेत, अशा शेतकऱ्यांना राष्ट्रीयीकृत बँका व इतर पात्र बँकांच्या माध्यमातून कर्ज उपलब्ध करून देण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. अमरावती जिल्ह्यात अवैध सावकारी विरोधात मोठ्याप्रमाणावर कारवाई सुरू आहे. प्राप्त झालेल्या ३४३ तक्रारींपैकी २६६ प्रकरणांची तपासणी करण्यात आली असून त्यापैकी ३४ प्रकरणांमध्ये गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. ४८ आरोपींवर कारवाई करण्यात येत आहे. महाराष्ट्र सावकारी कायद्याअंतर्गत जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, अमरावती कार्यालयाकडे प्राप्त झालेल्या ५४ तक्रारींपैकी ४४ प्रकरणांचा निकाल लावण्यात आला आहे. संबंधित प्रकरणांमध्ये शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी आवश्यक ती कार्यवाही करण्यात येत असल्याचेही मंत्री पाटील यांनी सांगितले.

## आरोपींवर 'मकोका' लावण्याच्या हालचाली

मुंबई (दैनिक संध्या) : महाराष्ट्र शिक्षक पात्रता परीक्षा पेपरफुटी प्रकरणात भिवंडी पोलिसांनी अत्यंत मोठी कारवाई केली असून संपूर्ण रॅकेटचा पर्दाफाश केला आहे. टीईटी परीक्षेचे पेपर विक्री करण्यासाठी येणाऱ्या तिघांना पोलिसांनी रंगेहात ताब्यात घेतले असून त्यांच्याकडून टीईटी परीक्षेचे प्रश्नपत्रिका संच जप्त करण्यात आले आहेत. या प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेऊन राज्य शासनाने तातडीने पावले उचलली असून या संपूर्ण प्रकरणाची माहिती राज्याचे मंत्री दादा भुसे यांनी सभागृहात दिली आहे. पुढील टीईटी आणि इतर परीक्षा ऑनलाईन घेण्यासाठी मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात येत आहे, अशी माहिती यावेळी दादा भुसे यांनी दिली.

# जैन समाजाच्या शैक्षणिक प्रगतीला आणि युवा उद्योजकतेला मिळणार चालना

■ जैन अल्पसंख्यांक आर्थिक विकास महामंडळ आणि राष्ट्रीय अल्पसंख्यांक विकास व वित्त महामंडळ यांच्यात सामंजस्य करार

■ नवी दिल्ली (दै. संध्या)



महाराष्ट्रातील जैन समाजाच्या शैक्षणिक प्रगतीला आणि युवा उद्योजकतेला चालना देणारा महत्त्वपूर्ण निर्णय आज नवी दिल्लीत घेण्यात आला. महाराष्ट्र शासनाच्या जैन अल्पसंख्यांक आर्थिक विकास महामंडळ आणि राष्ट्रीय अल्पसंख्यांक विकास व वित्त महामंडळ यांच्यासोबत सामंजस्य करार केला असून, या कराराअंतर्गत १०० कोटी रुपयांचा निधी महाराष्ट्रासाठी उपलब्ध होणार असल्याची माहिती महामंडळाचे अध्यक्ष ललित गांधी यांनी दिली.

राष्ट्रीय अल्पसंख्यांक विकास व वित्त महामंडळाच्या मुख्यालयात या सामंजस्य करारावर जैन अल्पसंख्यांक आर्थिक विकास महामंडळाचे अध्यक्ष ललित गांधी, व्यवस्थापकीय संचालक मेघना शिंदे तसेच राष्ट्रीय अल्पसंख्यांक विकास व वित्त महामंडळाचे महाव्यवस्थापक अनिल कुमार यांनी महामंडळाच्या अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक आभा रानी सिंग यांच्या प्रमुख उपस्थितीत स्वाक्षऱ्या केल्या.

यावेळी जैन अल्पसंख्यांक आर्थिक विकास महामंडळाचे समन्वयक संदीप भंडारी, विकास आच्छा, विपिन जैन तसेच राष्ट्रीय अल्पसंख्यांक विकास व वित्त महामंडळाचे जी.एम. (फायनान्स) कुमार सुदेश, जी.एम. (प्लॅनिंग) निक्सन माथुर, जी.एम. (अकाउंट्स) मनोज पुनिया आणि डी.जी. एम. पी. एस. पौणीकर उपस्थित होते.

या करारामुळे जैन समाजातील अल्प उत्पन्न गटातील विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणासाठी सुलभ व कमी व्याजदरात शैक्षणिक कर्ज उपलब्ध होणार आहे. तसेच युवा उद्योजकांना उद्योग-व्यवसाय उभारण्यासाठी आवश्यक आर्थिक सहाय्य मिळणार असल्याने रोजगारनिर्मितीला चालना मिळून जैन समाजाच्या आर्थिक सक्षमीकरणाला नवी दिशा मिळणार आहे.

या करारामुळे जैन समाजातील विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणाची नवी संधी, तर नवउद्योजकांना आर्थिक पाठबळ उपलब्ध होणार असून, महाराष्ट्रातील जैन समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी हा करार एक महत्त्वपूर्ण मैलाचा दगड ठरणार आहे.

# ३० जूनपर्यंत एचएसआरपी नंबर प्लेट बसवा

## १ जुलैपासून नियमभंग करणाऱ्यांवर कडक कारवाई

■ मुंबई (दै. संध्या)




राज्यातील १ एप्रिल २०१९ पूर्वी नोंदणी झालेल्या सर्व वाहनांवर उच्च सुरक्षा नोंदणी क्रमांक प्लेट (एचएसआरपी) बसविण्यासाठी ३० जून २०२६ ही अंतिम मुदत असून, त्यानंतर १ जुलैपासून नियमांचे पालन न करणाऱ्या वाहनधारकांवर मोटार वाहन कायद्यानुसार कडक कारवाई करण्यात येणार आहे. तसेच एचएसआरपी न बसविलेल्या वाहनांची आरटीओमधील अनेक महत्त्वाची कामेही रोखण्यात येणार आहेत.

एचएसआरपी नंबर प्लेट न बसविणाऱ्या वाहनधारकांना वाहन हस्तांतरण, पत्ता बदल, कर्जबोजा चढविणे किंवा उतरविणे, वाहनाची पुनर्नोंदणी, वाहनातील बदल, तसेच परवाना नूतनीकरण यांसारख्या आरटीओमधील सेवा उपलब्ध होणार नाहीत. मात्र, वाहनाच्या फिटनेस प्रमाणपत्राच्या नूतनीकरणासाठी ही अट लागू राहणार नाही.

दरम्यान, ३० जूनपर्यंत एचएसआरपी बसविण्यासाठी अधिकृतपणे अपॉइंटमेंट घेतलेल्या वाहनधारकांना १ जुलैपासून सुरू होणाऱ्या दंडात्मक कारवाईतून तात्पुरता दिलासा देण्यात आला आहे.

राज्यात एचएसआरपी बसविण्याच्या कामासाठी तीन झोन निश्चित करण्यात आले असून, झोन १ साठी रोझमेर्टा टेक्नॉलॉजीज लिमिटेड, झोन २ साठी रिअल इंडस्ट्रीज लिमिटेड आणि झोन ३ साठी एफटीए एचएसआरपी सोल्यूशन्स प्रा. लि. या कंपन्यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

शासनाने एचएसआरपी बसविण्यासाठी अधिकृत दरही निश्चित केले आहेत. त्यानुसार दुचाकीसाठी ४५० रुपये, तीनचाकीसाठी ५०० रुपये, तर हलकी मोटार वाहने आणि मध्यम व अवजड व्यावसायिक वाहनांसाठी ७४५ रुपये (जीएसटी वगळून, फिटमेंट शुल्कासह) आकारण्यात येणार आहेत.

केंद्रीय मोटार वाहन नियम, १९८९ मधील नियम ५० आणि मोटार वाहन अधिनियमातील कलम १७७ अन्वये पोलीस आणि परिवहन विभाग हे संयुक्त किंवा स्वतंत्रपणे ही कारवाई करणार आहेत. तसेच सर्व शासकीय आणि निमशासकीय कार्यालयांनीही त्यांच्या ताब्यातील वाहनांवर ३० जूनपूर्वी एचएसआरपी नंबर प्लेट बसवून घ्याव्यात, असे आवाहन परिवहन विभागाचे सह आयुक्त शैलेश कामत यांनी केले आहे.

# राज्यात पावसाळी मासेमारी बंदी १५ ऑगस्टपर्यंत – मंत्री नितेश राणे

■ मुंबई (दै. संध्या)




राज्यातील मत्स्यसाठ्याचे संवर्धन, माशांना प्रजननासाठी अधिक कालावधी उपलब्ध करून देणे, तसेच पावसाळ्यातील खराब हवामानामुळे मच्छीमारांची जीवित व वित्तहानी टाळण्यासाठी राज्य शासनाने पावसाळी मासेमारी बंदीचा कालावधी वाढवून १५ ऑगस्टपर्यंत करण्याचा निर्णय घेतला आहे, अशी माहिती मत्स्यव्यवसाय मंत्री नितेश राणे यांनी विधानसभेत एका निवेदनाद्वारे दिली.

यापूर्वी राज्याच्या जलधी क्षेत्रात १ जून ते ३१ जुलै या ६१ दिवसांच्या कालावधीत यांत्रिक व यंत्रचलित मासेमारी नौकांना बंदी होती. पश्चिम मान्सूनचे आगमन, मत्स्यसाठ्याचे संरक्षण आणि मच्छीमारांच्या सुरक्षेच्या दृष्टीने हा कालावधी निश्चित करण्यात आला होता. मात्र, मासेमारी हंगामाच्या सुरुवातीला लहान माशांची होणारी मासेमारी रोखण्यासाठी बंदीचा कालावधी १५ ऑगस्टपर्यंत वाढवावा, अशी मागणी विविध मच्छीमार सहकारी संस्थांकडून शासनाकडे करण्यात आली होती. या मागणीच्या अनुषंगाने जिल्हा समिती तसेच राज्य सल्लागार व सनियंत्रण समितीचे अहवाल मागविण्यात आले. या समित्यांनीही बंदीचा कालावधी १५ ऑगस्टपर्यंत वाढविण्याचा अभिप्राय दिला. शासनाच्या मते, वाढीव बंदीमुळे मत्स्यसाठ्याचे जतन व संवर्धन होण्यास मदत होईल. तसेच माशांना प्रजननासाठी पुरेसा कालावधी मिळेल आणि भविष्यातील पिढ्यांसाठी मत्स्यसंपदा टिकवून ठेवणे शक्य होईल. याशिवाय पावसाळ्याच्या सुरुवातीला येणारे वादळी वारे, चक्रीवादळे, अवकाळी पाऊस आणि खराब हवामानामुळे होणारी संभाव्य जीवित व वित्तहानीही टाळता येणार आहे.

दरम्यान, राज्यात बंदी लागू असताना इतर राज्यांतील मासेमारी नौका महाराष्ट्राच्या किनारपट्टीवर येऊन अनधिकृत मासेमारी करत असल्यास त्यांच्याविरुद्ध मत्स्य विभागाकडून कठोर कारवाई करण्यात येईल, असेही मंत्री राणे यांनी निवेदनाद्वारे म्हटले आहे.

# मराठी न शिकविणाऱ्या शाळांवर दंडासह मान्यता रद्द करण्याची कारवाई – मंत्री दादाजी भुसे

मुंबई (दै. संध्या) राज्यातील सर्व माध्यमांच्या शाळांमध्ये इयत्ता पहिली ते दहावीपर्यंत मराठी भाषा शिकविणे बंधनकारक आहे. मराठी न शिकवणाऱ्या शाळांवर एक लाख रुपयांपर्यंत दंड आकारण्यात येईल. त्यानंतरही नियमांचे पालन न झाल्यास संबंधित शाळेची मान्यता रद्द करण्यात येईल,असे शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांनी विधानसभेत सांगितले. शालेय शिक्षण मंत्री भुसे म्हणाले की, मराठी भाषा सक्तीचा कायदा लागू करण्यात आल्याने राज्यातील सर्व माध्यमांच्या शाळांमध्ये इयत्ता पहिली ते दहावीपर्यंत मराठी शिकविणे अनिवार्य आहे. मराठी विषय शिकविण्यासाठी आवश्यक शैक्षणिक पात्रता असलेले शिक्षक नियुक्त करणेही शाळांसाठी बंधनकारक केले आहे.

# महाकर्जमुक्तीची संजीवनी

नैसर्गिक संकट व कर्जबाजारीपणाच्या गर्तेत अडकलेल्या शेतकरी बांधवांना पुन्हा सक्षम करण्यासाठी राज्य शासनाने 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना २०२६' सुरू केली आहे. ही योजना शेतकरी बांधवांना सन्मानाने जगण्याची आणि नव्या उमेदीने शेती करण्याची संधी देणारी 'नवसंजीवनी' ठरणार आहे. या योजनेविषयी ही माहिती...

■ (दै. संध्या)

महाराष्ट्र राज्याची एक ओळख प्रगतीशील आणि पुरोगामी राज्य म्हणूनही आहे. आपल्या राज्याने कृषी क्षेत्रात अनेक शिखरे पादाक्रांत करीत देशालाच नव्हे तर जगाला सुद्धा नवनवे शोध व प्रयोग देऊन शेती प्रगत करण्याचे तंत्र दिले आहे. महाराष्ट्राच्या अर्थव्यवस्थेत कृषी क्षेत्राचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. परंतु, गेल्या काही वर्षांत निसर्गाचे चक्र पूर्णपणे बदलले असून अवेळी येणारा पाऊस, तीव्र दुष्काळ, तर कधी गारपीट, अतिवृष्टी आणि महापूर... यासारख्या एकामागून एक येणाऱ्या या नैसर्गिक संकटांमुळे राज्यातील बळीराजा पुरता कोलमडून गेला आहे. कर्जबाजारीपणाच्या गर्तेत अडकलेल्या या शेतकरी बांधवांला पुन्हा पायावर उभे करण्यासाठी राज्य शासनाने एक अत्यंत महत्वाकांक्षी आणि ऐतिहासिक पाऊल उचलले आहे. ते म्हणजे 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना २०२६'. ही योजना केवळ एक तात्पुरती कर्जमुक्ती नसून, आर्थिक संकटात सापडलेल्या शेतकरी बांधवांना सन्मानाने जगण्याची आणि नव्या उमेदीने शेती करण्याची संधी देणारी 'नवसंजीवनी' ठरणार आहे.

अंमलबजावणी अंतिम टप्प्यात : राज्य शासनाची आजवरची सर्वात मोठी महाकर्जमुक्ती योजना म्हणून या योजनेकडे पाहिले जात आहे. अत्यंत महत्त्वाचे म्हणजे, या योजनेची प्रत्यक्ष अंमलबजावणी आता अंतिम टप्प्यात आली आहे. प्रशासकीय पातळीवर सर्व तयारी पूर्ण झाली असून, जुलैच्या दुसऱ्या आठवड्यापासून पात्र शेतकऱ्यांच्या थेट कर्जखात्यांमध्ये कर्जमुक्तीची रक्कम जमा होण्यास सुरुवात होणार आहे. या निर्णयामुळे खरीप हंगामाच्या पार्श्वभूमीवर लाखो शेतकरी कुटुंबांना खूप मोठा दिलासा मिळणार आहे.

■ विभागीय माहिती कार्यालय, अमरावती

योजनेची त्रिसूत्री – कर्जमुक्ती लाभ : या योजनेचे स्वरूप केवळ कर्जमुक्ती नाही तर, विविध प्रवर्गातील शेतकऱ्यांचा विचार करून याची अत्यंत अभ्यासपूर्ण आखणी करण्यात आली आहे. यामध्ये प्रामुख्याने तीन घटकांचा समावेश आहे:

यात २ लाख रुपयांपर्यंत संपूर्ण कर्जमुक्ती: जे शेतकरी थकबाकीदार आहेत, अशा पात्र शेतकऱ्यांना २ लाख रुपयांपर्यंतच्या कर्जमुक्तीचा थेट लाभ दिला जात आहे. यापूर्वीच्या 'महात्मा जोतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजने'चे लाभार्थी असलेल्या पात्र शेतकऱ्यांसाठीही शासनाने यात विशेष व स्वतंत्र तरतूद केली आहे.

एकवेळ समझोता योजना (OTS): ज्या शेतकऱ्यांची थकबाकी २ लाख रुपयांपेक्षा जास्त आहे, त्यांच्यासाठी 'वन टाईम सेटलमेंट' (OTS) म्हणजेच एकवेळ समझोता योजना लागू करण्यात आली आहे. यात शेतकऱ्यांनी आपल्या हिश्शाची रक्कम भरल्यानंतर, राज्य शासन कर्जमुक्ती रक्कम थेट शेतकऱ्यांच्या कर्ज खात्यात जमा करणार आहे.

नियमित कर्जफेड करणाऱ्यांना ५० हजारांचे प्रोत्साहन: अनेक शेतकरी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतही बँकेच्या कर्जाची नियमित परतफेड करतात. अशा प्रामाणिक कर्जदार शेतकऱ्यांमध्ये अन्यायाची भावना निर्माण होऊ नये, म्हणून शासनाने त्यांना ५० हजार रुपयांपर्यंत प्रोत्साहनपर लाभ देण्याचा स्तुत्य निर्णय घेतला आहे.

डिजिटल तंत्रज्ञान आणि पारदर्शकता : कर्जमुक्ती योजनेच्या अंमलबजावणी मध्ये तांत्रिक अडचणी आणि दिरंगाई होऊ नये यासाठी राज्य शासनाने 'महाआयटी'च्या माध्यमातून संपूर्ण प्रक्रिया ऑनलाईन आणि आधार क्रमांकावर आधारित ठेवली आहे.

सर्व बँकांकडून पात्र कर्जखात्यांचा तपशील थेट पोर्टलवर घेतला जात असून, संगणकीय पडताळणीद्वारे अंतिम याद्या तयार केल्या जात आहेत. या याद्या शेतकऱ्यांना सहज पाहता याव्यात यासाठी गाव चावडी, ग्रामपंचायत, बँक शाखा, विकास संस्था आणि आपले सरकार सेवा केंद्र येथे प्रसिद्ध केल्या जाणार आहेत. विशेष म्हणजे, पात्र शेतकऱ्यांना त्यांच्या नोंदणीकृत मोबाईलवर बँकांमार्फत संदेश पाठवूनही सूचित केले जाणार आहे.

'आधार प्रमाणिकरण' अनिवार्य : शेतकऱ्यांनी योजनेची संपूर्ण प्रक्रिया ऑनलाईन, पारदर्शक आणि आधार क्रमांकावर आधारित ठेवण्यात आली आहे. पात्र शेतकऱ्यांनी यादीत नाव आल्यानंतर लाभ मिळवण्यासाठी शेतकऱ्यांनी आपल्या आधार नंबर किंवा यादीतील विशिष्ठ नंबरसह 'आपले सरकार सेवा केंद्रात' किंवा बँकेत जाऊन आपल्या कर्जखात्याचे बायोमेट्रिक/आधार प्रमाणीकरण करणे गरजेचे आहे. ही माहिती योग्य असल्याची खात्री करून शेतकऱ्यांनी मान्यता दिली, की शासनाकडून थेट कर्जमुक्तीची रक्कम शेतकऱ्यांच्या कर्जखात्यात जमा होईल.आणि एकवेळ समझोता (OTS) योजनेतील लाभार्थ्यांनी प्रथम त्यांचा हिश्शाची रक्कम भरणे आवश्यक आहे, त्यानंतरच शासनाचा कर्जमुक्तीचा लाभ शेकऱ्यांच्या कर्जखात्यात जमा होईल.यासाठी पात्र शेतकऱ्यांनी आधार प्रमाणिकरण करणे आवश्यक आहे.

## तक्रार निवारणासाठी यंत्रणा

योजनेच्या पारदर्शकतेवर शासनाने विशेष भर दिला आहे. कर्जखात्याच्या माहितीत किंवा बँक तपशीलात काही तांत्रिक त्रुटी असल्यास शेतकऱ्यांना दाद मागता यावी, म्हणून सक्षम तक्रार निवारण व्यवस्था निर्माण करण्यात आली आहे. तसेच या तक्रारींचे तात्काळ निराकरण करण्यासाठी जिल्हास्तरावर विशेष समितीसुद्धा नियुक्त करण्यात आली आहे.

# दिल्ली–मुंबई द्रुतगती मार्गामुळे वाहतूक व मालवाहतूक वेगवान होणार : मुख्यमंत्री

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली दिल्ली–मुंबई द्रुतगती मार्ग प्रकल्पाची पाहणी

■ पालघर (दै. संध्या)

भारत सरकारमार्फत सुमारे १ लाख कोटी रुपये खर्चून उभारण्यात येणारा सुमारे १,४०० किलोमीटर लांबीचा, ८ पदरी ग्रीनफिल्ड ॲक्सेस-कंट्रोल्ड द्रुतगती मार्ग हरियाणा, राजस्थान, मध्य प्रदेश, गुजरात आणि महाराष्ट्र या पाच राज्यांना जोडणार आहे. हा मार्ग पूर्ण झाल्यानंतर दिल्ली आणि मुंबई दरम्यानचा प्रवास मोठ्या प्रमाणात वेगवान होणार असून देशातील प्रमुख औद्योगिक पट्ट्यांमधील संपर्क अधिक सक्षम होणार असल्याचा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला.

देशातील सर्वात महत्त्वाकांक्षी पायाभूत सुविधा प्रकल्पांपैकी एक असलेल्या दिल्ली–मुंबई द्रुतगती मार्गाच्या (वडोदरा–मुंबई विभाग) कामांची मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पाहणी करून प्रकल्पाच्या प्रगतीचा आढावा घेतला. यावेळी संबंधित अधिकाऱ्यांशी चर्चा करत त्यांनी प्रकल्प वेळेत पूर्ण करण्यासह दर्जेदार कामांवर भर देण्याच्या सूचना दिल्या. या प्रकल्पाचे वैशिष्ट्य म्हणजे जवाहरलाल नेहरू पोर्ट प्राधिकरण (JNPA) यांच्याशी थेट जोडणी. त्यामुळे उत्तर भारतातून जेएनपीएपर्यंत मालवाहतूक अधिक जलद, कार्यक्षम आणि कमी खर्चात होणार असून देशाच्या लॉजिस्टिक साखळीला मोठी बळकटी मिळणार असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

महाराष्ट्रातील वडोदरा–मुंबई विभाग सुमारे १५७ किलोमीटर लांबीचा असून, त्यासाठी सुमारे २४ हजार कोटी रुपये खर्च करण्यात येत आहे. सात बांधकाम पॅकेजमध्ये विकसित होणाऱ्या या विभागातील पाच पॅकेजचे काम पूर्ण झाले असून ते वाहतुकीसाठी सज्ज आहेत, तर उर्वरित दोन पॅकेज ऑगस्ट २०२६ पर्यंत पूर्ण होणार आहे. महाराष्ट्र राज्यातून जाणारा मार्ग ३१ ऑगस्ट २०२६ पर्यंत वाहतुकीसाठी खुला करण्याचे नियोजन असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

हा मार्ग सुरू झाल्यानंतर वडोदरा ते मुंबई प्रवासाचा कालावधी आठ तासांवरून सुमारे चार तासांपर्यंत कमी होणार आहे. यामुळे प्रवाशांना वेगवान, सुरक्षित आणि वाहतूक कोंडीमुक्त प्रवासाचा अनुभव मिळणार असून व्यावसायिक वाहतुकीलाही मोठी चालना मिळेल. जेएनपीएकडे जाणाऱ्या मालवाहतुकीची कार्यक्षमता लक्षणीयरीत्या वाढणार आहे. सध्या ठाणे, भिवंडी आणि घोडबंदर मार्गावरील वाहतूक कोंडीमुळे होणारा वेळ व इंधनाचा अपव्यय कमी होऊन मालवाहतुकीसाठी अधिक जलद आणि विश्वासार्ह पर्यायी मार्ग उपलब्ध होणार आहे.

उत्तर आणि पश्चिम भारतातील औद्योगिक क्षेत्रांना मुंबईच्या बंदर व्यवस्थेशी अधिक सक्षम जोडणी मिळाल्याने निर्यात, उद्योग, गुंतवणूक आणि रोजगारनिर्मितीला चालना मिळणार आहे. तसेच हा प्रकल्प देशाची राजधानी दिल्ली आणि आर्थिक राजधानी मुंबई यांना अधिक वेगवान व आधुनिक द्रुतगती मार्गाने जोडणारा महत्त्वपूर्ण टप्पा ठरणार असून, भारताच्या पायाभूत सुविधा विकास आणि आर्थिक प्रगतीमध्ये मोलाचे योगदान देणारा ठरणार असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले. यावेळी वनमंत्री तथा पालघर जिल्ह्याचे पालकमंत्री गणेश नाईक, मत्स्यव्यवसाय व



बंदरे मंत्री नितेश राणे, खासदार डॉ. हेमंत सवरा, आमदार स्नेहा दुबे-पंडित ,आमदार राजन नाईक तसेच कोकण विभागाचे पोलीस महानिरीक्षक चंद्रकिशोर मीना , महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीचे उपाध्यक्ष कार्यकारी संचालक दीपक कपूर, JNPA चे अध्यक्ष गौरव दयाल , मीरा-भाईंदर वसई- विरार पोलीस आयुक्त निकेत कौशिक, जिल्हाधिकारी डॉ.इंदु राणी जाखड, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मनोज रानडे, पोलीस अधीक्षक यतीश देशमुख, डहाणू प्रकल्प अधिकारी विशाल खत्री तसेच विविध विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### वाल्हे परिसरातील 1444 बालकांना पोलिओचे डोस

वाल्हे (दैनिक संध्या) : राष्ट्रीय पोलिओ लसीकरण दिनाचे औचित्य साधून वाल्हे (ता. पुरंदर) येथील प्राथमिक आरोग्य केंद्राच्या वतीने राबविण्यात आलेल्या लसीकरण मोहिमेत परिसरातील शून्य ते पाच वयोगटातील एकूण १४४४ बालकांना पोलिओचे डोस देण्यात आले आहेत. यावेळी वाल्हे प्राथमिक आरोग्य केंद्रांत या लसीकरण मोहिमेचा शुभारंभ जिल्हा परिषदेच्या सदस्या डॉ. प्राजक्ता दुर्गाडे यांच्या हस्ते करण्यात आला. याप्रसंगी वाल्हे सरपंच अतुल गायकवाड, उपसरपंच सागर भुजबळ यांसह संदीप भुजबळ नवनाथ चव्हाण,कुणाल भुजबळ आदी मान्यवर उपस्थित होते.तर वाल्हे केंद्राअंतर्गत वागदरवाडी येथे सरपंच सुनील पवार आडाचीवाडीत सरपंच सुवर्णा पवार सुकलवाडी येथे सरपंच संदेश पवार पिसुर्टीत माजी सरपंच सारिका बरकडे मांडकीत माजी सरपंच प्रियांका शिंदे पिंगोरीमध्ये सरपंच संदीप यादव यांच्या हस्ते या मोहिमेचा प्रारंभ करण्यात आला होता. या दरम्यान विविध ठिकाणी उभारलेल्या २१ बूथ मधून वाल्हे प्राथमिक आरोग्य केंद्रातील वैद्यकीय अधिकारी डॉ. शाम येत्तलवाड डॉ. प्रणावी आटपाडकर आरोग्य सहाय्यक रवींद्र मोहीते,भास्कर कारकुड, आरोग्य सहाय्यिका रूपाली झुरंगे सुप्रिया पाटील किशोर काळुखे,निखिल दोडके,गट प्रवर्तक वैशाली दानवले,आशा सेविका रोहीणी पवार,ज्योती पवार, सविता दुर्गाडे, सुनिता पवार, ज्योती महांगडे आदींसह अनेक आशा सेविकांनी काम पाहिले.

### वाहनधारकांनो, एचएसआरपी नंबर प्लेट बसविण्यासाठी उरले काही तास

कोरेगावमुळ (दैनिक संध्या) : राज्यातील 1 एप्रिल 2019 पूर्वी नोंदणी झालेल्या सर्व वाहनांवर उच्च सुरक्षा नोंदणी क्रमांक म्हणजेच HSRP नंबर प्लेट बसविणे बंधनकारक आहे. ही नंबर प्लेट बसविण्यासाठी राज्याच्या परिवहन विभागाने 30 जूनपर्यंत अंतिम मुदत आहे. या मुदतीत नंबर प्लेट न बसविल्यास आता थेट कडक कारवाई सुरू केली जाणार असल्याचे परिवहन विभागाने स्पष्ट केले आहे. परिवहन विभागाकडून 1 जुलैपासून नियमांचे पालन न करणाऱ्या वाहनधारकांवर मोटार वाहन कायद्यानुसार कारवाई सुरू केली जाणार आहे. एवढेच नाही तर एचएसआरपी नंबर प्लेट नसलेल्या वाहनांची आरटीओमधील अनेक महत्त्वाची कामेही रोखली जाणार आहेत. ता. 30 जूनपर्यंत एचएसआरपी बसविण्यासाठी अधिकृतपणे अपॉइंटमेंट घेतलेल्या वाहनधारकांना कारवाईतून वगळण्यात येणार आहे.

### नसरापुरातील नराधमाला फाशी योग्यच - रूपालीताई कांडगे

चाकण (दैनिक संध्या) : पुणे जिल्ह्यातील नसरापूर येथे साडेतीन वर्षाच्या चिमुरडीवर अत्याचार करून तिचा अत्यंत निर्दयीपणे खून केल्याप्रकरणी दोषी ठरलेल्या भीमराव प्रभाकर कांबळे याला विशेष न्यायालयाने फाशीची शिक्षा सुनावल्याने न्यायदेवतेवरचा विश्वास सर्वाधिक दृढ होत चालला आहे. नराधमाला फाशी योग्यच आहे, असे चाकण नगरपरिषदेच्या नगरसेविका रूपालीताई कांडगे यांनी येथे सांगितले. चिमुरडीवरील अत्याचार आणि हत्येप्रकरणी न्यायालयाने अवघ्या दोन महिन्यांत निकाल देत आरोपीला फाशीची शिक्षा सुनावली. हा न्याय व्यवस्थेवरील विश्वास अधिक दृढ करणारा निर्णय आहे. अशा अमानुष गुन्ह्यांमध्ये जलद तपास आणि तातडीने न्याय मिळणे अत्यंत गरजेचे आहे. या निर्णयामुळे समाजात कायद्याचा धाक निर्माण होईल आणि महिलांवरील व बालकांवरील अत्याचार करणाऱ्यांना कठोर संदेश मिळेल. नसरापूर प्रकरणात पोलीस, सरकारी वकील आणि न्यायालय यांनी समन्वयाने काम करून अल्पावधीत खटल्याचा निकाल लावला, ही अत्यंत स्वागतार्ह बाब आहे. अशा संवेदनशील प्रकरणांमध्ये वर्षानुवर्षे न्यायाची प्रतीक्षा करण्याऐवजी जलद गतीने सुनावणी होणे आवश्यक आहे. हा निकाल भविष्यातील अशा प्रकरणांसाठी आदर्श ठरेल आणि पीडित कुटुंबांना वेळेत न्याय मिळण्यास मदत होईल, असे नगरसेविका रूपालीताई कांडगे व नगरसेविका आरती परदेशी यांनी सांगितले.

### चाकण परिसरात वटपौर्णिमा दिमाखात साजरी

चाकण (दैनिक संध्या) : जन्मोजन्मी लाभो तुझी साथ अशी भावना व्यक्त करत चाकण व परिसरात नवविवाहित तरुणी व महिला भगिनींनी मोठ्या भक्तिभावाने वटपौर्णिमा उत्साहात व दिमाखात साजरी केली. चाकण शहरातील विविध भागासह ग्रामीण भागातही मोठ्या उत्साहात वटसावित्री पौर्णिमा साजरी करण्यात आली. दरवर्षीप्रमाणे यंदाही पूजेसाठी महिलांनी पतीला दीर्घायुष्य लाभण्यासाठी वडाच्याजवळ तोबा गर्दी केली होती.

# रोटरी क्लब ऑफ पुरंदरच्या आध्यक्षपदी प्राचार्य संदीप टिळेकर

सासवड (दै. संध्या)



सासवड येथील आचार्य अत्रे सांस्कृतिक भवनात रोटरी क्लब ऑफ पुरंदरचा पदग्रहण समारंभ संपन्न झाला. यावेळी नूतन अध्यक्ष प्राचार्य संदीप टिळेकर, सचिव ॲड. आनंद जगताप, रो. मंजू फडके, रो. आनंदीकाकी जगताप, रो. प्रकाश कुमार सुतार, रो. वसंतराव माळुंजकर व इतर पदाधिकारी उपस्थित होते.

'शिक्षण हेच खरे दान' हा मंत्र जपत, रोटरी क्लब ऑफ पुरंदरचा २०२६-२७ या वर्षाचा पदग्रहण समारंभ रविवारी (ता.२८) सासवड येथील आचार्य अत्रे सांस्कृतिक भवन येथे अत्यंत उत्साहात आणि सामाजिक उपक्रमांच्या पार्श्वभूमीवर संपन्न झाला. या समारंभात रोटरी क्लबने पारंपारिक सत्कार नाकारून 'ज्ञानदान अभियाना'च्या माध्यमातून विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक साहित्याची मदत गोळा करण्याचा स्तुत्य पायंडा पाडला.

हा पदग्रहण समारंभ रोटरी इंटरनॅशनल डिस्ट्रिक्ट ३१३१ च्या डिस्ट्रिक्ट लर्निंग फॅसिलिटेटर रो. मंजू फडके आणि रो. आनंदीकाकी जगताप, ग्रामीण संस्थेच्या अध्यक्षा रो. राजवर्धिनी जगताप यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडला. या कार्यक्रमात रोटरी क्लब ऑफ पुरंदरच्या अध्यक्षपदी प्राचार्य संदीप टिळेकर, सचिवपदी ॲड. आनंद जगताप, उपाध्यक्षपदी डॉ. उमाकांत ढवळे आणि खजिनदारपदी डॉ. सचिन कुदळे, क्लब ट्रेनर अनिल उरवणे, क्लब ॲडमिन जीवन कड, आय.टी. ऑफीसर तुषार जगताप, आय. पी. पी. प्रमोद धनावडे यांनी कार्यभार स्वीकारला.

असिस्टंट गव्हर्नर रो. प्रकाश कुमार सुतार, डायरेक्टर (सीईऐ व कम्युनिटी डेव्हलपमेंट) रो. वसंतराव माळुंजकर, किरण इंगळे यांनी नूतन कार्यकारिणीला शुभेच्छा दिल्या. जिल्हा परिषद सदस्य हरीभाऊ लोळे, नगरसेवक प्रदीप राऊत, नगरसेविका लिना वढणे, प्राचार्य नंदकुमार सागर, ॲड आण्णासाहेब खाडे, कुंडलिक मेमाणे यांसह अनेक मान्यवर उपस्थित होते.

मागील वर्षी पुरंदर रोटरी क्लबने उत्कृष्ट काम केले, यापुढेही मोठ्या कामांचा संकल्प करून ते पुर्ण करण्यासाठी जिद्दीने प्रयत्न करा असे सांगत प्रांतपाल डॉ मंजू फडके यांनी येथीर प्रत्येक पैसा सामाजिक कामासाठी आणि लाभार्थीपर्यंत वापरला जातो. आता शहरी आणि ग्रामीण भागातही रोटरीच्या विविध उपक्रमांतून चांगली कामे सुरू असून रोटरीच्या अनेक उपक्रमांमार्फत कामे सुरु यापुढेही ही कामे अधिक चांगल्या प्रकारे करण्याकडे लक्ष देणे गरजेचे असल्याचे फडके यांनी सांगितले.

यावेळी बोलताना नूतन अध्यक्ष प्राचार्य संदीप टिळेकर म्हणाले की, " पुरंदर रोटरीचे संस्थापक स्व. चंदुकाका जगताप यांच्या विचारांप्रमाणे आणि माजी आमदार रोटरीयन संजय जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली पुढील वर्षभरात आरोग्य, शिक्षण आणि पर्यावरण या क्षेत्रांत रोटरीच्या माध्यमातून आपण भरीव कार्य करणार आहोत. रोटरी क्लबने सुरू केलेले 'ज्ञानदान अभियान' हे केवळ या कार्यक्रमापुरते मर्यादित नसून, ते वर्षभर अविरतपणे चालणार आहे." समारंभात उपस्थित मान्यवरांनी हार-तुरे आणि शाल-श्रीफळ देण्याऐवजी दप्तर, वह्या, पेन, कंपास पेटी आणि शैक्षणिक पुस्तके भेट देऊन एक नवा आदर्श समाजासमोर ठेवला. हे गोळा झालेले शैक्षणिक साहित्य जिल्हा परिषद शाळांमधील गरजू विद्यार्थ्यांना वाटप करण्यात येणार आहे. यावेळी ग्रामीण संस्थेच्या अध्यक्षा राजवर्धिनी जगताप यांच्या वतीने तालुक्यातील ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी तीन हजार पेन्सिल देण्यात आल्या.

या समारंभात पुढीलप्रमाणे सदस्यांची विभागनिहाय नेमणूक करण्यात आली. शैक्षणिक विभाग : राजवर्धिनी जगताप, तुषार जगताप. आरोग्य विभाग : डॉ. अस्मिता जगताप, डॉ. सुमित काकडे, डॉ. मनोज शिंदे. पब्लिक इमेज विभाग : डॉ. प्रविण जगताप, ॲड. युवराज वारघडे, आशिष शिंदे, डॉ. विनायक बांदेकर, डॉ. संदीप होले, डॉ. नितीन पांढरे. आर्थिक व सामाजिक विभाग : गुलाब गायकवाड, कृष्णा शेट्टी, नितीन निगडे. पर्यावरण विभाग : संतोष गायकवाड, विश्वनाथ गायकवाड. व्यावसायिक सेवा : अभिजीत बारवकर, सुनिलकाका जगताप. युवा सेवा : किरण भुजबळ, राहुल जगताप.

माजी अध्यक्ष प्रमोद धनावडे यांनी प्रास्ताविकातून वर्षभरातील कामकाजाचा आढावा घेतला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन दत्तात्रय रोकडे यांनी केले तर माजी अध्यक्ष ॲड युवराज वारघडे यांनी आभार मानले. यावेळी मोठ्या संख्येने रोटरी सदस्य आणि नागरिक उपस्थित होते.

## अंमली पदार्थ विरोधी दिनानिमित्त लोणी काळभोर पोलीस स्टेशनतर्फे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन व जनजागृती प्रभात फेरीचे आयोजन

लोणी काळभोर (दै. संध्या)



दिनांक २९ जून २०२६ रोजी अंमली पदार्थ विरोधी दिनानिमित्त लोणी काळभोर पोलीस स्टेशनच्या वतीने श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था इंग्लिश मीडियम स्कूल, लोणी काळभोर, हवेली, पुणे येथे विद्यार्थ्यांसाठी जनजागृतीपर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. सकाळी १०.३० ते १२.३० या वेळेत इयत्ता आठवी व दहावीच्या विद्यार्थ्यांना अंमली पदार्थांचे दुष्परिणाम, सायबर गुन्हे, तसेच मोबाईलच्या योग्य वापराबाबत मार्गदर्शन करण्यात आले. यावेळी विद्यार्थ्यांना अंमली पदार्थांपासून दूर राहण्याचे आवाहन करण्यात आले तसेच सायबर गुन्ह्यांपासून सुरक्षित राहण्यासाठी घ्यावयाची खबरदारी व मोबाईलच्या अतिवापराचे होणारे दुष्परिणाम याबाबत माहिती देण्यात आली. या कार्यक्रमास लोणी काळभोर पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक प्रदीप पवार, सपोनि जाधव, पोउपनि मुंडे, शाळेच्या प्राचार्या शेवाळे मॅडम, पोलीस अधिकारी व अंमलदार तसेच शिक्षकवर्ग उपस्थित होते. यानंतर अंमली पदार्थ विरोधी जनजागृतीसाठी प्रभात फेरीचे आयोजन करण्यात आले. ही प्रभात फेरी श्री स्वामी विवेकानंद इंग्लिश मीडियम स्कूल येथून सुरू होऊन श्री दत्त मंदिर चौक, खोकलाई देवी चौक, बिग बाजार चौक, श्री गणेश चौक, मारुती मंदिर चौक, सावता माळी चौक, बिग बाजार चौक, खोकलाई देवी, रामदरा रोड, लोणी काळभोर पोलीस स्टेशन, सरकारी हॉस्पिटल मार्गे पुन्हा इंग्लिश मीडियम स्कूल चौक येथे संपन्न झाली. या प्रभात फेरीमध्ये पोलीस अधिकारी व अंमलदारांसह शाळेतील सुमारे २००विद्यार्थी-विद्यार्थिनी व शिक्षकांनी सहभाग घेतला. विद्यार्थ्यांनी अंमली पदार्थ विरोधी जनजागृतीपर घोषणा देत समाजामध्ये नशामुक्तीचा संदेश दिला. लोणी काळभोर पोलीस स्टेशनच्या वतीने नागरिकांनी व विशेषतः युवकांनी अंमली पदार्थांपासून दूर राहावे व सुरक्षित डिजिटल वापर करावा असे आवाहन करण्यात आले आहे.

## 'कॉर्पोरेट फूड सर्व्हिस'ला नियमांचा जाच

पुणे (दै. संध्या)

■ 'रॅसेन्स प्रायव्हेट लिमिटेड'चे सीईओ संजयकुमार यांची खंत

देशांतर्गत 'कॉर्पोरेट फूड सर्व्हिस' हे क्षेत्र सध्या अनेक जाचक नियमांच्या जाळ्यात अडकले आहे. भारतात एक अन्नसेवा सुरू करण्यासाठी ११ परवान्यांची (लायसन्स) आवश्यकता असते. याउलट चीनमध्ये केवळ तीन परवाने पुरेसे ठरतात. या परवान्यांमधील गुंतागुंतीमुळे नवीन आणि स्थानिक कंपन्यांसमोर मोठे अडथळे निर्माण होत आहेत,' असे मत 'रॅसेन्स प्रायव्हेट लिमिटेड'चे व्यवस्थापकीय संचालक आणि सीईओ संजयकुमार यांनी व्यक्त केले. 'भारतासमोरील सर्वांत मोठे आव्हान म्हणजे येथील गुंतागुंतीची नियामक व्यवस्था. या व्यवस्थेमुळे नियमांचे पालन करण्याचा खर्च वाढतो आणि स्थानिक कंपन्यांना मोठ्या प्रमाणावर विस्तार करणे कठीण होते. देशाच्या आर्थिक नियोजनाचे केंद्र मानल्या जाणाऱ्या 'निती आयोगा'त दिले जाणारे भारतीय जेवणही युरोपीयन बहुराष्ट्रीय कंपनीकडून तयार केले जाते,'असेही संजयकुमार यांनी नमूद केले. भारतामध्ये दर वर्षी सुमारे ६.८७ कोटी टन अन्न वाया जाते; पैकी सुमारे १.१९ कोटी टन अन्न हे एकट्या 'फूड सर्व्हिस' क्षेत्रातून वाया जाते. यामुळे मेन्यू नियोजन, जेवणाचे प्रमाण आणि मागणीचा अचूक अंदाज बांधणे हे केवळ खर्चाच्या बाबतीतच नव्हे, तर शाश्वततेच्या (सस्टेनेबिलिटी) दृष्टीनेही मोठे आव्हान ठरते. यावर उपाय म्हणून स्थानिक ऑपरेटर अत्यंत महत्त्वाचे ठरू शकतात; कारण ते स्थानिक बाजारपेठ आणि लोकांच्या खाण्याच्या सवयींशी अधिक जोडलेले असतात.

## पुणे श्रमिक पत्रकार संघाच्या निवडणुकीत उमेश शेळके अध्यक्ष

पुणे (दै. संध्या)



**हिरा सरवदे सरचिटणीसपदी बिनविरोध**

पुणे श्रमिक पत्रकार संघाच्या सन २०२६-२०२७ या वर्षासाठी झालेल्या वार्षिक निवडणुकीत दै. सकाळचे उमेश शेळके यांनी अध्यक्षपदाची निवडणूक जिंकत संघाचे नेतृत्व आपल्या हाती घेतले. तर दै. लोकमतचे हिरा सरवदे यांची सरचिटणीसपदी बिनविरोध निवड झाली. खजिनदारपदी महाराष्ट्र टाइम्सचे प्रसाद पानसे यांनी विजय मिळविला.

पत्रकार संघाच्या निवडणुकीकडे शहरातील पत्रकारितेच्या क्षेत्राचे लक्ष लागले होते. विविध वृत्तसंस्था आणि माध्यमांतील पत्रकारांनी या निवडणुकीत उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. मतदानानंतर झालेल्या मतमोजणीत अध्यक्षपदी उमेश शेळके यांना स्पष्ट बहुमत मिळाले. त्यांच्या विजयानंतर समर्थकांनी जल्लोष करत त्यांचे अभिनंदन केले.

उपाध्यक्षपदी पुढारीचे किशोर बरकाले आणि टीव्ही ९ चे योगेश बोरसे यांची निवड झाली. सरचिटणीसपदी हिरा सरवदे यांची बिनविरोध निवड झाल्याने त्यांच्या कार्याचा सन्मान झाल्याची भावना सदस्यांनी व्यक्त केली. खजिनदारपदी प्रसाद पानसे यांनी विजय मिळवित आर्थिक जबाबदारी स्वीकारली.

चिटणीसपदी दै. भास्करचे राहुल देशमुख आणि लोकसत्ताचे संजय सपकाळे यांची निवड झाली. नव्या कार्यकारिणीत विविध वृत्तपत्रे व वृत्तवाहिन्यांतील पत्रकारांना प्रतिनिधित्व मिळाले आहे.

कार्यकारिणी सदस्य म्हणून सुशांत राऊत (टीव्ही ९), ज्ञानेश्वर फड (प्रभात), उद्धव धुमाळे (लोकमत), अक्षयकुमार फाटक (नवभारत/नवराष्ट्र), तुषार झरेकर (पुढारी न्यूज), गोपाळ गुरव (महाराष्ट्र टाइम्स), दीपक होमकर (तरुण भारत), मिलिंद शुक्ल (प्रभात), मनोजकुमार मोरे (लोकसत्ता) आणि सचिन वाघमारे (सकाळ) यांची निवड झाली.

निवडणूक प्रक्रिया शांततेत आणि पारदर्शक पद्धतीने पार पडली. मुख्य निवडणूक निर्णय अधिकारी ॲड. प्रताप परदेशी यांनी संपूर्ण निवडणूक प्रक्रियेचे नियोजन केले, तर सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी ॲड. स्वप्नील जोशी यांनी त्यांना सहकार्य केले.

निवडीनंतर नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांवर पत्रकारांच्या व्यावसायिक हितांचे संरक्षण, पत्रकार कल्याणविषयक प्रश्नांना प्राधान्य, संघटनेची एकजूट अधिक बळकट करणे, प्रशिक्षण उपक्रम, सामाजिक उपक्रम तसेच पत्रकारांच्या विविध प्रलंबित प्रश्नांवर प्रभावीपणे पाठपुरावा करण्याची जबाबदारी असणार आहे. नव्या कार्यकारिणीचे विविध पत्रकार संघटना, ज्येष्ठ पत्रकार आणि सदस्यांकडून अभिनंदन करण्यात आले असून, त्यांच्या कार्यकाळाकडून मोठ्या अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहेत.

# रोशनीने रस्ता सुरक्षा मोहीम यशस्वीरित्या पूर्ण केली

**आरआर काबेल फाउंडेशनचा सीएसआर उपक्रम**

पुणे (दै. संध्या)

आरआर काबेल फाउंडेशनचा सीएसआर उपक्रम रोशनीने एलिक्सिर फाउंडेशनच्या सहयोगाने "वाहतूक जागरूकता, व्यवस्थापन आणि रस्ता सुरक्षा मोहीम" यशस्वीरित्या पूर्ण केल्याची घोषणा केली आहे. या उपक्रमाचा मुख्य उद्देश महाराष्ट्रातील पुणे जिल्ह्यांतील रस्ता सुरक्षेबाबत जागरूकता वाढवणे हा होता.

वर्दळीचे जंक्शन, अपघात प्रवण क्षेत्र, शाळा आणि रुग्णालये यांसारख्या महत्त्वाच्या ठिकाणी हे बूथ उभारल्यास चालकांना वाहतूक नियमांचे पालन करण्याची सतत आठवण करून देतात. यामुळे अतिवेग, मद्यपान करून गाडी चालवणे आणि इतर असुरक्षित पद्धतींना आळा बसतो. हे बूथ अपघात किंवा आपत्कालीन परिस्थितीत पोलिसांना त्वरित मदत पोहोचवण्यास सक्षम करतात, ज्यामुळे जीव वाचवण्यास मदत होते. याशिवाय, प्रवासादरम्यान व्यक्तींना मदत किंवा मार्गदर्शनाची गरज भासल्यास हे पोलिस बूथ सहाय्य केंद्र म्हणून काम करतात. रस्ता सुरक्षा वाढवून, अपघात रोखून आणि सुरक्षिततेची भावना निर्माण करून पोलिस बूथ केवळ कायदा अंमलबजावणी साध्य करण्यासह समाजाला महत्त्वपूर्ण फायदेही पोहोचवतात. आरआर ग्लोबलच्या संचालिका श्रीमती कीर्ती काब्रा म्हणाल्या की"आरआर काबेलमध्ये आमचे रस्ता सुरक्षा हे नागरी कर्तव्य आहे, तसेच आम्ही रस्ता सुरक्षिततेला सामूहिक ध्येय मानतो. एलिक्सिर फाउंडेशनसोबत सहयोगाने राबवलेल्या या मोहिमेच्या माध्यमातून आम्ही व्यक्तींमध्ये जागरूकता निर्माण करू शकलो, नागरिकांना अर्थपूर्णरित्या या उपक्रमात सामील करून घेऊ शकलो आणि आपले रस्ते सुरक्षित ठेवण्यासाठी अहोरात्र झटणाऱ्या आमच्या वाहतूक पोलिसांना आवश्यक ते सहकार्य देऊ शकलो. या उपक्रमाच्या यशामधून अधिक सुरक्षित आणि अधिक जबाबदार शहरे निर्माण करण्याप्रती आमची कटिबद्धता दिसून येते.



**मोहिमेचे प्रमुख यश**

- समाजाचे प्रबोधन: या जागरूकता मोहिमेने 10,000 हून अधिक विद्यार्थी आणि नागरिकांपर्यंत पोहोचून त्यांना वाहतूक नियम, पादचाऱ्यांची सुरक्षा आणि प्रथमोपचार पद्धतींविषयी अत्यंत महत्त्वाची माहिती दिली.
- मोठ्या प्रमाणावर पोहोच: ब्रँडेड पोलिस बूथवर या मोहिमेचा संदेश सांगणारे बॅनर्स बसवण्यात आले, ज्यामुळे मोठ्या प्रमाणावर व्यक्तींवर या संदेशाचा प्रभाव पडला.
- उदात्त हेतूसाठी सर्जनशीलता: रस्ता सुरक्षेच्या संकल्पनेवर आधारित चित्रकला स्पर्धेत 1,000 व्यक्तींनी सहभाग घेतला. या सर्जनशील आणि आकर्षक माध्यमामुळे संपूर्ण समाजात रस्ता सुरक्षेविषयी जनजागृती निर्माण झाली.
- वाहतूक पोलिसांसाठी सहकार्य: रस्ता सुरक्षेप्रती असलेली कटिबद्धता दर्शवत एकूण 75 नवीन वाहतूक पोलिस बूथ बसवण्यात आले, यापैकी 55 पुण्यात उभारण्यात आले आहेत. यामुळे वाहतूक पोलिसांची रस्त्यावरील उपस्थिती स्पष्टपणे दिसण्यास मदत झाली असून त्यांची सुरक्षा आणि कामाच्या परिस्थितीत लक्षणीय सुधारणा झाली आहे.

